६० ब्रह्मतेजो बलं बलम्

हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

मासिक

# नवस्नेह

## दीपावली विशेषांक २०२४



प्रेषक
**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**
४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ,
मंगळवार पेठ, कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@rediffmail.com kolhapurchitpavan@gmail.com
http://www.facebook.com/kolhapurchitpavan

रु. ६०/-

A GLORIOUS HERITAGE OF OVER 85 YEARS
Since 1930

100% VEG.

# जसा हवा तसा चहा...




100 व्या वर्षाकडे वाटचाल...

## दामोदर शिवराम आणि कं.

362 ई, स्टेशन रोड, शाहूपुरी, कोल्हापूर.
फोन नं. : 2655026, 2659524.

Available with
amazon Flipkart

9921128200 myHPtea/ damodar_shivram_co/ CoDamodar

# संपादकीय

नमस्कार मंडळी,

बरे आहात ना? दसरा सण मोठा, नाही आनंदा तोटा म्हणता म्हणता पावसानं घातलेला धुमाकूळ बघतच आपण दसरा साजरा केला. आता आशा अशी आहे की, दिवाळीत तरी हा कोसळणार नाही. पण पावसानं घातलेला धुमाकूळ या सणांना किंचित का होईना दु:खाची झालर लावून गेलाच ! अर्थात असल्या बारीक सारीक दु:खाला आपण भितो थोडेच !

ते सगळं बाजूला सारून आपण सण उत्साहाने आणि आनंदाने साजरा करणार आहोत, करत आलेलो आहोत. आणि हा आनंद द्विगुणित करायला आपला नवस्नेहचा हा दिवाळी विशेषांक तुमच्या सोबत आहेच !

मित्रांनो, 'दर्द बाटने से कम होता है और खुशीयाँ बाटने से बढती है' म्हणून तुमचा आनंद वाढवण्यासाठी यंदाचा नवस्नेह दिवाळी अंक विविध विषयांवरचे अभ्यासपूर्ण लेख, कथा-कविता अशी मस्त मेजवानी तुमच्यासाठी घेऊन आला आहे. आपल्या या दिवाळी अंकात मुंबई, पुणे, ठाणे, जबलपूर, कोल्हापूर अशा अनेक ठिकाणाहून ज्येष्ठ लेखकांचे कसदार लेख आहेत. या उत्तम साहित्यानं हा अंक पानोपानी सजला आहे. मला विश्वास आहे, की तुमच्या दिवाळीच्या आनंदात तो नक्कीच भर घालेल !

मित्रांनो, यंदा दरवर्षीप्रमाणे मी कुठल्याही सेलिब्रेटीची मुलाखत अंकात घेतलेली नाहीय. कारण सांगू, या सेलिब्रेटीज्ना तेच तेच प्रश्न विचारायचा मला खूपच कंटाळा आला ! शिवाय नवस्नेहची लोकप्रियता इतकी वाढली आहे, की त्यासाठी साहित्यही खूप आलं. इतकं की जागेअभावी आम्हाला काही काही वगळावं लागलं. मात्र एक कटाक्ष आम्ही ठेवला, की सगळे लेख माहितीपूर्ण आणि अभ्यासपूर्ण असतील.

तर असा हा सर्वांगसुंदर आपला नवस्नेहचा दिवाळी अंक तुमच्या हातात देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. कारण आमचं तत्वच मुळी

**'अंधेर को हटाने मे वक्त**
**बरबाद नही करते**
**बल्की दिया जलाने में हम**
**वक्त लगाते है।'**

असेच दिवे घराघरांत, मनामनांत, जनाजनांत उजळू द्या !

हिंदूंचा सर्वात मोठा सण आहे हा ! धर्मनिष्ठेने तो साजरा करूया ! आपल्या देशाचं भविष्य उजळून टाकूया!!

**मनामनांत स्त्रवणारा हा तेजाचा स्त्रोत,**
**तिमिराला घालवते ही प्रकाशाची ज्योत,**
**आनंद वाटूया जमवून सारे गणगोत,**
**भविष्याच्या गळ्यात घालून हा किरणांचा पोत !**

मग चला तर ! दिवाळी आपण आनंदाने साजरी करूया ! सोबत नवस्नेह वाचूया ! तुम्हा सर्वांना दीपावलीच्या अनंत प्रकाशमय शुभेच्छा !

आपली स्नेहांकिता,

**सौ. मंजुश्री गोखले,**

मोबा : ८८०५३५५२००

# चित्पावन संघाचा अष्टमी जागर सोहळा उत्साहात

## आठ हजार भक्तांनी घेतला दर्शनाचा लाभ !



हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाच्या वतीने गुरुवारी मंगलधाम येथे श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा उत्साहात आणि धार्मिक वातावरणात संपन्न झाला. यानिमित्त सायंकाळी उभारण्यात आलेल्या श्री महालक्ष्मी देवीच्या दर्शनाला ८ हजारांपेक्षा जास्त विविध समाजांतील भक्तांनी गर्दी केली होती.

चित्पावन समाजाच्या कुळाचाराप्रमाणे गेल्या ४५ वर्षांपासून महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा आयोजित केला जातो. यानिमित्त दर्शनासाठी सर्व कोल्हापूरकर मोठी गर्दी करतात. त्यानुसार गुरुवारीही सकाळपासून विविध धार्मिक कार्यक्रम, महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी तुलसी पूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. त्यानंतर आरती वाचन, महानैवेद्य दाखवून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सायंकाळी प्रथेप्रमाणे तांदळाच्या उकडीपासून श्री महालक्ष्मीचा मुखवटा साकारण्यात आला. ७ नंतर जगदंबेची मूर्ती उभारण्यात आली. मूर्तीसमोर घागरी फुंकण्याचा कार्यक्रम महिलांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी कोल्हापूरकरांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. तब्बल ८ हजार भाविकांनी रात्री ११ पर्यंत देवीचे दर्शन घेतले.

याचे संयोजन अध्यक्ष मकरंद करंदीकर, उपाध्यक्ष प्रसाद भिडे, केदार जोशी, नंदकुमार मराठे, संतोष साने, किरण जोशी, निखिल गोखले, ऋषीकेश लिमये, दत्ता आपटे, सीमा गोखले यांच्यासह समाजातील वी फॉर अवर्स ग्रुपचे पदाधिकारी उपस्थित होते.

# भावपूर्ण श्रद्धांजली !



रतन टाटा यांच्या निधनाची बातमी हृदयाला आघात घालणारी आहे. त्यांनी भारताच्या औद्योगिक क्षेत्राला जे योगदान दिलं, ते शब्दांपलीकडचं आहे. त्यांच्या शांत, नम्र व्यक्तिमत्त्वाने त्यांनी असंख्य लोकांच्या मनात प्रेम आणि सन्मान मिळवला.
त्यांच्या ध्येयवादी विचारसरणीने आणि समर्पणाने त्यांनी उभं केलेलं प्रत्येक पाऊल समाजाच्या कल्याणासाठी होतं. केवळ एक महान उद्योजक म्हणून नव्हे, तर एक संवेदनशील, माणुसकीचा आदर्श दाखवणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांना कधीही विसरता येणार नाही. भारतीयांच्या मनात त्यांच्याप्रती असलेला आदर चिरकाल टिकून राहील.

**देखणी ती जीवने, जी तृप्तीची तीर्थोदके**
**चांदणे ज्यातून फाके, शुभ्र पाऱ्यासारखे...**
**देखणा देहांत तो, जो सागरी सुर्यास्तसा**
**अग्नीचा पेरून जातो, रात्रगर्भी वारसा...**

**मरावे परी, कीर्तीरूपे उरावे...**

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे कै. श्री. रतन टाटा यांना आमची भावपूर्ण श्रद्धांजली... !

## सौ. मंजुश्री गोखले यांना प्रतिष्ठेचा न. चिं. केळकर पुरस्कार प्रदान !



गेली ११४ वर्षे वाचनसंस्कृती जपणाऱ्या पुणे मराठी ग्रंथालयाचा साहित्यसम्राट **'न. चिं. केळकर पुरस्कार'** नवस्नेहच्या संपादिका आणि प्रसिद्ध साहित्यिक **सौ. मंजुश्री गोखले** यांना नुकताच, दि. १५ ऑक्टोबर रोजी, पुणे येथे ज्येष्ठ लेखिका श्रीमती ज्योत्स्ना कोल्हटकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अतिशय प्रतिष्ठेचा आणि सन्मानाचा हा पुरस्कार मिळाल्याबद्दल सौ. मंजुश्री गोखले यांचे कोल्हापूर चित्पावन संघ आणि चित्पावन परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन ! त्यांची कीर्ती अशीच वाढत राहो !



## डॉ. व्ही. टी. पाटील फौंडेशनच्या विश्वस्तपदी सौ. अश्विनी भिडे यांची निवड !

स्वयंसिद्धाची भगिनी संस्था डॉ. व्ही. टी. पाटील फौंडेशनच्या कार्यपद्धतीनुसार संस्था कार्यात सक्रीय व सेवाभावी कार्यकर्त्यांनाच पदाची जबाबदारी दिली जाते. संस्था कार्य आणखी जोमाने चालू राहण्याच्या उद्देशाने ही योजना केली आहे. त्यानुसार या संस्थेच्या सेवाभावी कार्यकर्त्या **सौ. अश्विनी प्रसाद भिडे** यांची नुकतीच संस्थेच्या विश्वस्तपदी निवड करण्यात आली. कोल्हापूर चित्पावन संघ आणि परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन आणि त्यांच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

नवस्नेह
दिवाळी विशेषांक वर्ष १० वे : अंक ८ : नोव्हेंबर २०२४

शुभ दीपावली !

◆ संपादक
**श्री. नंदकुमार मराठे**

◆ कार्यकारी संपादिका
**प्रा. सौ. मंजुश्री गोखले**

◆ सल्लागार
**सौ. पल्लवी देशमुख**
**श्री. श्रीकांत लिमये**

◆ अक्षर जुळणी
**ज्योती अरुण काटवे**
विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस
जोतिबा रोड, कोल्हापूर.
मोबा. ९०२१२३४८९०

# अनुक्रमणिका

१. नवरात्रीतील नवदुर्गा... **डॉ. सुस्मिता गाडगीळ** /५
२. आता तरी जागे होऊ या... **कमला हर्डीकर** /१५
३. आर्थिक गडबड घोटाळे... **श्रीकांत शिंत्रे** /२१
४. मिले सूर मेरा तुम्हारा... **डॉ. धनंजय देशपांडे** /२७
५. प्राचीन भारतीय गणितातील गमती... **प्रशांत पोळ** /३१
६. घालीन लोटांगण, वंदीन चरण... **दा. कृ. सोमण** /३७
७. घड्याळ... **रविकिरण पराडकर** /४१
८. काश्मिरच्या अनंत जुन्या कथा... **हेमंत केळकर** /४७
९. ‘तर्पण’ चित्रपटाच्या निमित्ताने... **शेफाली वैद्य** /५१
१०. भोपळे (कथा)... **वैदेही देशपांडे** /५५
११. शारदा ते पूजा... **ज्योत्स्ना शिंत्रे** /५९
१२. ऑनलाईन झटपट... **कौस्तुभ ताम्हनकर** /६७
१३. समर्पण - संत कान्होपात्रा... **सौ. मंजुश्री गोखले** /७४
१४. नकारात्मकतेचा भस्मासूर... **प्रसाद मोकाशी** /७५
१५. जीवनगाणे गात रहावे... **डॉ. भाग्यश्री मुळे** /८३
१६. बफर टाईम... **प्राजक्ता पटवर्धन** /८७
१७. लांडगा आले रे... (कथा)... **मनीषा गद्रे** /९०

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. नंदकुमार मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.



रावजी
सांकृतिक भवन
रावजी
लग्न सराई
साखरपुडा
वाढदिवस
मुंज
बारसे
आणि इतर बरंच काही...
समारंभ कुठलाही असो आता पर्याय फक्त एकच...
उपलब्ध सुविधा
प्रशस्त एसी हॉल | प्रशस्त पार्किंग | जेवणासाठी 500 लोकांची पंगत | बुफेसाठी लॉन
175 लोकांची राहण्याची सोय, रूम व बाथरूमसह | 600 लोकांची बैठक व्यवस्था संपूर्ण पॅकेजसह
अधिक माहितीसाठी संपर्क करा. 9158909808, 9766560201
Book Now www.ravjihall.in
Radhanagari Road, Saneguruji Vasahat, Kolhapur-416 012

## पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटक भागातील
## इलेक्ट्रोफिजिओलॉजी (इ.पी.) स्टडी आणि आर.एफ. ॲब्लेशन करणारे एकमेव केंद्र

परिपूर्ण कार्डिओव्हॅस्क्युलर इंटरव्हेन्शन आणि कार्डिओ-थोरॅसिक सर्जरी सेंटर.



सर्व प्रकारचे पेरिफेरल व्हॅस्क्युलर इंटरव्हेन्शन करणारे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल

# श्री सिध्दीविनायक हार्ट हॉस्पिटल



१३३०/४, रेसिडन्सी कॉलनी, शास्त्रीनगर, कोल्हापूर फोन (०२३१) २६९४८९०, २६९४८९१,

अत्युच्च तंत्रज्ञान ♥ उच्च विद्याविभुषित आणि दीर्घानुभवी तज्ज्ञ ♥ अर्थात सर्वोत्तम रुग्णोपचाराची खात्री

| हृदयविकार विशेषतज्ज्ञ | कार्डिओ-इलेक्ट्रोफिजिओलॉजिस्ट | हृदयशस्त्रक्रियाविशेषतज्ज्ञ | रक्तवाहिन्यांशी निगडित शस्त्रक्रिया विशेष तज्ञ |
|---|---|---|---|
| डॉ. चंद्रकांत (सी.टी.) पाटील | डॉ. अभिजित शेळके | डॉ. नित्यानंद ठाकूर | डॉ. दिग्विजय घोडके |
| DNB.(Med) DNB.(Card) DCH. | MD.(Med) DNB.(Card).<br>Fellowship in Cardiac Arrhythmias & Cardiac Pacing | MS. Mch. DNB. (Cardiothoracic surgery) | M.D.(Radio Diagnosis) |
| इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट | इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट / इलेक्ट्रोफिजिओलॉजिस्ट | कार्डिओव्हेस्क्युलर अँड थोरॅसिक सर्जन | इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजिस्ट |

- जी. ई. इनोव्हा २१०० फ्लॅट पॅनल कॅथलॅब (मॅकलॅब मॉनिटरसह आय. यु. एस. सुविधा)
- 'ट्रेसर जर्मनी' ची सर्वोत्तम इ. पी. लॅब
- मोड्युलर ऑपरेशन थिएटर विथ लॉनर एअर फ्लो
- २४ तास अतिदक्षता विभाग
- इंटेन्सिया कोरोनरी केअर युनिट
- इंटेन्सिव्ह थोरॅसिक युनिट
- डायलेसीस युनिट
- पॅथॉलॉजी लॅब
- २४ तास फार्मसी
- कार्डीयाक ॲम्ब्युलन्स

### Interventional Cardiology

- पेसमेकर इम्प्लांटेशन कोरोनरी ॲन्जिओग्राफी, ॲन्जिओप्लास्टी
- बलून मायट्रल व्हॉल्वोटॉमी
- विनाछेद शस्त्रक्रिया-डिव्हाईस क्लोजर





### Cardio Thoracic Surgery

- बायपास सर्जरी
- झडपांचे बदल करण्याची शस्त्रक्रिया
- जन्मजात हृदयविकारांसाठी शस्त्रक्रिया

### Electrophysiology (E.P. Study) & R.F. Ablation

- हृदयाची अतिरिक्त धडधड व अनियमित ठोके यासाठी इ.पी. स्टडी आणि आर.एफ. ॲब्लेशन





### Interventional Radiology

- पेरिफेरल ॲन्जिओग्राफी / ॲन्जिओप्लास्टी
- एन्डोव्हेनस लेसर सर्जरी फॉर व्हेरिकोज व्हेन्स

### कॅशलेस सुविधा / मान्यता

- महाराष्ट्र पोलिस कुटुंब आरोग्य योजना (एम.पी.के.ओ.वाय.)
- बी.एस.एन.एल. विभाग
- वीज महामंडळ (एम.एस.ई.बी.)
- महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचारी व कुटुंबियांना हृदय शस्त्रक्रिया व अनुषंगीक वैद्यकीय खर्चाचे प्रतिपूर्तीस शासन मान्यताप्राप्त हॉस्पिटल
- महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
- एम.डी. इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. व तत्सम टी. पी. ए. कंपनीज्

**संपर्क - 02312694890, 02312694891, 7057405050**

# नवरात्रीतील शक्तीदेवता तथा नवदूर्गा

**डॉ. सुस्मिता गाडगीळ**
मोबा. ९४२१२९०४७७




**नवदुर्गांचे महत्व**

सध्या चातुर्मास चालू आहे. आषाढ शुद्ध एकादशी ते कार्तिक शुद्ध एकादशी हे चातुर्मासाचे चार महिने पावसाळ्याचे असतात. धरणीमाता निसर्गसौंदर्याने नटलेली असते. या चार महिन्यात सण आणि उत्सवही भरपूर असतात. नोकरी धंद्याच्या निमित्ताने परगावी गेलेली किंवा स्थायिक झालेली तरुण मंडळी सणांच्या निमित्ताने आपापल्या मूळ गावी येत असतात. कुटुंबातील सर्वजण सणाच्या निमित्ताने एकत्र जमल्यामुळे घरामध्ये आनंदी आणि उत्साही वातावरण असते. गणेशोत्सव सर्वत्र विशेषत: कोकणात खूप उत्साहात आणि आनंदाने साजरा केला जातो. नवरात्राचा उत्सव सुद्धा सार्वजनिक रित्या साजरा केला जातो. गणेशोत्सवा-मध्ये केवळ गणपतीची पूजा केली जाते. परंतु नवरात्रामध्ये वस्तूत: नऊ दिवस प्रत्येक दिवशी एका विशिष्ट शक्तीदेवतेचे पूजन केले जाते. या नऊ दिवसात कोणत्या दिवशी कोणत्या देवीची पूजा केली जाते ते पाहू. यातील प्रत्येक देवी म्हणजे एक, एक वनस्पतीच आहे.

या नवदुर्गांची नावे ब्रह्मदेवांनी मार्कंडेय ऋषींना सांगितली, ती पुढीलप्रमाणे –

**प्रथमं शैलपुत्रीच द्वितीयम् ब्रह्मचारिणी ।**
**तृतीयम् चंद्रघंटेऽति कुष्मांडेऽति चतुर्थकम् ।**
**पंचमम् स्कंदमातेऽति षष्ठम् कात्यायनीतिच ।**
**सप्तमम् कालरात्रीऽति महागौरीऽति चाष्टमम् ।**
**नवमम् सिद्धिदात्री च नवदुर्गा: प्रकीर्तिता: ।**

वरील श्लोकात वर्णन केलेल्या वनस्पतींची मराठी भाषेतील नावे अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहेत. (१) हिरडा, (२) ब्राह्मी, (३) हळीव किंवा

आहाळीव, (४) कोहळा, (५) जवस तथा अळशी, (६) अंबाडी, (७) नागदवणी तथा दवणा, (८) तुळस आणि (९) शतावरी.

आता या एकेका वनस्पतींचे गुणधर्म आणि औषधी उपयोग बघूया -

**(१) शैलपुत्री -**

पर्यायी नावे - हिरडा, हरितकी, पूतना, वयस्था, प्राणदा, शिवा, पथ्या, जीवनीया इत्यादी नावांनी हिरड्याचा उल्लेख ग्रंथांमध्ये आढळतो. बाजारात एकूण तीन प्रकारचे हिरडे विकत मिळतात (१) सुरवारी हिरडा, (२) हिरडा, (३) बाळ हिरडा. हिरडे झाडावरच कोवळे असतानाच काढून वाळवले जातात. त्याला बाळ हिरडा म्हणतात. मोठे झाल्यानंतर त्याला हिरडा म्हणतात. हिरड्याच्या नित्यसेवनाने म्हातारपण लवकर येत नाही. बुद्धी आणि स्मृती तरतरीत होतात.

आयुर्वेदाच्या सर्व औषधांमध्ये हिरडा हे औषध सर्वात श्रेष्ठ मानले जाते. स्वर्गामध्ये देवांच्यासाठी साठवलेले अमृत पृथ्वीवर पडले आणि त्याचे हिरडे झाले, अशी कथा आहे. हिरड्याच्या नित्य सेवनाने जरा म्हणजे म्हातारपण येत नाही. एक प्रकारे हे अमृतच आहे, असे म्हणायला हरकत नाही. चांगल्या वजनदार हिरड्याची भुकटी तथा चूर्ण करून, हे दोन चिमट्या चूर्ण भिजेल एवढे तूप घालून घेतल्यास, आयुष्य वाढते, स्मरणशक्ती चांगली होते. वसंत ऋतूत मधाबरोबर, ग्रीष्म ऋतूमध्ये गुळाबरोबर, वर्षा ऋतुमध्ये सैंधवाबरोबर, शरद ऋतुमध्ये साखरेबरोबर, हेमंत ऋतूत सुंठीबरोबर आणि शिशिर ऋतूत पिंपळीबरोबर घेतले असता कोणत्याही प्रकारचे रोग होत नाहीत.

कावीळ, प्लीहा रोग, मूळव्याध, प्रमेह, मधुमेह, राजयक्ष्मा, शोथ, अरुची, पांडुरोग हे सर्व रोग हिरड्याने नाश पावतात. हिरडा सारक आहे. डोळ्यांचे विकार असल्यास हिरडा रोज रात्री एक ग्रॅम, दुप्पट तूप आणि भिजेल एवढा मध घालून घेतल्यास डोळ्यांचे विकार बरे होतात.

विशेष सूचना :- अशक्त, कृश, तहान फार लागलेली असताना, आवाज बसला असेल तर आणि गर्भिणी स्त्रियांनी हिरडा घेऊ नये. मात्र ज्यांना हिरडा देता येत नाही, अशा व्यक्तींना त्रिफळा चूर्ण द्यावे.

हिरडा उत्तमपैकी सारक आहे. मलावरोधाचा त्रास असेल तर ज्याची शक्ती चांगली आहे, अशाच व्यक्तीने हिरडा वापरावा. एक चमचा हिरड्याचे चूर्ण चार कप पाण्यामध्ये मंद आचेवर निम्मे आटवून त्याचा काढा सकाळी उठल्यावर घेतल्यास पोट चांगले साफ होते. मुळव्याधीवर हिरड्याइतके उत्तम औषध नाही. मात्र मुळव्याध म्हणजे पाईल्स आणि गुदद्वारापाशी होणारा व्रण म्हणजे Anal Fissure यात फरक आहे. बहुतेक वेळा बरेच लोक या दोन्हीलाही मुळव्याध असेच म्हणतात. गुदद्वारापाशी जखम असेल तर हिरडा आजिबात उपयोगी नाही. उलटपक्षी त्यामुळे व्रण वाढण्याचीच शक्यता अधिक!

एक ग्रॅम हिरडा दूध आणि खडीसाखरेबरोबर घेतल्यास, थोड्याच दिवसात मुळव्याधीचा विकार हटकून बरा होतो, असे अनुभवी वैद्य सांगतात. आम्लपित्तावर हिरड्याचे चूर्ण मनुका आणि साखर यांबरोबर सेवन करावे. अजीर्ण झाले असेल तर हिरड्याचे चूर्ण सुंठीच्या चूर्णासोबत, गुळात मिसळून खावे. प्रमेहावर त्रिफळा चूर्ण आणि हळद एकत्र मिसळून घ्यावे. सर्व नेत्ररोगांवर त्रिफळाच्या काढ्याने डोळे धुवावेत आणि त्रिफळा चूर्ण तूप आणि मध एकत्र करून सेवन करावे. तूप आणि मध कधीही सम प्रमाणात एकत्र करू नये. कफ प्रकृतीच्या व्यक्तींनी मध अधिक प्रमाणात घ्यावा. तर वात आणि पित्त प्रकृतीच्या व्यक्तींनी तूप अधिक

प्रमाणात घ्यावे. कफ रोगावर हिरड्याचे चूर्ण मध आणि सैंधव मिश्र करून घ्यावे. हिरडा जरी अनेक व्याधींसाठी अत्यंत गुणकारी असला, तरीसुद्धा नाजूक प्रकृतीच्या व्यक्तींनी, म्हणजे उदाहरणार्थ लहान मुले, गर्भवती महिला, वृद्ध आणि अशक्त व्यक्ती अशांनी हिरड्याचे सेवन करून नये, असा महत्त्वाचा सल्ला आयुर्वेदाने दिला आहे. थोडक्यात सांगायचे तर हिरडा, रूक्ष आणि उष्ण असून भूक वाढविणारा आहे. तसेच बुद्धीला हितकर आहे. श्वास, कास, प्रमेह, कुष्ठ, कृमी, सूज, उदररोग दूर करणारा आहे. तसेच अनेक प्रकारचे मूत्रविकार दूर करणारा आहे. मात्र अशा प्रकारे अनेकविध व्यधी दूर करणारा हिरडा, वैद्यांच्या सल्ल्याशिवाय घेऊ नये.

**दुसरी दुर्गा ब्रह्मचारिणी तथा ब्राह्मी –**

ब्राह्मी हे नाव आपल्या सर्वांच्या परिचयाचे आहेच. मेंदूला शांतता देणारी म्हणून ही सर्वपरिचित आहे. सरस्वती, सोमलता, वयस्था ही तिची काही पर्यायी नावे होत. ब्राह्मी आपल्या देशात सर्वत्र उगवते. विशेषत: पावसाळ्यात उगवलेली दिसते. ही जमिनीवर पसरणारी वेल असून, सुमारे तीन ते सहा इंच लांबीची हिची पेरे असतात. प्रत्येक पेराच्या ठिकाणी पाने आणि मुळे फुटतात. अशाप्रकारे ही जमिनीवर पसरत रहाते. बुद्धी आणि आयुष्य यांची वाढ करणारी ही अत्यंत गुणकारी वनस्पती आहे. हिची मूर्ती लहान असली तरी कीर्ती मोठी आहे. ब्राह्मीचे तेल सर्वांच्या परिचयाचे आहेच. मेंदूला शांतता आणणारी, मनावरचा ताण कमी करणारी ही वनस्पती असल्याने, ब्राह्मीचे तेल दररोज डोक्याला लावल्यास, मानसिक ताण कमी होऊन झोप शांत लागते.

ब्राह्मीच्या पानांचा रस काढून, त्यापासून तूप सुद्धा सिद्ध केले जाते. याचे दररोज सेवन करण्याने स्मरणशक्ती चांगली वाढते. तसेच पित्त सुद्धा कमी होते. आवाजाला माधुर्य येते. ब्राह्मीचा ओला पाला मिळाला नाही तर वाळलेली पाने आणून त्याचा काढा करून, त्यापासून सुद्धा तेल किंवा तूप सिद्ध करता येते. कुष्ठ, पांडुरोग, प्रमेह, रक्त रोग, सूज इत्यादी विकार ब्राह्मीमुळे दूर होतात.

ब्राह्मीचे तेल तयार करताना ब्राह्मीसोबत, माका सुद्धा जर वापरला तर ब्राह्मीच्या थंडाव्यामुळे होणारे सर्दीसारखे विकार टाळता येतात. शिवाय माका हा केसांच्या वाढीसाठी उत्तम आहे हे सर्वांना माहीत आहेच. ब्राह्मीच्या रसाएवढे तिळाचे तेल घालून, उकळत ठेवून त्यातील जलांश पूर्णपणे निघून गेल्यानंतर, तेल सिद्ध झाले असे समजावे. तूप सुद्धा अशा पद्धतीने सिद्ध करता येते. असे हे ब्राह्मीचे एक चमचा पातळ केलेले तूप रोज, एक दीड कप दुधातून घेतल्यास स्मरणशकती वाढते, मन शांत होते, पित्त विकार सुद्धा कमी होतात असा अनुभव आहे. मात्र काही महिने याचे सेवन करावे लागते. अभ्यासाचा ताण असणारे विद्यार्थी किंवा व्यवसायाचे ताण असणाऱ्या व्यक्तींना हे तूप फारसे उपयुक्त ठरते.

ब्राह्मी मूत्रल आहे. ब्राह्मीचा रस दूध साखरेतून घेतल्यास लघवी साफ होते. ब्राह्मी रक्त शुद्धी करणारे चांगले औषध आहे. रक्त बिघडले असल्यास ब्राह्मी चांगली उपयोगी पडते. उष्णतेमुळे अंगावर उठणारे लहान लहान फोड, अंगावर पडणारे चट्टे, सांधे धरणे, अंगात उष्णतेमुळे चमका मारणे वगैरे विकार ब्राह्मीचे तूप मधासह घेतल्यास दूर होतात. मात्र हे औषध दोन ते तीन महिने घ्यावे लागते.

अशी ही ब्राह्मी स्मृतीवर्धक, शरीरातील उष्णता कमी करणारी आणि वेदनाशामक असल्याने अभ्यासाचा अगर कामांचा ताण जास्त असल्यास, डोक्याला ब्राह्मीचे तेल लावणे आणि पोटात ब्राह्मीचे तूप घेणे यामुळे त्रासापासून मुक्ती मिळते. मात्र अशी ही गुणकारी ब्राह्मी, सर्दी आणि कफाचा त्रास असताना मात्र वापरू नये. कारण ब्राह्मीच्या थंड

गुणामुळे हे त्रास वाढण्याची शक्यता फार असते. एकंदरीत योग्य वेळी आणि योग्य त्या प्रमाणात ब्राह्मीच्या तेलाचा आणि तुपाचा वापर करण्याने आयुष्यातील तापदायक, ताण निर्माण करणाऱ्या गोष्टी नक्कीच सुसह्य होतील आणि आपले आयुष्य सुखकर होईल.

**तिसऱ्या दुर्गेचे नाव आहे, चंद्रघंटा तथा हळीव –**

तिळापेक्षा थोडेसे मोठे परंतु तशा आकाराचे, गडद तपकिरी रंगाचे छोटेसे बी म्हणजे अहाळीव तथा हळीव. मात्र बोलताना अळीव असा उच्चार केला जातो. तळलेला डिंक, भाजलेले सुके खोबरे, भाजून पूड केलेली खसखस आणि गूळ इत्यादी पदार्थ घालून केलेला डिंकाचा लाडू बाळंतिणीला दिला जातो. तसेच हा आळीवाचा लाडू सुद्धा बाळंतिणीला आवर्जून दिला जातो. खरे तर अळीवाचा लाडू करणे खूपच सोपे आहे. परंतु फारसा केला जात नाही. अळीवाचे गुणधर्म पुढीलप्रमाणे आहेत–

हळीव, शीतवीर्यात्मक म्हणजे शरीरातील उष्णता कमी करणारे आहेत. उचकी लागणे, धाप लागणे, खोकला तसेच अतिसार, वातरोग, रक्तरोग इत्यादी रोगांचा नाश करणारे आहे. तसेच बलवर्धक आणि वातरोगघ्न आणि बल–पुष्टी–विवर्धनम् (म्हणजेच शक्तीदायक) असेही त्याचे वर्णन केले जाते. त्यामुळेच बाळंतिणीला हळिवाचे लाडू खायला देण्याची पूर्वीची पद्धत आहे. तसेच हळिवाची खीर सुद्धा दिली जाते. चार चमचे हळीव, पाव लिटर पाण्यात भिजत घालून, ते पाणी चांगले दाट झाल्यावर, उचकी लागलेल्या माणसाला वरचेवर पिण्यास देतात. यामुळे उचकी थांबते. तसेच अहाळीवाचे दाट पाणी प्यायल्याने लघवी सुद्धा साफ होते. रक्त साकळले असल्यास किंवा वातामुळे सांध्यात कळा येत असल्यास, आळीव चांगले बारीक करून त्यात पाणी घालून त्याचा लेप सांध्यावर लावावा. वेदना कमी होतात. अतिसारावर अळीवाचे चूर्ण पिठीसाखर मिसळून देतात. हळिवाचे लाडू उपवासाला चालतात. चवीला सुद्धा खूप छान लागतात. परंतु आज काल फारसे कुणी करीत नाहीत. हे लाडू करण्यासाठी फार काही श्रम सुद्धा करावे लागत नाहीत, तरीही का केले जात नाहीत, हे समजत नाही. असा हा देखणा नसला तरी सुद्धा चविष्ट आणि आरोग्याला सुद्धा हितकर असणारा अळीवाचा लाडू सर्वांनी अवश्य खावा. त्यात आपण बदामाचे किंवा काजूचे काप घालून तो अधिक देखणा आणि अधिक पौष्टिक करू शकतो.

**चौथी दुर्गा – कुष्मांड तथा कोहळा –**

नवरात्रातील पंचमीला कोहळे पंचमी असे सुद्धा म्हटले जाते. नवरात्रातील उत्सव शरद ऋतुमध्ये येतो. म्हणूनच त्याला शारदीय नवरात्र असेही म्हणतात.

नवरात्रातील पंचमी, ललिता पंचमी म्हणून ओळखली जाते. या दिवशी देवीला कोहळ्याचा (तिने वध केलेल्या राक्षसाचे प्रतीक म्हणून) बळी देण्याची प्रथा आहे. नंतर हा कोहळा सर्वजण प्रसाद म्हणून भक्षण करतात. कोल्हापूरमध्ये या दिवशी त्र्यंबोली देवीची यात्रा असते. कोल्हापूरची अंबाबाई तिची बहीण त्र्यंबोली हिच्या भेटीसाठी जाते.

आयुर्वेदामध्ये कोवळा, मध्यम आणि जून म्हणजेच पूर्णपणे पिकलेला कोहळा, अशा तीनही स्थितीतील कोहळ्याचे वर्णन आहे. कोवळा कोहळा पित्तहर आणि शीत आहे. मध्यम पिकलेला कोहळा कफनाशक आहे आणि पूर्णपणे पिकलेला कोहळा सर्व दोषघ्न असून मूत्रविकास दूर करणारा आहे, असे वर्णन आढळते. परंतु कोणत्याही स्थितीतला कोहळा हा शीत गुणात्मकच आहे.

**कोहळ्याचे विविध उपयोग –**

(१) गुदद्वारातून मूळव्याधीवाटे रक्त पडत

असेल, नाकातून रक्त पडत असेल तर चार चमचे कोहळ्याचा रस, दहा ग्रॅम खडीसाखर घालून द्यावा. रक्त थांबते. चित्तभ्रम, वेड इत्यादी विकारांसाठी जून कोहळ्याचा रस दोन चमचे खडीसाखर घालून सकाळ संध्याकाळ द्यावा. सुमारे दोन आठवड्यात हे त्रास कमी होतात. खोकल्याबरोबर किंवा नुसते सुद्धा घशातून रक्त पडत असेल तर कोहळ्याचा रस, मध, तूप आणि खडीसाखर घालून वरचेवर एक एक बोट चाटण्यास द्यावे. रक्त पडणे लवकरच कमी होते. वीर्यवृद्धीसाठी कोहळ्याचा पाक करून देण्याचा प्रघात आहे. असा कोहळे पाक बाजारात विकत मिळतो. अपस्मारामध्ये कोहळ्याच्या रसात ज्येष्ठमध उगाळून तो रस पिण्यास द्यावा. उन्मादामध्ये कोहळ्याच्या रसात कोष्टकोळींजनाचे चूर्ण आणि मध एकत्र करून पिण्यास द्यावा.

आम्लपित्तावर कोहळ्याच्या रसात साखर घालून पिण्यास द्यावा. अश्मरीवर (शरीरात कोणत्याही ठिकाणी निर्माण झालेला खडा) हिंग आणि जवखार घालून द्यावा. कोहळ्यापासून तयार करण्यात आलेले, कुष्मान्डासव - अग्निमान्द्य, धातूक्षय, प्रमेह, पांडू, ग्रहणी रोग, भगंदर, आमवात, रक्तपित्त आणि मेदरोग यांवर उपयुक्त ठरते. कोहळ्याचा अवलेह म्हणजे कुष्मांडावलेहशोष, क्षय, तृष्णा, भ्रम, छर्दी (उलटी होणे) श्वास, कास इ. रोग यांवर उपयुक्त आहे.

**स्कंदमाता (जवस तथा अळशी) हे पाचव्या दुर्गेचे नाव आहे.**

गडद तपकिरी रंगाचे, तुकतुकीत, साधारण तिळाच्या अकाराचे हे बी बहुतेकांच्या परिचयाचे असेल. बरेच लोक याची फुटाणे, शेंगदाणे इत्यादी जिन्नस घालून चटणी तयार करतात. आमवातासाठी हे चांगले औषध आहे. जवस उष्ण विर्यात्मक असले तरीसुद्धा याच्या काढ्याने मूत्र दाह कमी होतो.




उकडीचे मोदक
पुरणपोळी
सोलकढी

ही दीपावली
आपणा सर्वांना
सुखसमृद्धीची व
भरभराटीची जावो !

राजस खाणं
पुन्हा पुन्हा इथं येणं...

काळे बंधू यांचे
हॉटेल
।। राजपुरुष ।।
व्हेज डायनिंग व लॉजिंग

रेल्वे स्टेशन समोर, न्यू गणेश आर्टस् शेजारी, कोल्हापूर.
फोन : ०२३१-२६६४८८८, ५६८२२४४
www.hotelrajpurush.com E-mail : info@hotelrajpurush.com

त्यासाठी दोन चमचे जवस भरड पूड करून घेऊन त्यात एक चमचा ज्येष्ठमधाची भरड घालून त्यात एक लिटर पाणी घालून सर्व मिश्रणाचा एक अष्टमांश काढा तयार करावा. त्यामध्ये दोन चमचे खडीसाखर घालून पिण्यास द्यावा. लघवीची जळजळ कमी होते तसेच लघवी साफ होते.

छातीत कफ दाटून ताप आल्यास जवसाच्या पिठाचे पोटीस करून छाती शेकावी. कफ पातळ होतो आणि तापही उतरतो. किंवा जवसाचे पीठ उकळत्या पाण्यात कालवून, त्याचा छातीवर दाट लेप करावा. त्यानेही कफ पातळ होतो. पाठ एकसारखी दुखत असेल, तर जवसाचे पीठ पाण्यात कालवून शिजवून त्यात थोडे एरंडेल तेल घालून त्याचा लेप पाठीवर द्यावा. वेदना कमी होती.

लघवीला जळजळ होत असेल तर जवसाची भरड पूड करून त्यात पाणी घालून थोडे उकळून नंतर गाळून घेऊन प्यायला द्यावे. त्वचेवर कोणत्याही ठिकाणी मग ती जखम असो अगर सूज असो, त्याठिकाणी ठणका लागला असेल तर जवसाचे पोटीस बांधावे. जखमेमध्ये पू झाला असेल तर पू वाहून जातो आणि वेदना कमी होतात. भाजलेल्या जागी जवसाचे तेल आणि चुन्याची निवळी एकत्र घोटून त्याची पट्टी जखमेवर लावल्याने जखम लवकर भरून येते. असे हे जवस अनेक तक्रारींसाठी अत्यंत उपयुक्त आहे. याच्या पिठाचा गरम करून बाहेरून लावलेला लेप वेदना शमनाचे खूप उत्तम कार्य करतो.

**कात्यायनी तथा आंबाडी – ही सहावी दुर्गा आहे.**

या वृक्षाच्या फळांचे आंब्याशी साधर्म्य असल्यामुळे याला आंबाडा असे म्हणतात. हा मोठा पानझडी वृक्ष असून सह्याद्रीमध्ये तुरळकपणे आढळतो. हा मध्यम आकाराचा, परंतु खूप मोठा भरदार वृक्ष आहे. याची हिवाळ्यात पानगळ होते आणि वसंत ऋतूत त्याला मोहर येतो. उन्हाळ्याच्या शेवटी फळ तयार होते. फळ आंबट असल्यामुळे याचे केवळ लोणचेच करतात. याचे लोणचे अतिशय स्वादिष्ट लागते असे सांगतात. आम्लपित्तावर हे फार मोठे उत्तम औषध आहे. आंबाड्याच्या कोवळ्या फळांचा रस दहा ग्रॅम काढून घेऊन ५० ग्रॅम खडीसाखर आणि चिमूटभर मिऱ्याची पूड घालून ते मिश्रण वरचेवर द्यावे. असे सात दिवस घेतल्याने आम्लपित्त थांबते असे सांगतात. हे औषध चालू असताना तूप भात आणि गोरख चिंचेचे सार घ्यावे. गरीब लोक याचा उकडाम्ब्याप्रमाणे खाण्याकरता उपयोग करतात. आग्या घोणसाच्या विषावर याच्या झाडाच्या सालीचा उपयोग केला जातो.

**सातवी दुर्गा म्हणजे – कालरात्री (काळरात्री/ नागदवणी/नागदमनी इ.) इंग्लिश Wild Lily, Botanical Name - Cirnum**

ही वनस्पती उत्तर महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी आढळते. बहुतेक सर्व रोपवाटिकांमध्ये उपलब्ध असते. हे एक छोटेसे झुडूप असून पानांची कड अनियमितपणे पांढरी असते. या वनस्पतीला निगराणी फारणी लागत नाही. या वनस्पतींचा कल्क म्हणजे बारीक चटणी किंवा याच्या पानांचा रस औषधासाठी वापरला जातो. काही लोक या वनस्पतीच्या दांड्याचा म्हणजे खोडाचा रस औषधासाठी वापरतात. ही वनस्पती सुगंधी असून संध्याकाळी सुगंध दरवळत राहतो.

**गुणधर्म** – ही वनस्पती अतिशय थंड असून कासघ्न, जंतुघ्न, मूत्रल (मूत्राचे प्रमाण वाढविणारी), पाचक, मेध्य, यकृताचे कार्य वाढविणारी आहे. याच्या सेवनाने पायात गोळे येण्याची तक्रार कमी होते. दमा, शिंका, डोळे लाल होणे, बद्धकोष्ठता, निद्रानाश, उन्माद, मनोविकार, अतिसार, स्त्रियांमध्ये अत्यार्तव या विकारात ही अतिशय उपयोगी आहे.

**योगगुरु रामदेव बाबांचे सहकारी, आचार्य बालकृष्णजी यांचे अनुभवी उपाय पुढीलप्रमाणे –**

स्त्रियांना मासिक पाळीमधील अतिरक्तस्त्राव थांबवण्यासाठी – मोठ्या दोन तीन पानांचा रस काढून, त्यात थोडे पाणी घालून रोज सकाळी अनशेपोटी प्यावा. लघवी कमी होणे किंवा लघवी होताना, करताना त्रास होणे, लघवी करताना दाह होणे अशा तक्रारी सुद्धा सकाळी अनशेपोटी रस पिण्याने दूर होतात. मूळव्याधीचा त्रास असेल तर सुद्धा अशा पद्धतीने रस पिण्याने तो दूर होतो. मुळव्याधीत होणारा रक्तस्त्राव थांबतो. मुळव्याधीची सूज कमी होण्यासाठी पाने किंचिट कोमट करून तेल लावून सुजेवर लावावीत. सूज कमी होते. तसेच पोटात घेण्यासाठी पानांचा कलक तयार करून, त्यात काळ्या मिरीचे दोन–तीन दाणे बारीक करून घालून सेवन करावे. नंतर पाणी प्यावे. यामुळे मुळव्याधीच्या वेदना आणि रक्तस्त्राव कमी होतो. अशा प्रकारे ही नागदवणी शरीरातली उष्णता कमी करून, शरीरातील अनेक विकार दूर करणारी महत्त्वाची एक वनस्पती आहे.

**महागौरी तथा तुळस – या वनस्पतीला आठव्या दुर्गेचा मान दिला आहे.**

ही वनस्पती आपल्या सर्वांच्याच, आबाल–वृद्धांच्या चांगली परिचयाची आहे. तुळस माहित नाही असा भारतीय सापडणे कठीण !

पर्यायी नावे – सुरसा, सरला, गौरी, तुलसी इत्यादी. काळी आणि पांढरी अशी दोन प्रकारची तुळस असते. कापूर तुळस असाही आणखी एक तुळशीचा प्रकार आहे. त्याला किंचितसा कापराचा वास येतो म्हणून हे नाव !

काळी तथा कृष्ण तुळस सर्वात श्रेष्ठ, औषधी मानली जाते. तुळशीचे पंचांग म्हणजे मुख, खोड, पान, फूल आणि फळ म्हणजे बी. हे सर्व घटक औषधासाठी वापरले जातात. चवीला तिखट असणारी तुळस अर्थातच उष्ण गुणाची आहे. त्यामुळे सर्दी खोल्यावर अत्यंत गुणकारी आहे. चातुर्मास संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे कार्तिक शुद्ध द्वादशीच्या दिवशी तुळशीचे लग्न करतात. अर्थात नंतर पौर्णिमेपर्यंत सुद्धा करता येते. पूर्वीच्या काळी चातुर्मासात लग्न कार्य केले जात नसे. चातुर्मास पावसाळ्याचा काळ आहे. पूर्वी वाहतुकीची साधने सहज उपलब्ध नव्हती. तसेच या दिवसात प्रवास करणेसुद्धा अत्यंत त्रासदायकच होते. म्हणून ही प्रथा असावी. तुळशीचे लग्न (विष्णूशी) बाळकृष्णाशी लावले जाते. म्हणून तुळशीला विष्णुप्रिया असेही एक नाव आहे. तुळशीचे अनेक प्रकार असले तरी कृष्णतुळस ही अधिक गुणकारी असल्याने सर्वश्रेष्ठ मानली जाते.

तुळस चवीला तिखट असल्याने दाह आणि पित्त वाढवणारी आहे. अर्थात त्यामुळेच ती कफ आणि वातनाशक आहे. सर्दी खोकल्यामुळे आलेला म्हणजेच आमजन्य ज्वर तुळशीमुळे बरा होतो. श्वसन मार्ग म्हणजे नाकापासून फुफ्फुसापर्यंत वाढलेला कफदोष तुळशीमुळे कमी होतो. तुळशीचा रस मधातून दिल्यास सर्दी खोकला खूप कमी होतो. त्रिभुवनकीर्ती हे सर्दी–कफ नाशक म्हणून प्रसिद्ध असलेले औषध, आले आणि तुळशीच्या रसातच तयार केले जाते. हे औषध मधातून घेतात. सर्दीची तीव्रता जास्त नसेल तर केवळ तुळशीचा रस मधातून चाटल्यास बरे वाटते. तुळस ही हृदयविकारांमध्ये सुद्धा अत्यंत उपयोगी आहे. तुळशीच्या रसाचे मधातून चाटण घेतल्यास हृदयाचा रक्तपुरवठा वाढण्यास मदत होते. सर्दी खोकल्यामुळे आलेला ताप, तुळशीचा काढा साखर घालून घेतल्यास कमी होतो. तुळस उष्ण असली तरी तुळशीचे बी मात्र थंड आहे. तुळशीचे बी मधुर, वीर्यवर्धक आणि शीत आहे. त्यामुळे शीतपेयांमध्ये अलीकडे त्याचा

उपयोग केला जातो. अतिसारामध्ये रक्तस्त्राव होत असेल तर तुळशीचे बी रात्री पाण्यात भिजत घालून, सकाळी कुस्करून ते पाणी पिण्यास द्यावे. उलटी होत असेल तर तुशळीच्या रसात मध घालून द्यावा.

थोडासा ताप आहे, भूक अजिबात लागत नाही आणि जीभ पांढरी आहे, म्हणजेच शरीरातील आम वाढला आहे अशावेळी तुळस हे एक उत्तम औषध आहे. अशावेळी एक चमचा तुळशीचा रस मधातून चाटून खावा आणि अगदी हलका आहार घ्यावा. ताप कमी होतो. तुळस अग्नीदीपक म्हणजे भूक वाढविणारी आहे. भूक लागत नसेल तर रोज एक चमचा तुळशीचा रस, खडीसाखरेच्या चूर्णासोबत (चाटण करून) घ्यावा.

अजीर्ण झाल्यामुळे म्हणजेच अन्न चांगले न पचल्यामुळे पोट दुखत असेल तर तुळशीचा रस खडीसाखर घालून घ्यावे. सर्दीने नाक खूप गच्च झाले असेल तर संपूर्ण चेहऱ्यालाच तिळाच्या तेलाने मालिश करावे. पाण्यामध्ये तुळाशीची पाने टाकून उकळत ठेवून त्याची वाफ चेहऱ्यावर घ्यावी. नाक चांगले मोकळे होते. श्वास म्हणजे दमा लागला असेल तर तुळशीचा रस खडीसाखरेचे चूर्ण घालून चाटण्यास द्यावा. सर्दी खोकला आणि बारीक ताप असेल तर तुळीची पाच-सहा पाने मिऱ्याचे दोन दाणे ठेचून पाण्यात घालून त्याचा काढा खडीसाखर घालून पिण्यास द्यावा. तान्ह्या बाळांना सर्दी खोकला झाल्यास ग्लासभर पाण्यामध्ये तुळशीची पाने घालून त्यावर धातूची जाळी ठेवून, त्यावर सुती कपडा ठेवून त्या कपड्याने बाळाची छाती शेकावी. तसेच कपाळही शेकावे. सर्दी लगेच कमी होते. त्वचेवर बाहेरून सुद्धा तुळशीचा उपयोग होतो. अंगावर नायटे उठल्यास तुळशीचा रस चोळावा. थोडेच दिवसात नायटा कमी होऊ लागतो. गांधील माशी चावल्यास अगर एखादा किडा चावल्यास, त्या सूज आलेल्या जागेवर तुळशीचा रस चोळावा. पूर्वी घरातील अनुभवी स्त्रिया, कीटक चावल्यामुळे एखादी गांध आली असेल तर, त्या जागी तुळशीतील माती लावण्याचा सल्ला देत असत.

तुळशीची पाने ओझोन वायू उत्सर्जित करतात असे आधुनिक शास्त्र सांगते. आपल्या पूर्वजांना तुळशीची महती हजारो वर्षांपूर्वी ज्ञात होती. म्हणूनच आपल्या पूर्वजांनी तुळशीला इतके महत्व दिले आहे...

**सिद्धीदात्री तथा शतावरीला नवव्या दुर्गेचा मान दिला आहे.**

शतावरीचे नाव सर्वांना माहीतच आहे ते म्हणजे शतावरी कल्प या प्रसिद्ध अशा शक्तीदायक औषधी कल्पामुळे ! शतावरीचे वर्णन आयुर्वेदात पुढीलप्रमाणे आहे -

*''शतावरी हिमा तिक्ता स्वाद्वी गुर्वी रसायनी । सुस्निग्धा शुक्रला बल्या स्तन्य मेदोऽग्नि पुष्टिदा ।। चक्षुष्या वात पित्तास्त्र गुल्मातिसार शोथजित् ।''*

अर्थ अगदी सोपा आहे. शतावरी थंड गुणाची असून कडू आहे. गुरु गुणाची असून मधुर विपाकी आहे. म्हणजे शतावरीवर पचनाचा संस्कार झाल्यानंतर ती रसाने मधुर होते. गुणाने स्निग्ध, शुक्रधातू वाढवणारी, बल वाढवणारी, तसेच मेद आणि भूक (जठराग्नि) वाढविणारी, डोळ्यांचे आरोग्य चांगले राखणारी, वात-पित्त-रक्त-गुल्म-अतिसार-सूज हे विकार दूर करणारी आहे. तान्ह्या बाळासाठी आईचे दूध हे अमृत आहे. हे दूध वाढवण्यासाठी शतावरीच्या मुळ्या दुधात वाटून ते पेय पिण्यास द्यावे.

दाहावर शतावरीचा काढा दूध आणि थोडासा मध घालून कफ प्रकृतीसाठी, तर पित्त प्रकृतीसाठी साखर घालून द्यावा. ज्वरामध्ये शतावरीच्या मुळ्यांचा रस, गाईचे दूध आणि थोडी जिरे पूड


मिसळून द्यावा. शक्तीसाठी शतावरी चूर्ण दोन चमचे दररोज दुधातून द्यावे. आम्लपित्तावर शतावरीचे घृत खडीसाखरेबरोबर द्यावे. शतावरी मूत्ररोगांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. ओल्या शतावरीचा रस दुधातून द्यावा. ते शक्य नसेल तर काढा करून द्यावा. मुतखड्यावर शतावरीचा रस दिवसातून दोन वेळा, ८-१० दिवस द्यावा. शतावरीने सिद्ध केलेले दूध महिलांच्या श्वेत प्रदर या व्याधीसाठी उपयुक्त ठरते. शतावरीने सिद्ध केलेले दूध शक्तीसाठी सुद्धा उत्तम आहे. शतावरी चूर्ण काही दिवस राहिल्यास हवेमुळे घट्ट होते. त्यामुळे साखर घालून तयार केलेला शतावरीचा कल्प तथा हलवा दुधातून घेणे अधिक योग्य ठरते. मुतखड्यावर दिवसातून दोन वेळा शतावरीचा रस घेतल्यास आठ ते दहा दिवसात मुतखडा पडून जातो. मात्र त्यासाठी मुतखड्याचे स्थान आणि आकार याचा विचार करणे आवश्यक असते. या गोष्टी वैद्यांच्या सल्ल्यानेच कराव्यात हे उत्तम. शतावरीचे दुसरे नाव नारायणी आहे. त्यामुळे शतावरी पासून तयार केलेल्या तेलाला नारायण तेल असे म्हणतात. सांधेदुखीसाठी हे तेल अत्यंत गुणकारी आहे. सांध्यांच्या ठिकाणी सूज येऊन सांधे दुखत असतील तर हे नारायण तेल अत्यंत गुणकारी ठरते.

अशी ही मेधावर्धक, शरीर पुष्ट करणारी, डोळ्यांना हितकर अशी बहुगुणी शतावरी आपण आरोग्याचे नियम पाळून, दररोज सेवन केली तर ज्येष्ठांकडून नेहमी मिळणारा, शतायुषी भव हा आशीर्वाद नक्कीच खरा होईल !

या नवदुर्गांची सेवा करून, त्यांच्याकडून मिळणारा प्रसाद सेवन करून, आपण सर्वजण निरामय होऊया !!

सर्वेऽपि सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः ।।

## दीपावली रंगावली



दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !



# धन्वंतरी औषधालय

## FMCG सुपर स्टॉकिस्ट

**औषध व कॉस्मेटिकचे होलसेल विक्रेते**

४२६, चिंचवड रोड, गांधीनगर, कोल्हापूर ४१६ ११९

मो. नं. ८६२३८७२६७२

# मेसर्स वासुदेव कृष्णाजी आपटे

---

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

# कृष्णा मेडिलिंक एलएलपी

**आयुर्वेदिक व फार्मास्युटिकल**
**होलसेल विक्रेते**

८१५-२, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर. ४१६ ००१

०२३१ - २६५४४७२७

# आता तरी जागे होऊ या...

**कमला हर्डीकर**
मोबा. ९६८९३६९९२६

पावसाळ्यातील अंधाऱ्या रात्री संपल्यानंतर कोजागिरी पौर्णिमेपासून रात्रीही चांदण्याने उजळू लागतात. या पौर्णिमेपासूनच माणसाला अंधार दूर सारणाऱ्या प्रकाशाचे वेध लागतात. हा प्रकाशाचा उत्सव म्हणजे दिवाळी किंवा दीपावली ! तेजाचा पूजक होऊन जगा, सदैव अंधारातून तेजाकडे – प्रकाशाकडे जाण्याचा प्रयत्न करा. हा अंधार अज्ञानाचा असेल, अज्ञानाकडून ज्ञानाकडे जा ! हा अंधार आळसाचा असेल, आळस झटकून उद्योगी व्हा ! हा अंधार दारिद्र्याचा असेल, सारं बळ एकवटून, प्रयत्नांची पराकाष्ठा करून, दारिद्र्यावर मात करून समृद्धीकडे जा ! हा अंधार 'मी' पणाचा, अहंपणाचा, दुष्टपणाचा, उन्मत्तपणाचा असेल. हे सर्व दुर्गुण आपलं आयुष्य अंध:कारमय करतात. या दुर्गुणांचा त्याग करून आपलं आयुष्य उजळून टाका! मी पणा सोडून 'आम्ही' ही भावना जोपासा. मी एकट्यानं करून काय होणार? बाकीचे करतील की हा विचार सोडून द्या. समाजात मिसळा. समाजासाठी कांहीतरी करत संपूर्ण समाजजीवन प्रकाशमय करण्यासाठी झटा हे सांगते ही दीपावली ! स्वत:चं, समाजाचं आणि आपल्या पुढील पिढ्याचं जगणं सुसह्य व्हावं यासाठी उपलब्ध पाण्याचा अतिशय काळजीपूर्वक वापर करा. पावसाचं पळणारं पाणी अडवून ज्यांना शक्य असेल त्यांनी जमिनीत जिरवण्याचा, साठवण्याचा प्रयत्न करा. व्यक्तिगत पातळीवर तसेच गृहनिर्माण संस्थेद्वारे बोअरमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग करणं भावी पिढ्यांच्यासाठी अत्यावश्यक आहे या वस्तुस्थितीचा प्रकाश आपल्या डोक्यात पडावा यासाठीच या लेखाचा प्रपंच !

आपला मान्सूनप्रधान देश. वर्षातले चार महिने पुरेसा पाऊस पडला तर पुढील आठ महिने व्यवस्थित पार पडणार. शिवाय पुढचा पावसाळा वेळेवर म्हणजे किमान सात जूनपासून सुरू झाला तर ठीक, नाहीतर डोळ्याला पाणी. शिवाय पुढच्या पावसाळ्यापर्यंत उन्हामुळे धरणं, तलाव, नदी, विहिरी यांतील पाणी वाफ होऊन कमीतकमी होत जाणार म्हणजे ऐन उन्हाळ्यांत पाण्याच्या कमतरतेला तोंड यावं लागणार. शिवाय पाईप फुटणं, व्हाल्व नादुरुस्त होऊन पाण्याची प्रचंड प्रमाणात गळती होणं याही गोष्टी नित्याच्याच होऊन बसल्या आहेत असं म्हणणं फारसं वावगं ठरणार नाही. नळाला पाणी कमी यायला लागलं की घागर मोर्चा, रास्ता रोको करायला आम्ही तयारच !

गृहनिर्माण सोसायट्या, लहान मोठे बंगले इथं राहणारे लोक यांच्याकडून वीजेवर चालणाऱ्या छोट्या-मोठ्या मोटारी बसवून नळाचं पाणी खालच्या टाकीत भरून ते वरच्या टाकीत चढवलं जातं. इलेक्ट्रिक सेन्सर्सचा वापर करून टाकी भरून पाणी वाहून न जाण्याची प्रक्रिया सहजपणे आणि कमी खर्चात करता येते. बहुसंख्य घरांत नळाला पाणी आलं की प्यायचं पाणी आणि खर्चाचं पाणी भरणं हे गृहिणीचं रोजचं ठरलेलं काम असतं. दोन-तीन दिवसांनी सगळं पाणी ओतून दिलं जातं आणि यामागं पाणी शिळं झालं म्हणून ओतलं असा खुलासा दिला जातो. अन्नपदार्थासारखं पाणी कधीही

शिळं होत नाही आणि शिळं पाणी आरोग्याला अपायकायक नसतं.

कांही वर्षांपूर्वीपर्यंत सूर्य-चंद्र या देवतांना राहू-केतू हे दैत्य ग्रासतात, त्यामुळे ग्रहण होते असे मानून या काळात जप-साधना इ. केले जाई. त्याचप्रमाणे ग्रहणात हवा अशुद्ध होते म्हणून आजाऱ्यांनी, गरोदर स्त्रियांनी, वृद्धांनी ग्रहण पाहू नये, ग्रहणात बाहेर पडू नये असे सांगितले जात असे. हवा अशुद्ध होते त्यामुळे ग्रहण काळातील अन्न वापरले जात नसे. कहर म्हणजे घरांत घागरीत, तपेल्यात, पिंपात झाकून ठेवलेले पाणीही अशुद्ध होते या कारणांसाठी ग्रहण सुटल्यावर नगरपालिकेकडून पाणी पुरवठा केला जाई आणि हे पाणी यायच्या सुमारांस घरांतले सर्व पाणी ओतून टाकले जात असे. मग या ग्रहणकालांतील अशुद्ध हवेमुळे विहिरी, नद्या यातील न झाकलेले पाणी अशुद्ध होत नसेल का? अलिकडे पाण्याचा अपव्यय टाळणाऱ्या या गोष्टी कालौघात आपोआप बंद होऊ लागल्या आहेत.

एक नागरीक म्हणून आपण योग्य, मार्गाने पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी काहीतरी केलेच पाहिजे याचं भान प्रत्येक नागरिकाला आलंच पाहिजे. खरेतर खूप उशीर झाला आहे, पण आता तरी आपण जागे होऊ या असं म्हणावंसं वाटतं. प्रत्येकानं हे लक्षात घेतलं पाहिजे, की पाणी आहे तेवढंच राहणार आहे, पण सतत वाढणाऱ्या लोकसंख्येमुळं / औद्योगिक विकासामुळं पाण्याचं संकट, पाण्याचा तुटवडा सतत वाढतच जाणार. समुद्राच्या पाण्याचा विचार केला तर पृथ्वीवर पाणी भरपूर आहे असे म्हणता येईल. पण पृथ्वीवर असलेल्या एकूण पाण्यापैकी फक्त अडीच टक्के पाणी हे गोडे आहे. हे अडीच टक्के पाणी आपण पिण्यासाठी, स्वयंपाकासाठी, कपडे धुणे, भांडी धुणे, अंघोळ इ. साठी वापरतो तसेच उद्योग धंद्यामध्येही हेच पाणी वापरलं जातं.

आता या अडीच टक्के उपलब्ध पाण्याच्या विविध रूपाचं वर्णन केलं तर काय चित्र दिसतं पहा. या अडीच टक्के पाण्यापैकी अंदाजे पावणेदोन टक्के पाणी बर्फाच्या स्वरूपात असते, जे आपण सहजासहजी वापरू शकत नाही. धुके, दलदल या स्वरूपात ०.०१७५ टक्के पाणी राहते. हेही आपण वापरू शकत नाही. वरून न दिसणारे जमिनीच्या पोटातील पाणी अंदाजे पाऊण टक्का असते. विहीर, बोअरवेल यांच्या माध्यमातून हे पाणी आपण वापरू शकतो. पण जमिनीत पाणी न भरता, किंवा पाणी जिरू न देता केवळ विजेच्या मोटारी बसवून आम्ही जमिनीतील पाणी उपसत आहोत. यामुळे जमिनीच्या पोटातील पाणी कमी होत चालले आहे. जमिनीतील पाण्याची पातळी खाली खाली जात आहे. पूर्वी जिथे ५०-१०० फुटावर पाणी लागत असे तिथे आता ४००-५०० फूट खोदून सुध्दा समाधानकारक पाणी न मिळणे ही सर्वसामान्य गोष्ट होऊ लागली आहे.

नद्या, तलाव, धरण यातील पाणी जे आपण प्रामुख्याने वापरतो, ज्यावर आपण अवलंबून असतो ते एकूण उपलब्ध अडीच टक्क्यांपैकी केवळ ०.००७५ टक्के आपणास मिळते. थोडं साध्या भाषेत सांगायचं झाल्यास समजा तुमच्याकडे २५० पैसे आहेत तर त्यापैकी केवळ जेमतेम एक पैसा तुम्हाला मिळेल असा याचा अर्थ. खरतर निसर्ग पावसाद्वारे आपल्याला पुरेसे पाणी देतो, पण पाण्याचे योग्य व्यवस्थापन होत नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागते. पाणी प्रश्न निसर्गनिर्मित नसून तो मानवाने स्वतः निर्माण केला आहे आणि त्या प्रश्नाची सोडवणूक मानवाला स्वतः करायची आहे याची जाणीव ठेवून प्रत्येकानं जागं झालं पाहिजे असं म्हणावसं वाटतं.

या सर्व विवेचनावरून आपण उपलब्ध पाणी



सादर आहे महाराष्ट्राची अलौकिक परंपरा आणि समृद्धीचे प्रतीक
'जोंधळे माळ अलंकार' आता नव्या आधुनिक स्वरुपात!
नाविन्या
विभा
कलेक्शन
WHP
वामन हरी पेठे ज्वेलर्स™
सोनेरी क्षणांचे सोबती!®

- पगार पत्रक MS EXCEL मध्ये काढून कंटाळा आलाय ?
- Provident Fund Compliance ची कटकट होतीये का ?
- TDS, प्रोफेशन टॅक्स चे compliense ची कटकट होते आहे का ?
- कामगार विमा मध्ये गल्लत होते का ?
- खूप वेळ जात आहे का ? चुका होत आहेत का ?

यावर सरळ उपाय !

सरल पे पॅक सॉफ्टवेअर




इन्कम टॅक्स वेळेत भरण्यासाठी, टी. डी. एस. वेळेत फाईल करण्यासाठी सर्व प्रकारचे टॅक्स वेळेत भरण्यासाठी

सरल टी. डी. एस. सॉफ्टवेअर




रोजच्या व्यवसायातील जमा खर्च, बॅलन्स शीट यांचा सरळ ताळमेळ लागावा यासाठी एकमेव पर्याय

सरल बिलिंग सॉफ्टवेअर




UNIQUE COMPUTER SALES AND SERVICES | Relyon VISION FOR TOMORROW

लाईव्ह डेमोसाठी संपर्क : राजेश छत्रे 7030911566



अत्यंत काळजीपूर्वक, वाया जाऊ न देता काटकसरीने वापरले पाहिजे असे आग्रहाने नमूद करावेसे वाटते. प्रत्येकाने ठरवले तर वैयक्तिक पातळीवर आपण याचे पालन करू शकतो. या दीपावलीत त्या प्रकाशाच्या साक्षीने आपण कायमपणे 'पाणी वाया जाऊ न देता काटकसरीने वापरू' अशी मनोमन शपथ घेऊ या. तसेच पावसाचे पाणी जमिनीत मुरावे, केवळ वाहून जाऊ नये यासाठीही प्रयत्नशील राहू या !

वैयक्तिक पातळीवर प्रत्येक घरात आपण पाणी वाया जाऊ न देता, काटकसरीने वापरू शकतो. यासाठी कोणत्याही प्रकारची आर्थिक गुंतवणूक नको, केवळ इच्छाशक्ती पाहिजे. जर्मनीमध्ये पाण्याच्या बिलाची आकारणी घरात पुरवलेलं पाणी अधिक घरातून बाहेर गेलेल्या सांडपाण्याच्या बेरजेवर केली जाते. यावाच अर्थ पाण्याचा वापर कमी करा आणि सांडपाण्याचा पुन्हा वापर करा.

कपड्यातला मळ आणि साबण काढण्यासाठी कपडे थोडेसे आपटून आणि चोळून धुतल्यानंतर शेवटी कपडे पिळतो. हे कपडे पिळलेलं पाणी फरशी पुसणे, संडास, बाथरूम, बेसिन धुणे किंवा खरकटी भांडी वाळू नयेत म्हणून त्यावर घालू शकतो. भांडी आणि कपबशा धुतलेले पाणी झाडांना घालता येऊ शकते. घागर आणि पिण्याचं पाणी साठविण्याची भांडी आतून स्वच्छ असली म्हणजे झाल. ही भांडी बाहेरून चकचकीत दिसावीत म्हणून रोज बाहेरून खसखसून राखेनं, मातीनं इ. नी घासण्याची गरज नसते. हे पाणी वाया घालवणे आपण टाळू शकतो. थोड्या ओलसर कपड्याच्या वापरानेही हे काम करता येते. आपल्याकडे कोणी आल्यास पाणी पिण्यासाठी तांब्या आणि पेला द्या. म्हणजे पाणी फुकट न जाता पाहिजे तेवढे पाणी पेल्यात ओतून घेऊन पिता येईल. कांही वेळा ट्रे मधून काचेचे ग्लास भरून दिले जाते. ग्लासातील सर्व पाणी ती व्यक्ती पिणार नसेल तर ते उरलेले चांगले पिण्याचे पाणी फुकट जाते. घरात पांच सहा माणसे असतील तर प्रत्येकाचा पाणी पिण्याचा पेला स्वतंत्र ठेवावा, पाणी पिऊन झाले कि त्याने आपला पेला पालथा घालून ठेवावा. यामुळे दर वेळेला पाणी पिऊन झाल्यावर पेला धुवून ठेवायला लागणारे पाणी वाचेल.

कोणताही नळ गळत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. तो लौकरात लौकर दुरुस्त करून घ्या. पाणी थेंबथेंब तर गळतय. काय एवढं त्याचं असा जराही विचार करू नका. नळ दुरुस्त होईतोवर नळाखाली बादली ठेवा. काही तासात बादली पाण्यानं भरत आलेली दिसेल. विचार करा दिवसा काठी अशा दोन तीन बादल्या पाणी वाया जाऊ देणं योग्य आहे का? हात धुण्यासाठी किंवा भांडी विसळायला नळ पूर्ण सोडू नका. त्याची गरज नसते. पाण्याची धार जेवढी बारीक तेवढं भांडं योग्य प्रकारे हात फिरवून विसळता येतं. नळ मोठा सोडल्यानं

पाणी फुकट तर जातच, शिवाय ते पाणी इकडंतिकडं उडतही. प्रत्येकवेळी नळ नीट बंद करण्याची काळजी घ्या.

बहुतेक वेळेला भांडी घासायला सुरुवात केली की मोठा नळ सोडून नळाखाली बादली ठेवायची. सहाजिकच लक्ष भांडी घासण्याकडे आणि तिकडे बादली पाण्याने ओसंडून वाहात असते. जो प्रकार भांडी घासताना तोच धुणं धुताना. एकदा नळाखाली बादली लावली की सर्व कपडे धुवून होईतोवर नळ सुरूच असतो. पाण्याने वाहणाऱ्या बादलीत कपडा बुडवून पिळून बाजूला टाकला जातो. धुणं संपल्यावरच नळ बंद होतो आणि भरलेली बादली ओतून मोकळी केली जाते.

पाण्याच्या वापराबाबत जागतिक पातळीवर अभ्यास झाला आहे. यात असे नोंदविले गेले आहे कि एखादे काम जेवढ्या पाण्यात व्हावयास पाहिजे त्याच्या नऊपट पाणी भारतात वापरले जाते. याचाच अर्थ असा की ज्यांना पाणी उपलब्ध आहे ते ९० टक्के पाण्याचा गैरवापर करतात. वॉशिंग मशिनच्या वापराने पाण्याचा अपव्यय टळतो. आपलं शरीर पूर्णपणे कार्यक्षम राहण्यासाठी शरीरात पुरेसं पाणी पाहिजेच. आपल्या शरीरात किमान साठ टक्के पाणी, रक्तात ऐंशी टक्के आणि मेंदूमध्ये सत्तर टक्के पाणी असावे लागते. पाणी ही निसर्गानं आपल्याला दिलेली अमूल्य देणगी आहे आणि म्हणून त्यावर प्रत्येकाचा हक्क आहे. प्रत्येकाला किमान पाणी मिळालेच पाहिजे याची जाणीव प्रत्येक व्यक्तीला हवी. वाढणारी लोकसंख्या, झपाट्याने होणारी वृक्षतोड, नवीन झाडे लावणे आणि ती जगवणे याबद्दलची उदासिनता, यामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. पावसाळ्यासह सर्वच ऋतू अनियमित होत आहेत. दिवसेंदिवस पावसाळ्याचे दिवस कमी होत आहेत, पावसाळ्याचा कालावधी तीन ते चार महिने मानला जातो, पण हल्ली पावसाळा जेमतेम २०-३० दिवस होतो असे म्हणावे लागेल. पावसाळ्यासह सर्वच ऋतू अनियमित आणि बेभरवशाचे होण्यासाठी मानवच कारणीभूत आहे ही वस्तूस्थिती नाकारता येत नाही.

सिंगापूर सारख्या देशात सांडपाण्यावर प्रक्रिया करुन, शुद्ध करून इतर कामासाठीच नव्हे तर पिण्यासाठीही वापरले जाते. आपल्या देशातही आज ना उद्या हे करावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपल्या देशाच्या लोकसंख्या वाढीचा वेग पाहता आपण लोकसंख्येबाबत जगात पहिल्या क्रमांकावर गेलो, पण पाणी आहे तेवढेच राहणार.

एकदा अशीच पाणी वापराबाबत चर्चा चालली असता, माझे एक स्नेही म्हणाले- अहो जिच्या हातात पाणी वापराची नाडी असते ती स्त्रीच


॥ श्री ॥

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

**हृषिकेश भालचंद्र लिमये**

**विमा व कर्ज सल्लागार**

**सर्व विम्याची आणि कर्जाची कामे करून देऊ.**
**अकांउंटस्, करविषयक सल्ला आणि मार्गदर्शन**

पत्ता : 203, भोपेराव मॅन्शन, 2284, डी वॉर्ड, शुक्रवार पेठ,
कोल्हापूर - 416 002. संपर्क : 9404260470, 7304507400

याबाबतत विचार करत नाही. दूर कशाला? आमच्या घरातच मी आमच्या बायकोपुढं हात टेकले आहेत. गणपती उत्सवापूर्वी दोन-चार दिवस आधी त्या घरातलं अंधरुण-पांघरुण, पडदे, खरं तर कपडा आणि कपडा धुतात आणि त्यानंतर लगेच पुन्हा एक महिन्याच्या आत येणाऱ्या नवरात्रोत्सवाच्या आधी पुन्हा तोच कपडे धुण्याचा साग्रसंगीत कार्यक्रम ! यासाठी लागणारा साबण, पाणी आणि तिचे कष्ट वेगळेच.

आमच्या घराघरातल्या स्त्रीला पाण्याचं महत्व कळावं म्हणून गणेशोत्सवात गौर येते. गणपती म्हणजे नेतृत्वाचं प्रतिक, गौर म्हणजे नवीन पाण्याची पूजा. भारत हा मान्सूनप्रधान देश आहे. वर्षातले चार महिने पाऊस पडला तर पुढचे आठ महिने पाणी, नाहीतर डोळ्याला पाणी अशी अवस्था होऊ शकते. भाद्रपद महिन्यात मोसमी पाऊस - पावसाळा जवळ जवळ संपत आलेला असतो. नद्या, नाले, ओढे, विहिरी भरलेल्या असतात. हे पाणी आणून त्या पाण्याची पूजा करायची आणि गणपती विसर्जना-बरोबर ते पाणी पुन्हा जलाशयात नेऊन ओतायचं. पाणी हेच जीवन आहे. पाणी अमूल्य आहे. तुमची मौल्यवान वस्तू तुम्ही किती काळजीनं संभाळता? आपली अमूल्य वस्तू सांडू नये म्हणून तुम्ही किती काळजी घेता ना? तशीच काळजी दर दिवशी प्रत्येक क्षणाला पाणी वापरताना घ्या. हा संदेश गौरीला पाण्याचं पूजन करणाऱ्या प्रत्येक गृहिणीला गौरीच्या माध्यमातून सांगितला आहे. पाणी ही नैसर्गिक साधन संपत्ती आहे. निसर्गानं पाणी हे मानवाला दिलेले वरदान आहे. माणूस पाणी निर्माण करू शकत नाही. पाणी हा निसर्गातील मौल्यवान दागिना आहे. निसर्गाचं ते सर्वश्रेष्ठ लेणं आहे. अधाशीपणानं हे लेणं ओरबाडून घेऊ नका. आजचा तुमचा अविचारीपणा तुमच्या पुढच्या पिढ्यांचं जगणं असह्य करेल.

तिसरं महायुध्द झालं तर ते पाण्यावरून होईल अशी आज भीती व्यक्त केली जाते. विचारवंत, निसर्गमित्र आणि पर्यावरणवादी पाण्याचा अपव्यय टाळा, पाणी काटकसरीने वापरा, पावसाचं पाणी थेंब आणि थेंब वापरात आणा, जमिनीतील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी युध्द पातळीवर प्रयत्न करा असं सांगत आहेत.

शेती, वीजनिर्मिती, उद्योगधंदे, स्वच्छता, आरोग्य या सर्व गोष्टी विपुल आणि स्वच्छ पाण्यावर अवलंबून आहेत. आपण पाणी निर्माण करू शकत नाही हे जरी खरे असले तरी पाणी वाचवणे, पाण्याचा अपव्यय टाळणे म्हणजे पाण्याची निर्मितीच होय असे म्हणता येईल.

आम्हाला भरपूर पाणी दैनंदिन वापरासाठी देणं हे सरकारचं काम आहे. सरकार बघेल. पालिकेची ही जबाबदारी आहे. मी कशाला या गोष्टींचा विचार करू? मी एकटीनं करून काय उपयोग? बाकीचे कुठं काय करतात? असा विचार करत राहू नका. मी तर पाण्याचा अपव्यय टाळणारच, पण या संदर्भात इतरानाही सांगत राहेन. मग मला त्यासाठी वाईटपणा आला, दोष पत्करावा लागला तरी चालेल. पुढच्या पिढीच्या जगण्यासाठी, अस्तित्वासाठी आपण सारेजण दैनंदिन जीवनात पाण्याचा अपव्यय टाळून पाणी काटकसरीने वापरू या ! अजून फार उशीर झाला नाही तोवर जागे होऊ या. आणि पाण्याचा अपव्यय टाळण्याबरोबरच पाणी जिरवणं आणि पाणी प्रदूषण टाळणं हेही करू या !

मानवाने भूजलाचा उपसा फार वेगाने करून जमिनीचे पोट रिकामे करणे सुरू केले आहे. पण पुन्हा जमिनीत पाण्याचे पुनर्भरण करणे टाळत आहे. अंगणात फरशा, डांबरीकरण आणि सिमेंटचे रस्ते यामुळे पावसाळ्यांत जमिनीत पाणी जिरण्याची क्रिया

फारच वेगाने कमी होत आहे. वैयक्तिक पातळीवर आपल्या घराच्या अंगणात किंवा गृहनिर्माण सोसायटीच्या बाहेरील आवरांत उताराची जागा पाहून काळी माती संपून मुरुमाचा थर लागेतोवर लहान मोठा खड्डा खणून त्यांत साठलेले पावसाचे पाणी जमिनीत सहजासहजी मुरत राहते, पण हे करण्यासाठी इच्छाशक्तीचे पाठबळ हवे. जमिनीतून खूप खोलातून पाणी उपसल्यास खोलवर असलेली विविध रसायने पाण्यात मिसळून पाणी प्रदूषित होते आणि अशा पाण्यामुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होतात.

वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, शहरीकरण, डिटर्जंट साबणांचा वापर, रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर यातील घटक पाण्यात मिसळतात. शेतीमध्ये युरिया, फॉस्फेट, सल्फेट, पोटॅश इ. रासायनिक खतांचा वापर खूप मोठ्या प्रमाणात केला जातो. पावसाबरोबर हे घटक नदीचे, विहिरींचे पाणी प्रदूषित करतात. खतांच्या जोडीला कीटकनाशके, रोगनाशके, तणनाशके यांचाही वापर होतो. 'DDT' या कीटकनाशकाचे मुलभूत घटक अगदी मानवी आईच्या दुधातही आढळून येतात. मानवी शरीरातील यकृत, पचनसंस्था, मेंदूची कार्यक्षमता यावर या घटकांचे गंभीर परिणाम होतात.

पाण्याचे प्रदूषण होण्याची मुख्य कारणे अनेक आहेत. घरांघरांतील सांडपाणी, मल-मूत्र, मृत जनावरे, कत्तलखान्यांतील टाकाऊ पदार्थ इ. सर्व गोष्टी पाणलोट क्षेत्रात आणि थेट नदीतही सोडल्या जातात. विषारी आणि घातक रसायने असलेले कारखान्यांचे सांडपाणी तलावात, नदीत कोणतीही प्रक्रिया न करता सोडले जाते. अर्थात या सर्व गोष्टी टाळणे प्रशासनाने मनावर घेतले पाहिजे. काय करायचं ते प्रशासन बघेल. आम्ही काय करणार? आमच्या हातात काय आहे? असे म्हणत हातावर हात ठेवून स्वस्थ बसणं सुजाण नागरिकाला निश्चितच शोभणार नाही. आपल्या पातळीवर कचरा योग्य ठिकाणी टाकण्याची, देण्याची आपली जबाबदारी आहे हे प्रत्येकाने ध्यानांत घेतले पाहिजे. तसेच पाण्याचे प्रदूषण करणाऱ्या गोष्टी शासनाच्या, संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्याचे निराकरण करण्यासाठी आपण एकत्रितपणे प्रयत्न करण्याइतकी जागरुकता आपल्यामध्ये स्वत:च्या आणि पुढील पिढीच्या आरोग्यदायी जगण्यासाठी निश्चितच स्वत:मध्ये निर्माण केली पाहिजे. अजूनही वेळ गेलेली नाही, आता तरी जागे होऊ या !



करवीर नगरीत गेली २७ वर्षे गतिमान व तत्पर सेवा देणारी एकमेव

**LG शोरूम**

Life's Good

चाहुल दिवाळीची एलजी संगे

**०% व्याजाने व सुलभ हप्त्याने**

**घरातील कोणतीही जुनी इलेक्ट्रॉनिक वस्तू देवून त्याची भरघोस किंमत वसूल करा.**

**बदल्यात नवीन LG LED घरी न्या.** (ही योजना फ्रीजसाठीही लागू)

**जोशी इलेक्ट्रॉनिक्स**

**(LG Exclusive Showroom)**

वांगी बोळ, महाद्वार रोड, कोल्हापूर. फोन. २६२७७११ मोबा. ९४२१११०८३०

# आर्थिक गडबड घोटाळे
# प्रकाशातले आणि अंधारातले

•

**श्रीकांत शिंत्रे**
शब्दांकन **सौ. ज्योत्स्ना शिंत्रे**
मोबा. ९९२००५८७०५

एकदा एका राज्यातील एक नोकर लाच खाणारा म्हणून प्रसिद्ध होता. पण खूप हुशार. कधी पकडला मात्र जायचा नाही. राजाला त्याचे काय करायचे ते समजतच नव्हते. म्हणून राजाने त्यांची नेमणूक समुद्र किनाऱ्यावर केली आणि त्याला सांगितले की, येथे तू समुद्रावर देखरेख ठेवत जा. तेथून फक्त कोळी मासेमारीकरता जात असत. त्याला किनाऱ्यावर एक चौकीही बांधून दिली. राजाला वाटले की आता हा माणूस लाच कुठून खाणार? याला तर फक्त समुद्रावर देखरेख ठेवण्याचे काम दिले आहे. परंतु राजाच्या हेरखात्याने परत त्याच्याबद्दल लाचखोरीचे अहवाल द्यायला सुरुवात केली. राजाला कळेना आता हा लाच कशी खातो. त्याने कोळ्यांना बोलावले आणि विचारले. कोळी सांगू लागले, ''महाराज जेव्हा आम्ही समुद्रात मासेमारी करता होडी घालतो तेव्हा, हा माणूस आम्हाला अटकाव करतो. म्हणतो 'राजाने मला समुद्रावर देखरेख ठेवायला नेमले आहे. म्हणजेच समुद्राच्या लाटाही मोजणे आलेच. तुमच्या होड्यांमुळे लाटा मोडतात आणि महाराजांना मला योग्य अहवाल देता येत नाही.' आता मासेमारी आमचा पोटापाण्याचा धंदा, मग त्याशिवाय आमचा उदरनिर्वाह होणार कसा? मग समुद्रावर जाताना आणि येताना आम्ही त्याला चिरीमिरी देतो आणि आमचे काम होते. तो आम्हाला समुद्रावर जाऊ देतो !''

थोडक्यात काय भ्रष्टाचारी माणूस भ्रष्टाचाराचे मार्ग शोधतोच. आपण या लेखात आजच्या युगातले आर्थिक गडबड घोटाळे बघणार आहोत, मुख्यतः गुन्हेगारांनी कशा प्रचलित पद्धतीमधील त्रुटी शोधून कसे पैसे कमावले ते. अर्थात बहुतेक गुन्हेगार पकडले गेलेच, पण तोपर्यंत सरकारचे/संस्थाचे/जनतेचे झालेले नुकसान काही पूर्णपणे भरून निघाले नाहीच.

**हर्षद मेहता घोटाळा आवाका रु. ४००० कोटी – १९९२ – एक शेअर दलाल**

घोटाळ्याची पार्श्वभूमी अशी –

बँकांना आपल्या ठेवींपैकी काही रक्कम सरकारी रोख्यांमध्ये ठेवावी लागते. जेव्हा बँकांच्या ठेवी वाढतात तेव्हा जास्त सरकारी रोखे घ्यावे लागतात. पण प्रत्यक्ष रोखे खरेदी न करता बँकांना रेडी फॉरवर्ड डील (आरएफडी) करण्याची मुभा असते. आरएफडी म्हणजे अल्प मुदतीचे एका बँकेने दुसऱ्या बँकेला दिलेले कर्ज. त्यामागे सरकारी रोख्यांचे पाठबळ असते. हे कर्ज बँक रिसिटच्या रूपात नोंदले जाते (बी.आर.) बी.आर. म्हणजे एक प्रकारची प्रॉमिसरी नोटच. ज्यानुसार कर्ज घेणारी बँक कर्ज देणाऱ्या बँकेला सरकारी रोखे, रोख रकमेच्या

बदल्यात काही विशिष्ट दिवसानंतर थोड्याशा जास्त किमतीला विकणार असते. प्रत्यक्ष रोख्यांची अदलाबदल होतच नाही, पण मुदत संपल्यावर कर्ज घेणारी बँक कर्ज परत करते आणि हा व्यवहार झाल्यावर, बी.आर. रद्द करून कर्ज घेणाऱ्या बँकेला परत केल्या जातात. या पद्धतीत दलाल हे मध्यस्थांचे काम करत असत. ही पद्धत बेकायदेशीर होती. परंतु आर.बी.आय. कानाडोळा करत होती. हर्षद मेहताने कर्ज परत करणाऱ्या बँकेला स्वतःच्या नावे चेक द्यायला लावले. म्हणजे परतफेडीचे पैसे हर्षद मेहतांच्या नावे जमा होत असत आणि तो ते पैसे स्टॉक मार्केटमध्ये लावत असे. अशा रीतीने स्टॉक मार्केटमध्ये पैसे लावून त्याने काही शेअरच्या किंमती फुगवल्या. इतक्या की A.C.C. या कंपनीच्या शेअरचा भाव दोन महिन्यात रु २०० वरून रु. ९००० वर गेला. याशिवाय काही बँकांशी - बँक ऑफ कराड, मेट्रोपॉलिटन सहकारी बँक - संगनमत करून त्या बँकांना बनावट बी.आर. बनवायला लावल्या, ज्यांच्या मागे सरकारी रोख्यांचे पाठबळ नव्हते, त्याही मार्केटमध्ये आल्या.



हर्षद मेहताच्या छानछोकीच्या वागणुकीमुळे, श्रीमती सुचेता दलाल या पत्रकाराचे त्याच्याकडे लक्ष वेधले गेले. तिने चौकशी केली आणि २३.०४.९२ रोजी टाइम्स ऑफ इंडियामध्ये एक लेख लिहून हा घोटाळा उघडकीस आणला.

सर्वत्र हाहाकार उडाला. शेअर मार्केट कोसळले. त्यामुळे लोकांचे अपरिमित नुकसान झाले. भरभराटीच्या काळात मेहताला शेअर मार्केटचा अमिताभ बच्चन म्हटले जात असे. जेव्हा तो शेअरच्या किंमती वाढवत होता, तेव्हा सर्वसामान्य लोक शेअर मार्केटकडे आकर्षिले गेले. इतके की मुंबईच्या नाक्यावरचा पानवाला पण शेअरमध्ये गुंतवणूक करू लागला. छोट्या छोट्या धंदेवाल्यांनी Quick Profit मिळवण्याच्या उद्देशाने आपले धंद्यातले भांडवल सुद्धा, धंद्यातून काढून शेअर मार्केटमध्ये गुंतवले. त्यांचे पैसे बुडाले आणि धंद्याला भांडवलाची कमतरता भासू लागली आणि वांधे झाले.

जेव्हा बोगस बी आर. चे पैसे कर्ज देणाऱ्या बँका मागू लागल्या तेव्हा त्यांना ना पैसे मिळाले ना सरकारी रोखे. अर्थात मेहताला तुरुंगवासाची शिक्षा झाली आणि तुरुंगातच तो मरण पावला.

या सगळ्या गोष्टीचा परिणामस्वरूप शेअर मार्केटमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एन.एस.इ.) तसेच सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (से.बी.) ची स्थापना करण्यात आली.

अर्थात भ्रष्टाचारी माणसांची या जगात कोणत्याही काळात कमतरता नसते. अशी माणसे भ्रष्टाचाराचे नवनवीन मार्ग कसे शोधून काढू शकतात याचे उदाहरण म्हणून सुरुवातीची गोष्ट मी सांगितलीच आहे. आता सध्या सिक्युरिटी मेझर घेणे अपेक्षित असलेल्या सेबी सारख्या संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती माधवी बूच यांच्याच व्यवहाराची चौकशी करण्याची वेळ आलेली आहे !

**अब्दुल करीम तेलगी, घोटाळ्याचा आवाका रु. ३०००० कोटी – २००३ – एक स्टॅम्प व्हेंडर**

घोटाळा असा घडला

सुरुवातीला बनावट पासपोर्ट बनवण्याचा धंदा. त्यात अटक आणि तुरुंगवास.

तुरुंगातून सुटल्यावर १९९४ मध्ये तत्कालीन महसूल मंत्री श्री. विलासराव देशमुख यांची ओळख काढून स्टॅम्प व्हेंडरचा परवाना मिळवला. मग बनावट स्टॅम्प पेपर बनवण्याचे ठरवले. १९९४ मध्ये इंडियन सिक्युरिटी प्रेसमधून प्रिंटिंग मशीनरी भंगार म्हणून काढलेली विकत घेतली. त्यात दुरुस्ती करून हुबेहूब तंतोतंत अधिकृत स्टॅम्प पेपरसारखे बनावट स्टॅम्प पेपर छापायला सुरुवात केली.

संपूर्ण स्टॅम्प पेपर व्यवसायाचा अभ्यास केला असता लक्षात आले की, स्टॅम्पिंग केलेली १५% कागदपत्रे सब-रजिस्ट्रार कडे नोंदवावी लागत नाहीत. याचा फायदा उठवला. बारा राज्यात मिळून ३०० एजन्ट नेमले आणि २०% कमिशन देऊन हे बनावट स्टॅम्प पेपर विकायला सुरुवात केली.

इंडियन सिक्युरिटी प्रेसच्या कर्मचाऱ्यांना लाच दिली. स्टॅम्प पेपरचे कृत्रिम दुर्भिक्ष्य निर्माण केले आणि मग याच्या धंद्याला बरकतच आली.

भरपूर राजकारणी, सरकारी अधिकारी आणि पोलीस अधिकाऱ्यांना पैसे चारून मिंधे करून ठेवले होते आणि याचा धंदा सुखेनैव चालू होता.

अशा प्रकारचे लोक जशी पैशाची उधळपट्टी करतात तशी यानेही सुरू केली. २००२ मध्ये मुंबईमध्ये एका डान्स बारमध्ये एका बारबालेवर ९० लाख रुपये उधळले आणि हा सगळ्यांच्याच प्रकाशझोतात आला.

याअगोदर १९ ऑगस्ट २००० मध्ये, बनावट स्टॅम्प पेपरची वाहतूक करणारी दोन माणसे बंगलोर येथे पकड गेली आणि त्यांची चौकशी करता करता सगळे धागे दोरे तेलगीपर्यंत पोहोचले आणि हा घोटाळा उघडकीस आला.

चौकशीच्या दरम्यान, घोटाळ्याची व्याप्ती रु. ३०००० कोटीपर्यंत आहे हे लक्षात आले आणि शेवटी सरकारला निर्णय घ्यावा लागला की हे बनावट स्टॅम्प पेपर वापरून जे दस्तऐवज बनवण्यात आले असतील ते अधिकृत समजण्यात येतील.

तेलगीला अटक झाली, तुरुंगवास झाला आणि तुरुंगातच तो मरण पावला. या घोटाळ्यानंतर स्टॅम्प पेपरच्या संदर्भात आमूलाग्र सुधारणा करण्यात आल्या. फ्रँकिंग मशीन वापरण्यात येऊ लागले. स्टॅम्प पेपर रेकॉर्ड डिजिटायझेशन करण्यात आले.

**नीरव मोदी (आणि त्याचा मामा मेहुल चोकसी), घोटाळ्याचा आवाका रु. १४०००, कोटी – २०१८**

नीरव मोदी हा हिऱ्याचा व्यापारी. अतिशय श्रीमंत. २०१७ सालच्या फोर्ब्सच्या धनवानांच्या यादीत ५७ वा क्रमांक, जगभर हिऱ्याच्या विक्रीची दुकाने. असे झाले की –

पंजाब नॅशनल बँकेमध्ये भली मोठी कर्जाची लिमिट होती त्या काळामध्ये बँका आयातदारच्या वतीने भारतीय बँकांच्या परदेशी शाखांना हमीपत्रे देत असत. ज्यानुसार हमीपत्र देणारी बँक ही मालाची आयात ९० दिवसाच्या उधारीवर भारतात करणाऱ्याला परवानगी देत असे आणि जर आयातदाराने ९० व्या दिवशी उधारी चुकती केली नाही तर पैसे देण्यास बांधील असे. अशा हमीपत्राना Letter Of Undertking म्हणत असत.

नीरव शहाने, पंजाब नॅशनल बँकेचा उपमहाप्रबंधक, श्री. गोकुळनाथ शेट्टी याला पैसे चारून आपल्या बाजूने करून घेतले आणि २०११ पासून अशी बोगस हमीपत्रे आपल्या वतीने द्यायला

सुरुवात केली. हा उद्योग पुढे ७४ महिने चालू होता. अशी १२१२ हमीपत्रे देण्यात आली. हमीपत्रानुसार भारतात मोती आयात करायचे होते. ९० दिवसाच्या परतफेडीच्या बोलीवर वरील अधिकाऱ्यांनी सांकेतिक भाषा वापरून ही हमीपत्र जारी केली होती. त्यामुळे प्राप्तकर्त्या बँकेला – अलाहाबाद आणि ॲक्सिस बँक – संशयाला वाव नव्हता. पण या व्यवहाराची नोंद बँकेच्या रेकॉर्डमध्ये करण्यात आली नाही. त्यामुळे ऑडिटरनाही सुगावा लागला नाही. आयात न करता या हमीपत्रांचा उपयोग अवैध व्यवहार करण्याकरता झाला. ९० व्या दिवशी अर्थात नीरव मोदीने पैसे परत केलेच नाहीत. वरील बँकांनी पंजाब नॅशनल बँकेकडे जेव्हा पैशाचा तगादा लावला तेव्हा घोटाळा उघडकीला आला. तोपर्यंत खूप उशीर झाला होता. मामा भाचे दोघेही भारतातून परागंदा झाले आणि सध्या इंग्लंडमध्ये आहेत आणि त्यांना भारतात परत आणण्याची कारवाई चालू आहे.

या व्यवहाराचा पंजाब नॅशनल बँकेला खूपच आर्थिक फटका बसला. नीरव मोदींची भारतातील मालमत्ता जप्त करून विकली तरी फक्त रु. ६०० कोटीपर्यंतच पैसे वसूल झाले आणि बाकीचे पैसे नुकसान खाती टाकावे लागले. परंतु येथे हे नमूद करायला हवे की ज्या भारतीय बँकांच्या परदेशी शाखांना ही हमीपत्रे जारी करण्यात आली होती. त्या सर्वांना पंजाब नॅशनल बँकेने त्यांचे पैसे परत केले.

हा घोटाळा उघडकीस आल्यावर लगेचच आर.बी.आय. ने अशी लेटर ऑफ अंडरटेकिंग देण्यास बँकांना बंदी घातली, जी आजतागायत कायम आहे.

**पंजाब अँड महाराष्ट्र को–ऑप बँक लिमिटेड घोटाळा आवाका रु. ४००० कोटी – २०१८**

ही १३७ शाखा असलेली ६ राज्यात विस्तारलेली अंतरराज्यीय अग्रगण्य सहकारी बँक. गडबड अशी झाली –

हौसिंग डेव्हलपमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (एच.डी.आय.एल.) चे प्रमुख राकेश आणि सारंग वाधवा आणि बँकेचे अध्यक्ष श्री. सिंग हे शाळा सोबती होते. या ओळखीवर बँकेने या कंपनीला रु. ६६०० कोटी कर्ज दिले, जे बँकेच्या एकूण कर्जापैकी ७३% होते. अशा रीतीने आर.बी. आय. चे नियम धाब्यावर बसवले. हा कर्ज देण्याचा प्रकार २००८ पासून चालू होता. ही कर्जे आर.बी.आय. पासून आणि ऑडिटर पासून लपवण्यात आली. २१०४९ खोटी खाती उघडून त्यात ही कर्ज दाखवली. ही कंपनी पुढे दिवाळखोरीत गेली. सप्टेंबर २०१९ मध्ये ही फसवणूक उघडकीला आली. बँकेचे व्यवस्थापकीय संचालक श्री. थॉमस यांनी आर.बी.आय. ला पत्र लिहून या फसवणुकीची कबुली दिली.

परंतु हा व्यस्थापकीय संचालक सुद्धा या फसवणुकीत सामील होता. पुढे तपासात असे आढळून आले की, याने पुण्याला १० मालमत्ता विकत घेतल्या होत्या. शेवटी जानेवारी २०२२ मध्ये या बँकेचे युनिटी स्मॉल फायनान्स बँकेमध्ये विलीनीकरण करण्यात आले आणि हे प्रकरण संपले.

मी वर गेल्या तीस–चाळीस वर्षामध्ये आर्थिक जगतामध्ये झालेल्या ठळक गडबड घोटाळ्यांची माहिती दिली आहे. याबाबत त्या त्या काळात वर्तमानपत्रांमध्ये विस्तृत लिहून आले होतेच. परंतु संक्षिप्त स्वरूपात लिहून मी वाचकांच्या आठवणींना उजाळा दिला एवढेच.

या व्यतिरिक्त अनेक घोटाळे होतच असतात. परंतु काही घोटाळे उघडकीला आले तरी जास्त प्रसिद्ध पावत नाहीत एवढेच. त्यांची व्याप्तीही छोटी

देवघर™



ज्या घरात
असतं **देवघर**

त्याच घराला
असतं **घरपण**

**City :** Shop No. 5, Gokul Nagar Society, Opp. I. D. B. I. Bank,
Dnyaneshwar Paduka Chowk, F. C. Road, Shivaji Nager, Pune - 05

**Mandar Marathe: + 91 7030877881**

---

**Aundh :** "Devghar", Shop No. 4, S.N. 2/1/1, Below City International School, Raviraj App,
Near Cosmos Bank, Aundh, Pune, Maharashtra 411007.

**Rohan Golivadekar: + 91 7030877883** | **Shakun Dindore: + 91 7030877882**

---

**Thane:** "Devghar", Shop No. 3, Haridarshan Soc, Mahatma Gandhi Rd,
Opposite Naupada Post Office, Police Station, Thane, Maharashtra 400602.

**Dipesh Shah: + 91 9930280750**


|| SHREE ||
HAPPY DIWALI AND PROSPEROUS NEW YEAR
From
LIGHTS OF LIFE
Happy Diwali
Director Dr. VIDYA SUDHIR BHAT
Dura Magnets Pvt. Ltd.
H-1, Old M.I.D.C.
SATARA 415 004. MAHARASHTRA. INDIA.
Ph. No. : 02162 - 244480 / 245780 Mob. 9529177864
Email : duramagnets@gmail.com
Website : www.duramagnets.com


Follow us @bedekar_official
सणासुदीचा आनंद साजरा करा
किंवा रोजचा दिवस खास बनवा, तो ही झटपट!
बेडेकर बेसन लाडू मिक्स
बेडेकर इन्स्टंट चकली भाजणी
बेडेकर चिवडा मसाला
Bedekar
BESAN LADOO MIX
Bedekar BESAN LADOO MIX
बेडेकर
इन्स्टंट चकली भाजणी
बेडेकर
चिवडा मसाला
बेडेकर
स्वादिष्ट उत्पादने
व्ही. पी. बेडेकर ॲण्ड सन्स प्रा. लिमिटेड
56, घारपुरे पथ, गिरगांव, व्ही. पी. बेडेकर मसालेवाले चौक, मुंबई - 4.
info@vpbedekar.com
bedekar.sales@gmail.com
www.vpbedekar.com

असते आणि त्यामुळे त्यांना बातमीमूल्य नसते याबाबतही थोडेसे –

मुंबई, पुणे, कोल्हापूर अशा शहरांमध्ये रिक्षा कर्जाची मोठी फसवणूक चालते आणि बहुतांश, छोट्या नागरी सहकारी बँका यामध्ये गुंतलेल्या असतात. हे रिक्षा चालक तळागाळातल्या समाजातील असतात. थोडेसे अडाणीच आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल. या लोकांची स्वतः रिक्षा विकत घेण्याची इच्छा असते, पण क्षमता नसते आणि कर्ज घ्यावे म्हटले तर बँकेत ओळख नसते. शिवाय बँकेतून कर्ज जरी मंजूर झाले तरी कर्जाच्या १०% रक्कम तरी स्वतः भरायला लागते (मार्जिन मनी), तीही नसते. अशा वेळी काही एजन्ट पुढे येतात. रिक्षा चालकाला लालूच दाखवतात की ते बँकेकडून कर्ज मंजूर करून देतील. आणि ते एजन्ट बँकेशी संपर्क करतात. आश्वासन देतात की तुम्ही या रिक्षा चालकांना कर्ज द्या, वसुलीची जबाबदारी त्यांची. जर कर्जदाराने हप्ते नाही भरले तर ते स्वतः हप्ते भरतील. बँक या आश्वासनाला भुलते आणि मग एजन्ट सांगेल त्याला कर्ज मंजूर करते. बऱ्याच वेळा हे कर्ज रिक्षाच्या डीलरला न देता एजन्टच्या खात्यावर जमा होते. एजंटनेच बऱ्याच वेळा मार्जिन मनी भरलेली असते. तसेच रिक्षाचे हुड आणि उपकरणे चढ्या भावात रिक्षावाल्याला विकलेले असते. तसेच आर.टी.ओ मधून पासिंग करून घेण्याची जबाबदारी घेतलेली असते, रिक्षाचा विमा काढलेला असतो. या सर्वांची किंमत रिक्षावाल्याकडून ते वसूल करतातच, बँकेच्या कर्जातून वळते करून. पण याशिवाय एजन्टला प्रत्येक रिक्षामागे रु. ३००० तरी नगद फायदा होतो. वसुलीची जबाबदारी एजंटने घेतलेलीच असते. वसुली करताना ते कमिशन वसूल करतात आणि त्यांनी स्वतः लावलेली रक्कम वसूल करतात आणि थोडी बँकेची पण वसूल करतात. सुरुवातीला बँकेचे हप्ते अगदी व्यवस्थित भरत असतात. त्यामुळे एकामागोमाग एक बँक कर्ज मंजूर करत जाते. बँक प्रमुखाला ही कर्जे द्यायला Comfortble वाटते कारण कर्जदार शोधायची भानगड नाही, वसुली करण्याची जबाबदारी नाही. एजन्ट ज्याला सांगेल त्याला कर्ज द्यायचे, परंतु कधी ना कधीतरी ही एकूण कर्जे चार पाच कोटीवर जातात आणि मग थांबावे लागते. तोपर्यंत काही कर्जे थकीतही झालेली असतात. नवीन कर्जे देणे थांबवले की जुन्या कर्जाचे हप्ते येणे हळू हळू कमी होऊ लागते. मग जेव्हा बँक स्वतः हप्ते वसुलीचा प्रयत्न करू लागते तेव्हा लक्षात येते की रिक्षावाल्याचा पत्ता मिळत नाही. आर.टी.ओ मध्ये बोजा चढवला नाही किंवा आर.टी.ओ मध्ये कर्जदाराच्या नावावर रिक्षा नाहीच आहे, रिक्षा परस्पर दुसऱ्याला विकून टाकली आहे. इ. इ. एजन्ट हात वर करतात. वसुली करण्याची अक्षमता दाखवतात. एजन्ट सांगतात, नवीन कर्ज द्या मग आम्ही जुनी कर्जे वसूल करून देऊ. परंतु हा Devil's Trap (सैतानाचा सापळा) असतो. ज्या बँका यात अडकतात त्या पुढे बुडतात. ज्या बँका यात अडकत नाहीत त्या तगतात.

दुसरे म्हणजे मालमत्तेच्या मूल्यांकनाबद्दल. सहकारी बँका सर्वसाधारणपणे मालमत्ता गहाण ठेवून त्याच्यावरच कर्ज देतात. काही वेळा कर्जदार पैसे चारून मूल्यांकनकाराकडून जास्त मूल्यांकन करून घेतात. त्यामुळे त्यांना जास्त कर्ज मिळते. पुढे जर हे कर्ज खाते NPA झाले आणि मालमता विकून कर्ज वसुली करायची वेळ आली तर मूल्यांकना एवढी रक्कम कधीच मिळत नाही. जर बँकरने स्वतः मालमतेला भेट दिली आणि आजूबाजूला चौकशी केली तर अशा प्रकारे होणारे नुकसान टळू शकते.

आजकाल कलर झेरॉक्स हे इतके अप्रतिम

होते की मूळ दस्तऐवज आणि झेरॉक्स दस्तऐवज यातील फरक कळत नाही. प्रत्येक बँकेमध्ये एक दोन तरी उदाहरणे बघायला मिळतात, जेथे झेरॉक्स दस्तऐवजावर कर्ज दिले गेले आहे आणि बँक फसली आहे. सावधान वृती असल्यास आणि कर्जदाराची सांगोपांग चौकशी केल्यास अशी कर्जे देणे टाळता येते.

आणखी एक गोष्ट म्हणजे सनदी लेखापालाने (सी.ए.) बनवलेला प्रोजेक्ट अहवाल/अंदाजपत्रक. नियमानुसार सनदी लेखापाल यावर सही करत नाही आणि त्यामुळे त्याची जबाबदारी घेत नाही. अशी अपेक्षा असते की कर्जदाराशी चर्चा करून धंदा कसा होईल याचा अंदाज घेऊन त्याप्रमाणे हा अहवाल बनवायचा असतो. ज्यामध्ये पुढे किती विक्री आणि नफा होईल आणि कर्जदार कर्ज फेडू शकेल की नाही याचा वस्तुनिष्ठ अंदाज असायला हवा. थोडक्यात पुढे किती विक्री होईल याचे प्रथम अनुमान करून त्यानुसार किती नफा होईल हे काढायचे असते. पण सनदी लेखापाल याच्या बरोबर उलट करतो. तो प्रथम कर्ज फेड़ीची रक्कम किती असेल हे ठरवतो. मग त्यानुसार नफा किती हवा हे ठरवतो आणि त्यानुसार विक्रीचा अंदाज बांधतो. अर्थात असा अहवाल चुकीचा असतो. कर्जदार सनदी लेखापालाने अहवाल बनवला आहे म्हणून त्याकडे लक्ष देत नाही आणि बऱ्याच वेळा बँकरही हा अहवाल स्वीकारतो. बहुतेक वेळा या अहवालानुसार खरेदी, विक्री, नफा काही होत नाही आणि या अहवालावर विसंबून दिलेली कर्ज अडचणीत येतात. कर्जदाराशी सखोल बोलणे करून अंदाजपत्रकात दिलेल्या प्रत्येक उत्पन्न आणि खर्च याची शहानिशा/खातरजमा करून घेतली तर चुकीच्या प्रोजेक्ट अहवालावर कर्ज देणे टाळता येते.

अशा प्रकारे गडबड घोटाळ्यांची अनेक उदाहरणे देता येतील. पण लेखन मर्यादेनुसार थांबायला हवे. प्रत्येक कायदा, नियम असतो, त्यात पळवाट असतेच आणि लबाड माणसे ही पळवाट शोधून त्याचा फायदा उठवतात, हे खरे. म्हणूनच असे म्हटले जाते की, चोराच्या हातात जामदारखान्याची किल्ली दिली तर जामदारखाना सुरक्षित राहण्याची शक्यता जास्त असते.

पैशाची हाव ही खूप मोठी आणि न टाळता येण्यासारखी असते. म्हणून जास्त करून लोक गैरमार्गाने पैसे मिळवायला बघतात. म्हणून चांगली नीतिमता समाजात कशी वाढेल हाच असे गडबड घोटाळे टाळण्याचा उत्तम आणि दीर्घकालीन मार्ग आहे. असो.


शुभदीपावली...

पेठे उज्ज्वल यशस्वी परंपरा

आठवी–नववी–दहावीपासूनच्या
तयारीचा पाया नक्की करण्यासाठी

Pethe's Academy

5th Lane, Rajarampuri, Kolhapur.
Mob. : 9850968611/ 0231-2522492

नवीन वर्षाकरीता प्रवेश
जानेवारी पासून सुरू

# मिले सूर मेरा तुम्हाला

**या अजरामर गाण्याची अद्भुत कहाणी**

•

**डॉ. धनंजय देशपांडे**




मिले सूर मेरा तुम्हारा... हे गाणे माहीत नाही असा एकही भारतीय नसेल. इतकं हे गाणं सगळ्यांच्या हृदयात वसलेलं आहे. हे गाणे जितके श्रवणीय तितकीच त्याच्या निर्मितीची कहाणी देखील अद्भुत आहे.

झालं असं की, पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या मनात एक विचार आला की, तरुणांना विशेषतः लहान मुलांना प्रेरित करणारं आणि एकतेचा संदेश देणारं एखादं गाणं तयार करून ते दूरदर्शनवरून सर्वत्र पोचवावं. ज्यातून 'मेरा भारत महान' ही संकल्पना तर सर्वत्र जाईलच, शिवाय प्रत्येकाला यात आपला प्रांत सामावून घेईल. त्यांच्या इच्छेनुसार मग एक प्रस्ताव तयार करण्यात आला. आणि भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांच्याकडे हे गाणे कंपोज करण्यासाठी आले.

**संपूर्ण फिल्म इंडस्ट्री एकत्र :**

या एकूणच गाण्याची व ते कसे कसे आणि कुठे कुठे शूट करायचे, यात कुणाकुणाला घ्यायचे इत्यादींची संकल्पना सुरेश मलिक आणि प्रसिद्ध ॲड फिल्ममेकर कैलाश सुरेंद्रनाथ यांची आहे. विशेषतः यातील सिनेकलाकार यांच्या तारखा मिळवताना त्रास होईल असा या जोडगोळीचा

अंदाज होता. मात्र एकूण एक कलाकारांनी अगदी हव्या त्या तारखा यांना दिल्या. त्यामुळे जवळपास पूर्ण फिल्म इंडस्ट्री यात दिसते.

**विश्वविक्रमी गाणे :**

१५ ऑगस्ट १९८८ रोजी दूरदर्शनवरून हे गाणे प्रथमच रिलीज करण्यात आले. याचे संगीतकार पं. भीमसेन जोशी. भैरवी रागातील या गाण्याचे गीतकार होते प्रसिद्ध कवी पियुष पांडे. भारतातील प्रमुख अशा चौदा भाषेत प्रथमच असं हे गाणं तयार झालं असून तोही एक विश्वविक्रम आहे. हिंदी, काश्मिरी, पंजाबी, सिंधी, उर्दू, तामिळ, कन्नड, तेलगू, मल्याळम, बांगला, आसामी, उडिया, गुजराती आणि मराठी भाषेत दोन दोन ओळी रचल्या गेल्यात.

**लता दीदीची एन्ट्री :**

खरेतर सुरुवातीला यातील गायिकेच्या आवाजातील सर्व ओळी भारतरत्न लता मंगेशकर गाणार असं ठरलं होतं. मात्र जेव्हा गाणे रेकॉर्डिंग करण्यासाठी स्टुडिओ बुक करण्यात आला, तेव्हा नेमक्या लतादीदी परदेशात होत्या. त्यामुळे मग कविता कृष्णमूर्ती यांच्या आवाजात ते गाणे सुरुवातीला रेकॉर्ड करण्यात आले. मात्र गाणे रिलीज होण्याच्या दोन दिवस आधी लता दीदी भारतात परतल्या. त्यांना हे गाणे रेकॉर्ड झाल्याचे कळले. त्यांनी स्टुडिओत जाऊन ते गाणे ऐकले आणि म्हणाल्या, पंडितजी... मला ही संधी सोडायची नाहीय. काहीतरी जुळवून आणा. मी आजच रेकॉर्डिंगसाठी वेळ देते.

आता पंचाईत झाली. कारण त्यामुळे कविताजींचे नाव आणि गायन वगळून तिथं दीदींचे बसवायचे... कविताजी नाराज झाल्या खऱ्या, पण मन मोठं करून त्यांनी यासाठी आनंदाने होकार दिला. याबद्दल दीदी इतक्या ज्येष्ठ असूनही त्यांनी कविताजी यांचे आभार मानले. आणि मग लता दीदी तिरंगी ध्वज रंगाचा पदर असलेली पांढरी साडी परिधान करून स्टुडिओत आल्या आणि त्यांच्या स्वरात हे गाणे रेकॉर्ड झाले. मात्र परस्पर सामंजस्याने नंतर असं ठरलं की कविताजी यांनीही मेहनत घेतलेली आहे तर किमान एक दोन ओळी त्यांच्या पण असूद्यात ! त्याप्रमाणे मग गाण्यात शबाना आझमीच्या तोंडी असलेल्या ओळी या कविता यांच्या आहेत त्या तशाच ठेवण्यात आल्याचे सांगितले जाते.

**प्रसिद्ध धबधबा :**

या गाण्यात सुरुवातीला पं. भीमसेनजी ज्या धबधब्याजवळ उभे राहून गाणे गाताना दिसतात तो कोडईकनाल पम्बर फॉल्स आहे ! हाच तो धबधबा आहे जिथं लिरिल साबणाची त्या काळात सुपर हिट झालेली जाहिरात शूट करण्यात आली होती. त्यामुळे त्याला नंतर लिरिल फॉल्स असेच नाव पडले!

**ताजमहाल शूटिंग किस्सा :**

या गाण्यातील एका कडव्यात ताजमहाल दिसतोय जो एरियल व्ह्यू स्टाईलने शूट करण्यात आला आहे. खरेतर वर्ल्ड हेरिटेज जाहीर झालेल्या वास्तूच्या भोवती असं एरियल शूट करण्याची परवानगी नसते. मात्र कैलाशजी याना तसेच शूट हवे होते मग प्रॉडक्शन टीमसह भीमेसनजी यांनी थेट एयर मार्शल यांची भेट घेऊन इच्छा सांगितली. शिवाय हा प्रोजेक्ट खुद्द पंतप्रधान यांच्या मनातला आहे हेही सांगितलं आणि त्यानंतर परमिशन मिळाली. इतकंच नव्हे तर भारतीय सेनेच्या हेलिकॉप्टरमधून ते एरियल व्ह्यू शूट घेण्यात आलं.

गाण्यातील एका कडव्यात पाण्यात हत्ती खेळताना दिसतात, ते शूटिंग केरळ येथील पेरियार नॅशनल पार्कमधील असून हत्तीही तिथलेच आहेत.

यासाठीही वन विभागाने तातडीने हालचाल करून सर्व त्या परवानग्या दिल्या. नाहीतर अशा रिजर्व पार्क मध्ये शूटिंगला परवानगी नसते.

**दोन महत्वाच्या रेल्वे :**

या गाण्यात दोन ठिकाणी दोन वेगवेगळ्या रेल्वे दिसतात. त्या दोन्ही पूर्ण देशभरात प्रसिद्ध अशा रेल्वे आहेत. पहिली आहे ती कलकत्याची मेट्रो रेल्वे आणि दुसरी आहे आपल्या महाराष्ट्राची शान असलेली डेक्कन क्वीन ! तनुजा जेव्हा मराठी ओळी गाताना दिसतात त्यावेळी ही रेल्वे येते ! आहे न अभिमानाची गोष्ट !

**कोरस मंडळींचा मोठेपणा :**

या गाण्यात सर्वात शेवटी भारताच्या नकाशाच्या आकारात अनेक माणसे उभी असलेली दिसतात न ते सगळं शूटिंग मुंबईच्या फिल्मसिटीत करण्यात आलं आहे. विशेष म्हणजे फिल्म इंडस्ट्रीमध्ये अशा कोरस शॉटसाठी माणसे पुरवणारी एजंसी असते त्यांनी नेहमीप्रमाणे पैसे ठरवून माणसे बोलावली. शूटिंग झालं आणि शूट झाल्यावर लोकांना कळलं की ते किती मोठ्या प्रोजेक्ट मध्ये सहभागी आहेत आणि देशासाठीचे हे गीत आहे म्हटल्यावर त्यातल्या एकानेही एक रुपयाही मानधन घेतलं नाही. तसेच यातील एका ओळीत शाळेतील लहान मुले तिरंगी गणवेशात एकत्र धावत येतात त्याचे शूटिंग उटी येथील बोर्डींग स्कुल मध्ये झाले आहे.

**स्वतःचे कपडे वापरणारे कलाकार :**

गाण्यात एका सीनमध्ये अमिताभ, जितेंद्र आणि मिथुन चक्रवर्ती आहेत. या तिघांचे शूटिंग भल्या सकाळी एका बंगल्याच्या खाजगी बागेत करण्यात आले. आणि अवघ्या दहा मिनिटात तो सिन वन टेक शूट झाला. विशेष म्हणजे यात त्यांच्या अंगावर जे कपडे आहेत ते त्यांचे त्यांचे स्वतःचे आहेत. अन्यथा इतरवेळी शुटिंगवाल्याकडून कपडे पुरवले जातात. ज्याला बऱ्यापैकी खर्च येतो मात्र या तिघांनी त्याला नम्र नकार देऊन स्वतःचे कपडे आणले होते.

**कमल हसन यांची ऐनवेळी एंट्री :**

दाक्षिणात्य प्रसिद्ध गायक एम. बालमुरली-कृष्ण यांचे या गाण्यातील दोन ओळीचे रेकॉर्डिंग होते. त्यावेळी स्टुडिओत अचानक कमल हसन आले. ते कसे काय आले इथं ? असं विचारण्यात आले तेव्हा ते म्हणाले की, माझे गुरु आहेत बालमुरलीकृष्ण.... त्यामुळे त्यांचे गाणे रेकॉर्ड होताना पाहावे म्हणून आलोय. यावर कैलाशजी म्हणाले की, संध्याकाळी या ओळीचे शूटिंग आहे समुद्र किनारी तर वेळ असेल तर या की तिथेही आणि कमल हसन तिथं नंतर पोचले आणि चक्क त्यांनाच शूटिंग मध्ये सहभागी करून घेण्यात आले आणि अशारितीने ऐनवेळी त्यांची एंट्री यात झाली.

**जगाच्या पाठीवर प्रथमच असे काहीतरी :**

एकतेचा संदेश देणाऱ्या या गाण्यात जवळपास सर्वच क्षेत्रातील दिग्गज मंडळी दिसतात. जगाच्या पाठीवर प्रथमच एका गाण्यासाठी हे घडलं आहे. फिल्म लाईन, क्रीडा, गायक, वादक, चित्रकार, कार्टूनिस्ट, फिल्म निर्माता, आर्किटेक्ट, टेलिव्हिजन होस्ट असं सगळं सुंदर मिश्रण यात जुळून आले आहे. एखाद गाणं इतकं अजरामर का होतं.... त्या मागे किती काय काय घडत असत अन कितीजणांचे कष्ट असतात हे आपल्यापैकी अनेकांना माहित नसत. ते माहित असावं म्हणून हा पोस्ट प्रपंच!

थोडक्यात सांगायचं तर... असं गाणं पुन्हा होणे नाही !!

## स्त्री जन्मा

कन्येचा जरी जन्म लाभला, यश कीर्ती मिळवीन ।।
ना मी अबला, कुलभूषण मी, दक्ष सदा राहीन ।।धृ.।।

अज्ञानाचे युग संपले, कष्ट नि दारिद्र्याचे ।
शिक्षणक्रांतीचे युग आले, सुवर्ण संधीचे
संगणकाच्या मैत्रीने मी, भविष्य घडविन ।।१।।

सैनिकी क्षेत्रे खुली जाहली, महिलांनाही किती
संगणकीय वैदिक तैसे, कला-क्रीडा-संस्कृती
समाजसेवा, राजकारणी, लौकिक संपादिन ।।२।।

साहित्याची कास धरोनी, शोधू नवीन वाटा ।
अध्ययनाच्या सामर्थ्याने, अज्ञानाला फाटा ।
अंतराळीही झेप घेऊनी, यश कीर्ती मिळवीन ।।३।।

**प्र. आ. पुराणिक**
मोबा. ९४२३३००४९०

ॐ

**भारतातील २९ राज्यांची नावे**
**'श्री संत तुलसीदास' यांच्या या दोह्यात समाविष्ट आहेत.**

**''राम नाम जपते अत्रि मत गुसिआउ ।**
**पंक में उगोहमि अहि के छबि झाउ ।।''**

रा - राजस्थान
म - महाराष्ट्र

ना - नागालँड
म - मणिपूर

ज - जम्मू कश्मीर
प - पश्चिम बंगाल
ते - तेलंगाना

अ - असम
त्रि - त्रिपुरा

म - मध्य प्रदेश
त - तमिलनाडु

गु - गुजरात
सि - सिक्किम
आ - आंध्र प्रदेश
उ - उत्तर प्रदेश

पं - पंजाब
क - कर्नाटक

मे - मेघालय

उ - उत्तराखंड
गो - गोवा
ह - हरियाणा
मि - मिजोराम

अ - अरुणाचल प्रदेश
हि - हिमाचल प्रदेश

के - केरल

छ - छत्तीसगढ
बि - बिहार

झा - झारखंड
उ - उडीसा

# प्राचीन भारतीय गणितातील गमती-जमती

**प्रशांत पोळ**
मोबा. ९३४०१४०९६१

११ ऑगस्ट १९६७ ला प्रदर्शित झालेल्या 'उपकार' या चित्रपटात मनोज कुमारच्या तोंडी एक गाणं आहे -

**जब झिरो दिया मेरे भारत ने, भारत ने मेरे भारत ने,**
**दुनिया को तब गिनती आई....**

'शून्याची संकल्पना सर्वप्रथम भारतात तयार झाली आणि त्यावरून केलेली गणना ही भारताने जगाला सर्वात आधी सांगितली', हे गाण्याच्या माध्यमातून मनोज कुमारने सर्वसामान्य भारतीयांपर्यंत पोहोचवलं होतं.

गणितीय संकल्पना आपल्या भारतात फार प्राचीन काळापासून रुजलेल्या आहेत. किंबहुना आपल्या पूर्वजांचा गणिताचा पाया अगदी मजबूत आणि पक्का होता. म्हणूनच ते खगोलशास्त्र, वास्तुकला, नौकानयन, यंत्रकला इत्यादी क्षेत्रात अफाट काम करू शकले.

यजुर्वेद संहितेत १०१२ पर्यंतच्या आकड्यांची नावे दिलेली आहेत सामवेदातील ताण्ड्य ब्राह्मणाला 'पंचविस ब्राह्मण' असेही नाव आहे, कारण यात २५ अध्याय आहेत. या 'पंचवीस ब्राह्मण' ग्रंथात, दशमान पद्धतीतील चढत्या भाजणीत आकड्यांची नावं दिलेली आहेत. उदाहरणार्थ - एकम्, दश (१०१), शत (१०२), सहस्त्र (१०३), आयुक्त (१०४), नियुता (१०५), प्रयुता (१०६), अरबुडा (१०७), न्यारबुडा (१०८), समुद्र (१०९), मध्य (१०१०), अंत (१०११), परार्ध (१०१२)...

इथं हे बघणं महत्त्वाचं ठरतं, की या सर्व काळात, आणि नंतरही, ग्रीकांच्या संख्येचा सर्वोच्च आकडा हा मारियाड (Myriad) अर्थात (१०४) इतकाच होता, तर त्यावेळी सर्वोच्च रोमन आकडा हा मिले (Mille) म्हणजेच एक हजारापर्यंतच (१०३) होता. पुढे जाऊन, दहाव्या शतकापर्यंत भारतीय गणितज्ञ १०५३ पर्यंतच्या संख्यांची गणितं करत होते.

भारतीय, 'शून्य' या आकड्याचा गणितात उपयोग करत होते, याचे दोन पुरावे सापडले आहेत. एक - कंबोडियात, मेकाँग नदीच्या तीरावर असलेल्या सेंबोर येथील हिंदू मंदिरांच्या समूहात एक शिलालेख मिळालाय. यात 'शून्य' चा उल्लेख आहे. त्या शीलाखंडाला, तेथील पुरातत्व विभागानं घ-१२७ असं नाव दिलंय. याचा नेमका कालखंड आहे, सन ६८३.

दुसरा पुरावा सापडला, तो मध्य प्रदेशातल्या ग्वाल्हेर शहरातल्या 'चतुर्भुज मंदिरात'. ग्वाल्हेरच्या किल्ल्यात असलेलं तसं हे लहानसंच मंदिर आहे. मात्र यात असलेल्या शिलालेखातून, 'शून्य' चा स्पष्ट आणि व्यवस्थित उल्लेख आहे. या शिलाखंडाचा कालखंड हा सन् ८७६ आहे.

मात्र या सर्वांना मागे टाकणारं एक संशोधन, काही वर्षांपूर्वी समोर आलं आहे.

'बोडलिअन लायब्ररी' हे ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी चे मुख्य शोध ग्रंथालय आहे. हे युरोपचे सर्वात प्राचीन ग्रंथालय / पुस्तकालय आहे. सर थॉमस बोडली या इंग्रज राजनेत्याने याची स्थापना

केली, म्हणून याला 'बोडलियन लायब्ररी' हे नाव दिलंय. या ग्रंथालयात एक कोटी तीस लाखांपेक्षा जास्त मुद्रित साहित्य (पुस्तकं, मासिकं, नियत-कालिकं) आहेत.

१४ सप्टेंबर २०१७ ला या ग्रंथालयाने एक मोठी घोषणा केली. या ग्रंथालयात, 'बख्शाली हस्तलिखितं' जपून ठेवलेली आहेत. बख्शाली हस्तलिखितं ही प्राचीन भारताच्या गणिताच्या संबंधीचा अमोल ठेवा आहे. सन १८८१ ला ही हस्तलिखितं, उत्तर पश्चिम सीमा प्रांतातील 'बख्शाली' या गावात सापडली. म्हणून यांना बख्शाली हस्तलिखितं म्हटलं जातं. बख्शाली हे गाव सध्या पाकिस्तानातील पंजाब प्रांतात असून, तक्षशिला पासून ७० किलोमीटर दूर आहे. अत्यंत जीर्णशील झालेली ही हस्तलिखितं, भूर्जपत्रावर लिहिलेली आहेत आणि याची फक्त ७० पानंच (भूर्जपत्रं) मिळू शकली आहेत.

ही हस्तलिखितं शारदा लिपीत आणि गाथा बोलीत आहेत. 'गाथा बोली' हे उत्तर भारतातील संस्कृत आणि प्राकृत भाषेचे सरमिसळ झालेले रूप आहे. अंकगणित, प्रारंभिक भूमिती इत्यादी विषय यात समजावले आहेत. या पुस्तकाच्या अज्ञात लेखकाने प्रारंभीच हे स्पष्ट केले आहे, की व्यापाऱ्यांकडे, हिशोब लिहायला / करायला जे 'कायस्थ' असतात (हाच शब्द त्यांनी वापरला आहे), त्यांच्यासाठी, गणिताचे प्रारंभिक ज्ञान देणारे हे पुस्तक आहे. या पुस्तकात अनेक गणितीय चिन्हे ही वापरली आहेत.

**या हस्तलिखितांचं इतकं महत्त्व का..?**

असं समजलं जातंय की ही हस्तलिखितं म्हणजे संस्कृतमध्ये, फक्त गणिताला वाहिलेली पहिलीच रचना आहे. शिवाय यात 'शून्य' हे चिन्ह (आकडा) व्यवस्थित, आज जसे आपण वापरतो तसे, वापरले आहे. आजपर्यंत असा समज होता की वर उल्लेखलेल्या ग्वाल्हेरच्या चतुर्भुज मंदिरात सापडलेल्या शिलालेखात असलेल्या 'शून्य' चा स्पष्ट उल्लेख, हा जगात 'शून्य' चे सर्वात प्राचीन अस्तित्व दाखवतोय.

पण इंग्लंडच्या बोडलियन ग्रंथालयानं १४ सप्टेंबर २०१७ ला जी घोषणा केली, त्याद्वारे बख्शाली हस्तलिखितांमध्ये असलेला 'शून्य' चा स्पष्ट उल्लेख, हा जगातील सर्वात प्राचीन आहे. जपानचे संशोधक डॉक्टर हयाशी टाकाओ यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात, या हस्तलिखितांवर आधुनिक पद्धतीने रेडिओ कार्बन डेटिंग वापरून, त्यांचा कालखंड काढला. तो तिसऱ्या शतकातला निघाला. गणिताच्या वैश्विक इतिहासाच्या दृष्टीने हा फार महत्त्वाचा शोध होता. 'शून्य' ला दर्शवताना बेबीलोनियन किंवा मायन संस्कृतीत 'डॉट' वापरलेला दिसतो. मात्र तिथेही 'शून्य' ही संकल्पना आजच्यासारखी नाही, आणि त्या 'डॉट' ला आजच्या शून्यासारखे मध्ये भोक ही नाही.

मात्र बख्शाली हस्तलिखितांमध्ये किंवा ग्वालेरच्या चतुर्भुज मंदिरातील शिलालेखांमध्ये, 'शून्य' हे, आज सारं जग जसं वापरतं, त्याच पद्धतीनं, त्याच शैलीत आणि त्याच संदर्भात वापरलेलं आहे.

भारतीय आकडे आणि दशमान पद्धत ही तिबेट, चीन, आजचं इंडोनेशिया, जावा-सुमात्रा, जापान इत्यादी देशात सहाव्या - सातव्या शतकातच पोहोचली आणि रूढ झाली. साधारण आठव्या शतकात, भारतीय आकडे आणि गणितीय प्रणाली अरबस्तानात पोहोचली. नवव्या शतकात, अरबी गणितज्ञ अल्-ख्वारिझ्मी हा, भारतीय आकड्यांचा आणि दशमान पद्धतीचा फार मोठा समर्थक आणि

३ ऑक्टोबर पासून
आमच्या सर्व शोरूम्स मध्ये
सोने दागिन्यांच्या खरेदीवर

# १००% GST डिस्कॉउंट

आता दागिने खरेदी करा तुम्ही
त्यावरचा

# GST भरतो आम्ही



*T&C : GST Compliance is GN Jog Sons responsibility

| अंदाजे खरेदी रक्कम | डिस्काउंट |
|---|---|
| ४ लाख किंवा ५० ग्रॅम | ₹ १२००० + ₹ १००० एक्सक्लुझिव्ह मोती इमिटेशन ज्वेलरीवर डिस्कॉउंट |

सर्व दागिने १००% हॉलमार्क प्रमाणित

G N J since 1901

## गोविंद नारायण जोग,सराफ

सराफ बाजार, सांगली
फोन : ८७६६९९३६०७

व्हिनसकॉर्नर, कोल्हापूर
फोन : ७०६६२७६६५५


जलभवन समोर, विश्रामबाग
फोन : ८७९९९७९८४७

Final

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

## कपडे वाळत टाकणं इतकं 'ईझी' कधीच नव्हतं !


- भारतातील नं. १ ची कपडे वाळत टाकण्याची सिस्टीम.
- प्रत्येक पाईप वेगळा खाली घेण्याची सोय.
- ४ ते ९ फूट सर्व साईज उपलब्ध.
- मजबुतीसाठी चॅनेल माऊंटेड पुलीज.
- खास डिझाईन केलेली लॉकिंग सिस्टीम.
- पॅसेज बाल्कनी, बाथरूम, बेडरूम, ड्राय बाल्कनी व टेरेस कुठेही बसविता येईल.




EASY DRY SYSTEMS PVT. LTD.

**Pune Ph.:** 8888 505 404, 9922 915 482, 2545 6843

www.easydrysystems.com **Email :** easydrypune@gmail.com



## RAINTAP™ PopUp Filter For Rainwater Harvesting

# केतकी एन्टरप्राईजेस

१७३१/१३, बी, मधुकिरण, न्यू महाद्वार रोड, कोल्हापूर.

फोन : (०२३१) २६२७०१५, मोबा. ९८६०५६३८१०

E-mail : ketakienterprises.joshi@gmail.com

उद्घोषक होता. बाराव्या शतकात इंग्लंड मधील, 'एडलॉर्ड ऑफ बाथ' या ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ आणि गणितज्ञाने अल्-ख्वारिझ्मी च्या गणितीय ग्रंथांचं लॅटिन भाषेत भाषांतर केलं. आणि अशा प्रकारे भारतीय गणितीय पद्धत, युरोप मध्ये आली आणि येऊन स्थिरावली.

एकूणात काय, तर शून्य आणि दशमान पद्धती ही भारताने जगाला दिलेली ठेव आहे, हे परत एकदा सिद्ध झालंय.

* * *

दुर्दैवानं, 'आपण गणितात (आणि गणिताच्या सर्व शाखांमध्ये ही) जगाच्या खूप पुढे होतो', हे आपल्याला कोणी फारसं सांगितलंच नाही. आणि शाळेतही शिकवलं नाही.

आपण शाळेत पायथागोरस थ्योरम शिकलो असू. 'काटकोन त्रिकोणाच्या दोन बाजूंच्या वर्गाची बेरीज ही कर्णाच्या वर्गा इतकी असते' हा तो प्रमेय. यातला 'पायथागोरस' हा ग्रीक गणितज्ञ. याचा कालखंड आहे – ख्रिस्त पूर्व ५७० ते ४९५.

या पायथागोरसच्या काळात आणि त्याच्याही कितीतरी आधी, भारतात 'यज्ञ संस्कृती' नांदत होती. वेगवेगळ्या प्रकारचे यज्ञ व्हायचे. या यज्ञांसाठी विविध प्रकारची, शास्त्रशुद्ध पद्धतीने बांधलेली यज्ञकुंड तयार केली जायची. या यज्ञकुंडांच्या रचनेत गणितीय संकल्पनांचा भरपूर वापर व्हायचा. त्यासाठी त्या काळातील विद्वत् जन, अर्थात ऋषी-मुनी, हे 'शुल्बसूत्र' लिहायचे. ही शुल्बसूत्रं म्हणजे यज्ञकुंडांच्या भूमितीय रचनेची गणितं असायची. संस्कृत मध्ये 'शुल्ब' म्हणजे 'मोजण्याची दोरी'. अर्थात यज्ञकुंडांचा आकार ठरवण्यासाठी या सूत्रांचा उपयोग केला जायचा.

अपस्तम्ब, मानव, कात्यायन, बोधायन, मैत्रायणीय, वाराह, वधुल, हिरण्यकेशीन इत्यादी ऋषींनी लिहिलेली शुल्बसूत्रं मिळाली आहेत. यातील 'बोधायन' ने पहिल्या अध्यायात बारावा श्लोक दिलाय –

**दीर्घचतुरश्रस्याक्ष्णया रज्जुः पार्श्वमानी तिर्यकमानी च ।**
**यत्पृथरभूते कुरुतस्त दुभयं करोती ।।**

याचा अर्थ काढला तर a२ + b२ = c२ हा प्रमेय सिद्ध होतो.

गंमत म्हणजे बोधायन ऋषींचा कालखंड हा ख्रिस्त पूर्व ८०० वर्षांपासून ते ख्रिस्त पूर्व १२०० वर्षे असावा असं मानलं जातं.

**मग हा प्रमेय नेमका कोणाचा..? पायथागोरसचा की बोधायन चा?**

जर 'बोधायन प्रमेय' हा पायथागोरसच्या किमान तीनशे – चारशे वर्ष आधी लिहिला गेलाय, हे जगानं मान्य केलंय, मग अजूनही आम्ही त्याला 'पायथागोरस प्रमेय' असंच का म्हणतो..? बोधायन प्रमेय का नाही...? G. Milhand या गणितज्ञाच्या मताप्रमाणे, 'पायथागोरस प्रमेयावर भारतीय गणिताचा पूर्ण प्रभाव आहे.'

फक्त हाच प्रमेय नाही, तर भूमितीचे आणि त्रिकोणामितीचे अनेक प्रमेय या शुल्बसूत्रात दडलेले आहेत.

* * *

साधारण सोळाव्या – सतराव्या शतकात, युरोपच्या विद्वानांना गणिताच्या ज्या गोष्टी कळल्या त्या भारतीय गणितज्ञांना हजार – दीड हजार वर्षे आधीच माहीत होत्या.

उदाहरणच द्यायचं झालं तर 'पास्कल ट्रँगल' चं देता येईल. हा 'पास्कल त्रिकोण' म्हणजे एका मोठ्या विशिष्ट त्रिकोणात असलेल्या कप्प्यांची रचना आहे. या त्रिकोणामध्ये शीर्षस्थानी १ ने सुरुवात होते

नंतर त्रिकोणाच्या दोन्ही बाजूंना १ हा आकडा शेवटपर्यंत येतो. मधली प्रत्येक संख्या ही त्याच्यावर असलेल्या दोन संख्यांची बेरीज असते.

या त्रिकोणात असलेल्या संख्यांच्या विशिष्ट रचनेमुळे आणि त्यांच्या बेरजेतून होणाऱ्या गमतीमुळे, पास्कल त्रिकोण ही गणितातील एक गूढ रचना समजली जाते. जगभरातील गणिताच्या पुस्तकांमध्ये याच्या जनकाचं नाव 'ब्लेझ पास्कल' (१९ जून १६२३ – १९ ऑगस्ट १६६२) असं दिलेलं आहे. हा फ्रेंच गणितज्ञ, शास्त्रज्ञ आणि दार्शनिक होता.

मात्र काही पुस्तकांमध्ये, पास्कल त्रिकोण शोधण्याचं श्रेय, अरबी गणितज्ञ 'अबू बेकर इब्न मोहम्मद इब्न अल् हुसेन अल् काराजी' याला दिलं जातं. हा साधारण दहाव्या – अकराव्या शतकातला अरबी गणितज्ञ आहे.

या सर्व शोधांच्या किमान हजार – बाराशे वर्षे आधी, ऋषी पिंगल यांनी त्यांच्या 'छंदशास्त्र' या ग्रंथात, या 'जादुई त्रिकोणाचा' उल्लेख केला आहे. हे पिंगल ऋषी, प्रसिद्ध व्याकरणकार पाणीनी यांचे लहान बंधू होते. यांचा कार्यकाळ हा ख्रिस्त पूर्व ३०० ते २०० वर्षांचा आहे. अर्थात आजपासून किमान बावीसशे– तेवीसशे वर्षांपूर्वी, एका भारतीय गणितज्ञाने, पिंगल ऋषींनी, हा गणिताच्या विविध शाखांना उपयोगी पडणारा, त्रिकोण तयार केला.

आपण असे कपाळकरंटे, की सव्वा दोन हजार वर्षांची आपली ज्ञान परंपरा विसरून जाऊन, या त्रिकोणाला, 'पास्कल ट्रँगल' म्हणत, डोक्यावर घेत नाचलो..!

पिंगल ऋषींनी 'मेरू प्रस्तर' नावाने हा त्रिकोण तयार केला. पुढे अनेक प्रकारच्या गणितात, अनेक मोठमोठ्या मंदिरांच्या, राजवाड्यांच्या, नगरांच्या रचनेत याचा उपयोग झाला. जगातले सर्वात मोठे प्रार्थना स्थळ असलेले कंबोडियातील 'अंगकोर वाट मंदिर' हे या मेरू प्रस्तराच्या संकल्पनेवरच आधारलेले आहे.

पिंगल ऋषींनी त्यांच्या 'छंदशास्त्र' या पुस्तकात चक्क 'बायनरी सिस्टम' ची ओळख करून दिली आहे. ० आणि १, अर्थात लघु आणि गुरु. मात्र इथे १ हा लघु आहे तर ० हा गुरु. या आधारावर पिंगल ऋषींनी अगदी 'बायनरी टू न्यूमरिकल डिजिट' अशी जी आपण रचना करतो, तशीच रचना करून अक्षरं तयार केली आहेत.

कल्पना करा, पाश्चिमात्य जगाला ही बायनरी ची कल्पना कळली, सन १६८९ मध्ये. गाटफ्रेड लिबनीझ ने या बायनरी आकड्यांची संकल्पना मांडली आणि पुढे त्याच्यावरून संपूर्ण कम्प्युटर प्रणाली / डिजिटल प्रणाली तयार झाली.

पण सुमारे तेवीसशे वर्षांपूर्वी आपल्या देशातल्या पिंगल ऋषींनी ही अशीच बायनरी पद्धत वापरली, ती आपण विसरून गेलो..!

प्राचीन काळात, आपल्या देशाला अत्यंत बुद्धिमान गणितज्ञांची महान परंपरा लाभली. आर्यभट्ट सारखे गणितज्ञ चौथ्या शतकात होऊन गेले. सातव्या शतकात भास्कराचार्य. सातव्या शतकातच ब्रह्मगुप्त. नवव्या शतकात महावीर. आर्यभट्ट (द्वितीय) हे दहाव्या शतकात. दहाव्या शतकातच श्रीपती. अकराव्या शतकात श्रीधर. भास्कराचार्य (द्वितीय) हे बाराव्या शतकात..... हे महत्त्वाचे गणितज्ञ. यांच्याशिवाय गणितात भर घालणारे, आधीच्या सूत्रांवर भाष्य करून, भाष्य लिहून त्यात सुधारणा करणारेही बरेच होऊन गेले.

अर्थात इस्लामी आक्रांता भारतात आल्यानंतर हा ओघ आटला. मोठमोठी विद्यापीठं

नष्ट केली गेली. फक्त गणितातलंच नाही, तर विद्येच्या सर्व शाखांमधलं संशोधन थांबलं. खुंटलं. पण त्याही परिस्थितीत काही तुरळक गणितज्ञ आपली साधना करतच होते.

वर्ग, वर्गमूळ, घनमूळ, वृत्ताचं/ त्रिकोणाचं / चौकोनाचं क्षेत्रफळ, गोलाकृती रचनेचं/ सिलेंडरिकल वस्तूचं आकारमान, पिरॅमिडची रचना, त्याचं आकारमान, गणितीय / भूमितीय श्रेणी... या साऱ्या गोष्टी आजपासून दीड-दोन हजार वर्षांपूर्वी आपल्या पूर्वजांना येतच होत्या. पण याशिवाय अत्यंत जटील - कठीण असे भूमितीचे प्रमेय, त्रिकोणामितीची सूत्रं यासारख्या गोष्टी सुद्धा आपल्या पूर्वजांना चांगल्या येत होत्या. पश्चिम जगताचा विचार केला तर आपण काळाच्या खूपच पुढे होतो.

चौथ्या शतकात आर्यभटांनी 'आर्यभटीय' हा ग्रंथ लिहिला. त्यात त्यांनी 'पाय' À ची किंमत ही चार अंकांपर्यंत दिली आहे -

**चतुराधिकं शतमष्टगुणम् द्वाषष्टिस्तथा सहस्त्राणाम ।**
**अयुतद्वय विष्कम्भस्यासन्नो वृत्तपरिणाहः ।।**

अर्थात १०० अधिक ४ (१०४) याला ८ ने गुणून त्यात ६२००० मिळवले तर एका वर्तुळाचा परिघ होतो, ज्याची त्रिज्या २०००० आहे

परीघ c = (१००+४)÷८ + ६२०००
= ६२,८३२
वर्तुळाचा व्यास d = २००००
वर्तुळाचा परीघ = 2À x त्रिज्या
अर्थात À = परीघ / २ त्रिज्या
(अर्थात व्यास)
= ६२८३२ / २००००
= ३.१४१६

ही À ची 'जवळपास' जाणारी (श्लोकामध्ये - 'आसन्नो') किंमत आहे.

* * *

सातव्या शतकातले ब्रह्मगुप्त हे खूप मोठे गणितज्ञ होऊन गेले. त्यांनी अनेक वेगवेगळे प्रमेय, समीकरणे मांडली आणि ती सिद्ध केली. ब्रह्मगुप्तांनी 'ब्रह्म स्फूट सिद्धांत' हा ग्रंथ लिहिला (सन् ६२८ मध्ये) आणि यात अनेक क्लिष्ट समीकरणांची उकल केली. याच ग्रंथातील बाराव्या अध्यायात, २८ क्रमांकाचा एक श्लोक आहे -

**कर्णाश्रितभुजघातैक्यमुभयथान्योन्य भाजितं गुणयेत् ।**
**योगेन भूजप्रतिभुजवधयोः कर्णौ पदे विषमे ।।**

हा 'चक्रीय चौकोनाचा प्रमेय' (Cyclic Quadrilateral Theorem) म्हणून प्रसिद्ध आहे. साधारण दहावीच्या वर्गात शिकवला जातो. 'चक्रीय चौकोनाचे सम्मुख कोन हे परस्परांचे पूरक कोन असतात' हा तो प्रमेय आहे. दुर्दैवानं हा प्रमेय, W. Snell यांच्या नावाने ओळखला जातो. सन १६१९ मध्ये त्यांनी हा प्रमेय मांडला, असं शिकवलं जातं.

अक्षरशः काना-मात्रेचा फरक नसलेला हा प्रमेय, डब्ल्यू स्नेल यांच्या हजार वर्षांपूर्वी ब्रह्मगुप्तांनी संस्कृत मध्ये मांडला. याचे सर्व पुरावे उपलब्ध आहेत. मात्र आपण असे कपाळकरंटे, की आपल्याला, आपल्या मुलांना, विद्यार्थ्यांना ब्रह्मगुप्त माहीतच नसतो..!

असाच एक 'परिमेय चतुर्भुज प्रमेय' (Rational Quadrilaterals Theorem). हा प्रमेय सुद्धा 'यूलर' (Eular : १७०७ - १७८३) यांच्या खात्यावर जमा आहे.

मात्र, अक्षरशः आणि शब्दशः, हाच प्रमेय, हजार वर्षांपूर्वी ब्रह्मगुप्तांनी त्यांच्या 'ब्रह्म स्फूट सिद्धांत' या ग्रंथात बाराव्या अध्यायातील ३८ व्या श्लोकात मांडला आहे -

**जात्यद्व्य कोटीभुजाः परकर्णगुणाः भुजाश्चतुर्विषमे।**
**अधिको भूर्मुखंहीनो बाहूद्वितयं भुजावन्यौ ।।**

आणि तरीही आम्ही 'परिमेय चतुर्भुज प्रमेय' ला यूलर चा प्रमेय म्हणूनच पिढ्यान्-पिढ्या शिकत राहणार, शिकवत राहणार !

* * *

पूर्ण जगात, 'फिबोनाची सिरीज' किंवा फिबोनाची आकडे प्रसिद्ध आहेत. या फिबोनाच्या मालिकेची गंमत म्हणजे, यात प्रत्येक आकडा हा मागील दोन आकड्यांची बेरीज असतो.

ही मालिका ज्या 'फिबोनाची' च्या नावाने ओळखली जाते, तो फिबोनाची हा इटालियन गणितज्ञ होता. सन १२०२ मध्ये त्याने 'लिबर अबासी' हे गणिताच्या संदर्भातले पुस्तक लिहिले. त्या पुस्तकात ही फिबोनाची सिरीज होती. आणि येथूनच तो फिबोनाची आणि त्याची ही सिरीज प्रसिद्ध झाली.

मात्र फिबोनाची च्या एक हजार वर्षे आधी, पिंगल ऋषींनी या 'फिबोनाची सिरीज' ची रचना, अगदी स्पष्टपणे, 'छंदशास्त्र' या पुस्तकात करून ठेवली आहे. गंमत म्हणजे, गणिताशी संबंध नसलेल्या, भरत मुनींच्या 'नाट्यशास्त्र' या ग्रंथातही या गणितीय आकड्यांचा आणि श्रेणीचा उल्लेख आहे.

पुढे सन् ८५० मध्ये, महावीराचार्य यांनी, त्यांच्या 'गणित सारा संग्रह' या ग्रंथात, या सिरीजचा विस्ताराने उल्लेख केला आहे. या ग्रंथातील सातव्या अध्यायातील १२२ वा श्लोक हा, आज आपण ज्याला फिबोनाची सिरीज म्हणतो, त्याचा संपूर्ण उलगडा करतो –

**यद्यक्षेत्रं जातं बिजैस्संस्थाप्य तस्य कर्णेन ।**
**इष्टं कर्णं विभजेल्लाभगुणाः कोटिदोः कर्णाः ।।**

'भारतीय ज्ञानाचा खजिना – भाग १' मध्ये 'श्रीयंत्र' या विषयावरील लेखात फिबोनाची सिरीज च्या भारतीय मुळाबद्दल विस्ताराने लिहिले आहे. याच श्रेणीच्या आधारावर श्रीयंत्राची रचना झालेली आहे.

अशी अनेक उदाहरणे देता येतील अगदी शेकड्यांनी किंवा कदाचित हजारोंनीही..!

मात्र, तुमच्या – आमच्या कानांवरून, आर्यभट्ट, भास्कराचार्य इतकीच नाव कदाचित गेलेली असतील. पण पिंगल ऋषी, ब्रह्मगुप्त, महावीर, विरहंका, श्रीपती, श्रीधर, गोपाळ, हेमचंद्र शास्त्री यांच्यासारख्या अत्यंत प्रतिभावंत गणितज्ञांची नावंही आपल्याला माहित नाहीत, हे खरोखर आपलं दुर्दैव आहे..!

(पूर्वप्रसिद्धी – 'एकता' मासिक.
सप्टेंबर, २०२४)


ही दीपावली आपणा सर्वांना श्री कृपेने आनंदाची व भरभराटीची जावो !



**नितीन प्रकाश मुनीश्वर** श्रीपूजक (हक्कदार)

करवीर निवासिनी श्री महालक्ष्मी देवीचे अभिषेक, नैवेद्य, कुंकुमार्चन, सप्तशती पाठ, इत्यादी धार्मिक विधीसाठी

संपर्क : ३०६८, ए वॉर्ड, कपिलतीर्थ मार्केट, महालक्ष्मी धर्मशाळेजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२ फोन : (०२३१) २६२३०११ / ९३७१६२३०११

# घालीन लोटांगण, वंदीन चरण !

**दा. कृ. सोमण** (पंचांगकर्ते, खगोल अभ्यासक)
मोबा. ९८१९०९८२५५

'घालीन लोटांगण' ही प्रार्थना सर्वांना पाठ असते. या प्रार्थनेत एक लय आहे. शब्दांना मधुर नाद आहे.

प्रत्येक आरतीची रचना कोणी केली आहे ते आरतीतील शेवटच्या ओळींवरून सहज लक्षात येते. परंतु 'घालीन लोटांगण' ही रचना कोणी केली आहे ते सहसा कोणाच्या लक्षांत येत नाही. कारण त्या पाच कडव्यांमध्ये काही कडवी मराठीत आहेत तर काही संस्कृतमध्ये आहेत. ही प्रार्थना कोणी एका कवींनी केलेली नाही.या पाचही कडव्यांचे रचनाकार हे वेगवेगळे आहेत. तसेच या सर्व कडव्यांच्या रचना वेगवेगळ्या कालखंडात केल्या गेल्या आहेत. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्रीगणेश पूजन व आरती झाल्यानंतर 'घालीन लोटांगण' ही प्रार्थना म्हणत असलो तरी या प्रार्थनेतील कोणताही भाग हा केवळ गणेशाला उद्देशून नाही.

'घालीन लोटांगण' या प्रार्थनेत एकूण जी पाच कडवी आहेत ती पूर्वी सध्या आपण म्हणतो त्याप्रमाणे एकदम म्हटली जात नसावी. प्रथम पहिले कडवे म्हटले जात असावे. नंतर कालांतराने दुसरे, तिसरे, चौथे व पाचवे कडवे म्हणण्याची प्रथा पडली असावी.

आज आपण 'घालीन लोटांगण' या प्रार्थनेतील प्रत्येक कडव्याची रचना कुणी केली, कोणत्या कालात त्याची रचना झाली आणि त्यांचा भावार्थ काय आहे याची आज माहिती करून घेणार आहोत.

**घालीन लोटांगण, वंदीन चरण ।**
**डोळ्यांनी पाहीन रूप तुझे ।**
**प्रेमे आलिंगिन, आनंदे पूजिन ।**
**भावें ओवाळीन म्हणे नामा ।।१।।**

पहिल्या कडव्याची ही रचना संत नामदेवांची आहे. या पहिल्या कडव्याचा अर्थ आणि शरणागत भाव सांगण्याचीही जरूरी नाही. इतका त्याचा अर्थ सोपा व सहज समजण्याजोगा आहे. संत नामदेव ( इ. सन १२७० - इ. सन १३५० ) हे वारकरी संप्रदायाचे एक महान संतकवी होऊन गेले. संत नामदेवांचे बालपण पंढरपूर क्षेत्री गेले त्यामुळे बालवयातच नामदेवांच्या मनावर विठ्ठलभक्तीचे संस्कार घडले. संत नामदेवांनी कीर्तनाच्या माध्यमातून भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत नेली. त्यांची सुमारे २५०० अभंग असलेली 'अभंग गाथा' प्रसिद्ध आहे. त्यांनी १२५ पदांची रचना हिंदीमधूनही केली आहे. त्यांच्या ६२ काव्यरचना शिखांच्या गुरू ग्रंथ साहिबात समाविष्ट आहेत.

**त्वमेव माता पिता त्वमेव ।**
**त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।**
**त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ।**
**त्वमेव सर्वं मम देवदेव ।।२।।**

दुसऱ्या कडव्याची ही रचना आद्य श्री शंकराचार्यांची आहे. गुरुस्तोत्रामध्ये गुरूसंबंधी अनेक श्लोक आहेत त्यामध्ये ही रचना अंतर्भूत करण्यात आली आहे. म्हणजेच या कडव्याची रचना सातव्या-आठव्या शतकामधील आहे. शंकराचार्य

परब्रह्माला म्हणतात – 'हे परमेश्वरा, तूच माझी माता, तूच माझा पिता आहेस, तूच माझा बंधू आणि तूच माझा सखा आहेस. तूच शाश्वत अंतिम असे ज्ञान आहेस. तूच माझे खरे धन आहेस. हे परमेश्वरा, तूच माझे सर्व काही आहेस.' परमेश्वराच्या ठिकाणी आद्य शंकराचार्य अत्यंत लीन होत असत. अतिशय विनम्र भावाने त्यांनी आपली तळमळ व्यक्त केली आहे. आद्य शंकराचार्य हे महान यती,ग्रंथकार, अद्वैत मताचे प्रचारक, स्तोत्रकार धर्मसाम्राज्याचे संस्थापक होते. हे एक महान विभूती होते.अज्ञानाच्या अंधकारात होरपळलेल्या समाजाला त्यांनी जागे करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी अनेक धर्म, पंथ यांनी समाजस्वास्थ्य बिघडवले होते. लोकांच्या मनांत आदर्शाविषयी गोंधळ निर्माण झाला होता. अशावेळी शंकराचार्यांनी धर्माचे पुनरुज्जीवन करण्याचे केलेले कार्य अतिशय महत्त्वाचे आहे.


दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा !

**शालेय स्टेशनरी**
**व**
**सर्व प्रकारची**
**ऑफिस स्टेशनरी मिळेल.**

**केदार वसंत जोशी**
**भ्रमणध्वनी : ७५८८८३९५२७**


**कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा ।**
**बुध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात् ।**
**करोमि यद्यत्सकलं परस्मै ।**
**नारायणायेति समर्पयामि ।।३।।**

हे तिसरे कडवे श्रीमद्भागवत पुराणातील आहे. श्रीमद्भागवताचा काळ म्हणजे सुमारे पाच हजार वर्षांपूर्वीचा हा काळ आहे. भागवत पुराणाचे लेखन महर्षी व्यासमुनींनी केले आहे. प्रत्यक्ष परब्रह्म कृष्णरूपाने सगुण रूपात अवतरले आहे अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. म्हणूनच पुराणांचे विभाजन करून त्यांनी आपल्या शिष्यांकडून अठरा पुराणे तयार करवून घेतली. त्याचप्रमाणे श्रीमद्भागवताचेही नंतरच्या काळात त्यानी लेखन केले आणि कृष्ण चरित्रात मन पूर्णपणे गुंतून गेल्याने त्यांचे मन शांत झाले. ते त्या नारायणाला म्हणजेच श्रीकृष्णाला म्हणतात – 'शरीराने, वाणीने, मनाने आणि सर्व इंद्रियांनी जाणीवपूर्वक किंवा नैसर्गिक स्वभावाप्रमाणे जे जे कर्म मी करतो ते ते मी नारायणाला म्हणजेच श्रीकृष्णाला अर्पण करतो.' या समर्पणाच्या भावनेनंतर परब्रह्माच्या सगुण रूपाकडून निर्गुण रूपाकडे भक्त वळावा म्हणून पुढील श्लोक म्हटला जातो.

**अच्युतं केशवं रामनारायणं ।**
**कृष्ण दामोदरं वासुदेवं हरिम् ।**
**श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं ।**
**जानकीनायकं रामचंद्र भजे ।। ४ ।।**

हे चौथे कडवे आदि शंकराचार्यांच्या अच्युताष्टकम् मधील हा पहिलाच श्लोक आहे. अच्युत म्हणजे आपल्या सच्चिदानंद स्वरूपापासून कधीही भ्रष्ट न होणारा परिपूर्ण परमात्मा ! त्याने विश्वाच्या कल्याणासाठी विष्णू, शिव, राम, कृष्ण वगैरे सगुण रूपे धारण केली. म्हणून या सगुण

परमेश्वराला विष्णू, कृष्ण, राम या सगुण रूपात विविध नांवांनी विनम्रपणे साद घालून रक्षण करण्याची, कृपा करण्याची प्रार्थना केली आहे. ही सर्व एकाच परब्रह्माची विविध रूपे आहेत. हा सुंदर श्लोक सर्वतोमुखी आहे. शंकराचार्यांचा काळ म्हणजे ७-८ शतकामधील आहे. अच्युताष्टकम् स्तोत्रातील आठ श्लोकात नारायणाची नावे असून नववा श्लोक हा फलाविषयीचा आहे. या स्तोत्रात परमेश्वराने दु:खसागरातून आपणास बाहेर काढावे अशी प्रार्थना केली आहे.

**हरे राम हरे राम, राम राम हरे हरे ।**
**हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ।।५।।**

हे पाचवे कडवे कलिसन्तरण उपनिषदामधील आहे. म्हणजे ही रचना इसवी सन पूर्व तीन हजार वर्षांपूर्वीची आहे. एकूण १०८ उपनिषदे आहेत. कलिसन्तरण हे कृष्ण यजुर्वेदीय उपनिषद आहे. 'घालीन लोटांगण' या प्रार्थनेतील हा शेवटचा श्लोक आहे. प्रार्थनेचा समारोप करतांना सर्व देवदेवतांना विनम्र होऊन नमस्कार केला जातो. आपल्या भारत देशात त्याकाळी शैव-वैष्णवपंथी यांचे संघर्ष होत होते. बौद्ध, जैन, संप्रदाय आपापली मते लोकांसमोर अगदी ठामपणे सांगत होते. हिंदू धर्मावर संकट ओढवले होते. अशावेळी आपापसातील निरर्थक असणारा वाद शांत करणे आवश्यक होते. विष्णू, शिव, राम, कृष्ण ही सर्व दैवते एकाच परब्रह्माची सगुण रूपे आहेत, म्हणून कोणत्याही सगुण रूपाला शरण जा. त्याची भक्ती करा . ती भक्ती परब्रह्म परमात्म्यापर्यंतच पोहोचणार आहे. हा विचार समाजापर्यंत पोहोचावयाचा असल्याने 'हरे राम, हरे राम' हे भजन करण्यात येऊ लागले. हे भजन खूप लोकप्रियही झाले. त्यामुळे या भजनामागचा मूळ हेतूही सफल झाला.

आरत्या म्हटल्यानंतर सश्रद्ध भक्त 'घालीन लोटांगण' हे भजन म्हणत असतांना इतके तल्लीन होतात की समोर गणेशाची वा कोणत्याही दैवताची मूर्ती असली तरी त्या परब्रह्माशी एकरूप होण्याचा प्रयत्न करतात. धूप- कापूर- अगरबत्तीचा सुगंध दरवळत असतो. वातावरण मंगल व प्रसन्न झाल्यामुळे सर्वजण पवित्र आनंदाचा अनुभव घेत असतात. माणसे आपले दु:ख, चिंता, काळजी आणि आपापसातील मतभेद विसरून जातात. वातावरणात भक्ती, श्रद्धा यांचा महासागर दर्शन देत असतो. आनंद, उत्साह याच प्रसादाचा आस्वाद प्रत्येकजण घेत असतो.

*आधी आमच्या सोसायटीत*
*आमच्यासोबत कोणी बोलत नव्हतं.....*
*पण जेव्हा सगळ्यांना कळलं की*
*आमच्याकडे उंच स्टूल....*
*फोल्डिंगची शिडी...*
*आणि*
*जळमटं काढण्यासाठी दांडा असलेला*
*झाडू आहे...*
*तेव्हापासून सगळे आमच्याशी थांबून*
*बोलू लागलेत...*


YASH COMPUTERS
Annual Maintenance | Networking Services
Computer Printer Laptop Sales & Services
786/1 B, 'Sarthak', Opp. Balaji Park,
Nandanvan Colony No. 2, Kolhapur - 416 007
Swapnil J. Sapre
9850554663
swapneelsapre@gmail.com
yashcomputerskolhapur@gmail.com
Thank You For Your Enquiry

महालक्ष्मीच्या सर्व भक्तांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

# सिद्धीविनायक सेवा कार्यालय

## नंदकुमार मराठे

# प्रसाद पूजा सेंटर

आमचेकडे श्री महालक्ष्मीस अभिषेक, पाद्यपूजा, महापूजा, महानैवेद्य, कुंकुमार्चन, देवीचा गोंधळ, बोडण, सप्तशती पाठ वाचन व इतर धार्मिक कार्ये स्वीकारली जातील.

निवास : २२५७/१-२, ए वॉर्ड, बाबुजमालजवळ,
जीवबानाना जाधव अपार्टमेंट, फ्लॅट क्र. १०१,
कोल्हापूर -१२.

दुकान : महालक्ष्मी मंदिर दक्षिण दरवाजा,
विद्यापीठ हायस्कूलजवळ, कोल्हापूर मो. ९९७५४२९४९४

दूरध्वनी : (०२३१) नि. २५४१८२३, दु. २५४७६८९
E-mail : swanand.marathe_99@yahoo.com

## सहकार क्षेत्रातील अग्रगण्य बँक

कोल्हापूर - पुणे - सांगली - नवी मुंबई

# श्री महालक्ष्मी को-ऑप. बँक लि; कोल्हापूर

**प्रधान कार्यालय : श्री. भवन, 167 बी, मंगळवार पेठ, कोल्हापूर.**
**फोन : 2543837, 2545552, 2545587**

www.smcbl.co.in/ smcbl.ho@gmail.com smcblbank 7720996633

**ॲड. राजेंद्र प्र. किंकर**
अध्यक्ष

**श्री. बाजीराव द. खरोशे**
प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी

**सीए केदार प्र. हसबनीस**
उपाध्यक्ष

...: संचालक :...

| | | |
|---|---|---|
| श्री. श्रीधर कुलकर्णी | श्री. संदिप कुलकर्णी | श्री. विनोद डिग्रजकर |
| सीए. महेश धर्माधिकारी | डॉ. सौ. रुपा नागांवकर | श्री. उदय महेकर |
| ॲड. अशोक मुंडरगी | ॲड. रघुनाथ लाटकर | ॲड. रवि शिराळकर |
| श्री. श्रीकांत हेर्लेकर | श्री. प्रशांत कासार | श्री. कृष्णा काशिद |
| श्री. नितीन डोईफोडे | सौ. पद्मजा र. आपटे | सौ. मेधा जोशी |



Daily Service From Kolhapur to Ratnagiri Dist.
JTC
Daily Kokan Service
जागृति ट्रान्सपोर्ट
GOODS CARRIER
रत्नागिरी भाग्य लक्ष्मी एक्सप्रेस
BYX 5326
JAGRUTI TRANSPORT CO.
Lorry Owners & Govt. Transport Contractors
D. K. Joshi 93727 07772
A. D. Joshi 93727 77772
Kolhapur Office 713/2B, Shahupuri 4th Lane, Kolhapur. Ph.: 2688538, 2655576.
Resi. T2, Shri Shivananda, Ayodhya Park, Opp. Sangam Talkies, Tararani Chowk, Kolhapur - 416 005.




दिपावली निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा..!
शिवराई
AARYA COINS & COLLECTIBLES
शिवराई
AARYA COINS & COLLECTIBLES
Online Numismatic Store
Vidyadhar A. Gokhale: +91 9922895465
Plot No. 8, Sanyukta Maharashtra Hsg. Soc. Rajarampuri 15th Lane, Kolhapur-416 008. Contact : + 91 7057061674 (Office)
onlineshivarai@gmail.com shivaraiappweb@gmail.com
www.shivarai.in
shivrai
Dealers in all types of old coins, currencies & foreign coins
shivarai_swarajyache_chalan
shivarai web app
कॉटन पर्सचे दालन
अवनी
अवश्य भेट द्या.
सौ. मयुरा गोखले 8007453344
श्री. कौस्तुभ गोखले 9860253344
८,संयुक्त महाराष्ट्र को-ऑप हौसिंग सोसा, राजारामपुरी १५ वी गल्ली, कोल्हापूर.

# घड्याळ

•

**रविकिरण पराडकर**
मोबा. ७५०६७३६११५

ज्येष्ठ नागरिकांची ती एक छान पावसाळी सहल. रिसॉर्ट मुंबई जवळचेच. मी निमंत्रित म्हणून उपस्थित होतो. सायंकाळी सगळे हिरवळीवर खुर्च्या टाकून बसलेले. पाऊस नव्हता पण छान गार वारा सुटलेला. सोबत कांदाभजी आणि गरम वाफाळता चहा. मग आठवतील त्या जुन्या मराठी कविता म्हणण्याची टूम निघाली. आजीच्या जवळी घड्याळ कसले, आहे चमत्कारिक, देई ठेवूनि ते कुठे अजुनि हे, नाही कुणा ठाऊक... एका गोऱ्यापान, नाकेल्या आजोबांनी मोठ्या उत्साहानी सुरवात केली. निळ्या रंगाचा टी शर्ट घातलेल्या त्यांच्या चेहऱ्यावरचा, एखाद्या लहान मुलासारखा आनंद पाहण्यासारखा होता. बहुधा ते त्यांच्या आठवणीतील त्यांच्या शाळेच्या वर्गात शिरले असावेत.

हे आनंदराव देशमुख, नावाप्रमाणेच सदा आनंदी असतात. सरकारी खात्यात मोठे अधिकारी होते ते. बाजूच्या सद्‌गृहस्थांनी सांगितले. वय वर्षे पंचाऐशी. पूर्वी छान बॅडमिंटन खेळत. अहो त्यांच्या हृदयावर दोन शस्त्रक्रिया झाल्यात आतापर्यंत, पण कशात नसतात ते? गाण्याची आवड आहे. वसाहतीमध्ये झाडे लावण्यात यांचाच पुढाकार, सतराव्या वर्षी हौसेने पेटी शिकले. अलीकडेपर्यंत शाळेतील गरीब मुलांच्या मोफत शिकवण्या घेत. ह्या सहलीच्या नियोजनातही त्यांचाच पुढाकार. फेसबुक काय ? ट्वीटर काय? कशात मागे नाहीत. प्रत्येकाला मदत करण्यात पुढे. लहानापासून थोरापर्यंत सगळे ह्यांचे मित्र. मी त्यांच्याकडे आदरमिश्रित कौतुकाने पाहू लागलो. ते अगदी तालासुरात गात होते 'आजीचे घड्याळ' आचार्य अत्र्यांची ती माझी आवडती कविता. त्याची टिकटिक चालते न कधीही, आहे मुके वाटते, किल्ली देई न त्यास ती कधी तरी ते सारखे चालते... खुर्चीवर मागे डोके टेकवून मीही गुणगुणू लागलो. त्या वातावरणात जणू माझी तंद्रीच लागली. मनात घडयाळाच्या आठवणींनी फेर धरला.

अगदी लहानपणी आम्ही खेळण्यातील पत्यांची घड्याळासारखी रचना करून एक खेळ खेळत असू. मला तो फार आवडत असे. आता त्याचे नियम नीट आठवत नाहीत. मुलांना घड्याळ शिकवणे हिही एक मोठ्या चिकाटीची गोष्ट असे. शालेय जीवनात मला शारीरिक शिक्षण शिकवणाऱ्या सरांकडे असलेल्या स्टॉप वॉच चे फार आकर्षण वाटे. तसेच गांधीजींच्या फोटोतील त्यांच्या त्या साखळी बांधलेल्या घड्याळाचेही खूप कुतूहल वाटे. नंतर महाविद्यालयीन जीवनात ती जागा जेम्स बॉण्डच्या घड्याळाने घेतली. घडयाळाच्या सहाय्याने काय काय अफलातून करामती करत असे तो ! स्वतःजवळ असे घड्याळ असावे वाटे. मला आठवते माझ्या दहावीच्या परीक्षेच्या वेळी मला बाबांनी त्यांच्या हातातील घड्याळ वापरायला दिले होते. अकरावीला मला स्वतःचे घड्याळ मिळाले तेव्हा तर कोण आनंद झाला. आता हसू येते पण त्यावेळी जाणारा येणारा प्रत्येकजण आपल्या हातातील नवीन घड्याळाकडे पाहतो आहे असे वाटे. त्याबद्दल कोणी विचारले तरी आनंद होई. लोकांनी आपल्याला किती वाजले ते विचारावे आणि आपण ते ऐटीत सांगावे असे वाटे. नंतर विविध कंपन्यांची अनेक घड्याळे वापरली पण तो

आनंद पुन्हा मिळाला नाही. मी नववीत असताना मावशीबरोबर हैद्राबादला गेलो होतो. तेथील सालारजंग म्युझियममधील ते सुप्रसिद्ध घड्याळ अजूनही आठवते. घड्याळात टोल पडायच्यावेळी त्या मोठ्या घड्याळातील छोट्याशा घराचे दार उघडे. त्यातून एक माणसासारखा बाहुला बाहेर येई आणि आवश्यक तेव्हढे टोल देऊन पुन्हा आत निघून जाई. लोक टाळ्यांचा कडकडाट करत.

अशी वैशिष्ट्यपूर्ण घड्याळे सुस्थितीत ठेवणारा, माणूसही तसाच तरबेज असावा लागतो. मुंबईत राजाबाई टॉवर, महानगरपालिका मुख्यालय, किंवा छ. शिवाजी महाराज टर्मिनस या इमारतीवरील त्या जुन्या मोठ्या घड्याळांची देखभाल वर्षानुवर्षे आस्थेने करणारी ठराविक माणसेच आहेत ती त्यामुळेच. 'येरागबाळ्याचे काम नोहे ते, तेथ पाहिजे जातीचे हेच खरे !'

शालेय जीवनात घड्याळाचे विशेषतः मनगटी घड्याळांचे खूप कुतूहल असे. कारण ती तशी दुर्मिळ चीज होती. अर्थात त्याची गरजही पडत नसे. शाळेचा शिपाई गोल पितळी तबकडीवर हातातील लोखंडी हातोडीने जितके व ज्या वेगवेगळ्या पद्धतीने टोल वाजवत असे त्यावरून शाळा भरल्याची वेळ झाली, लघवीची सुट्टी झाली, मधली सुट्टी झाली आणि मुख्य म्हणजे शाळा सुटली, या अत्यावश्यक गोष्टी आम्हाला कळत असत. पुढे धातूच्या तबकडीच्या जागी देवळातील घंटेसारखी मोठी घंटा आली आणि लघवीची घंटा झाली, जेवणाची घंटा झाली असे शब्दप्रयोग रूढ झाले. आता तर शहरात त्यांची जागा इलेक्ट्रिक बझरने घेतली आहे.

पूर्वी विद्यार्थ्यांच्या हातात चुकूनच घड्याळ दिसे. तेही बहुधा दहावी नंतर. शिक्षकांकडे मात्र घड्याळे असत. ते घड्याळाकडे पाहू लागले की आम्हाला त्यांचा तास (म्हणजे पिरिअड जो पूर्वी ३५ मिनिटांचा असे संपत आल्याचे कळे आणि आमची चुळबुळ सुरू होई. शाळेला उशीर झाला की मात्र शाळेत पोचेपर्यंत वाटेत जाणाऱ्या येणाऱ्या दोन तीन माणसांना तरी किती वाजले ? अशी विचारणा आम्ही करत असू आणि वर्गाकडे पळता जातानाही शाळेच्या ऑफिसमधील भिंतीवर लावलेल्या मोठ्या घड्याळाकडेही चटकन नजर जाई. कारण उशीर झाला की सर छडीचा प्रसाद देणार किंवा वर्गात न घेता बाहेर उभे करणार अशी धाकधूक वाटत असे.

आपण घड्याळात वेळ 'पाहतो' मात्र विचारताना किती वाजले? असे का विचारतो ? याचे कुतूहल मला बरेच दिवस होते. त्याचे उत्तर ठणऽऽऽ ठणऽऽऽ वाजणाऱ्या टोलात आहे, हे नंतर कळाले. पूर्वी घरोघरी घड्याळे नसत. गावातील न्यायालय, नगरपालिका इमारत, चर्च, खास घड्याळांसाठी बांधलेले टॉवर, अशा ठिकाणी ठोके पडणारी घड्याळे असत. वेळ कळण्यासाठी नागरिक त्यात किती वाजले ? (म्हणजे किती टोल वाजले ?) असे एकमेकांना विचारत आणि तीच प्रथा पुढे रुढ झाली.

मग त्याही पूर्वीच्या काळात वेळ कशी पाहत? फार पूर्वी वेळ मोजण्यासाठी वयस्कर माणसांचे अनुभवांती आलेले ठोकताळे असत. अचूक वेळेची त्यावेळच्या ग्रामीण व्यवस्थेत गरजही नव्हती. झुंजूमुंजू झाले, तांबडे फुटले, सूर्य कासराभर वर आला, सूर्य डोक्यावर आला, सूर्य डोंगराआड गेला, अशा शब्दातून पहाट, सकाळ, दुपार, सायंकाळ, रात्र, झाल्याचे एकमेकांना अवगत करत. जुनी माणसे अनुभवाने एखाद्या नेहमीच्या झाडाच्या, खांबाच्या सावलीवरूनही वेळेचे गणित बरोबर मांडत. घरी घटिकापात्र असे. पाण्याने भरलेल्या एका भांड्यात छिद्र असलेले दुसरे एक लहान भांडे तरंगत ठेवत. त्यात पाणी शिरत शिरत ठराविक वेळाने ते

बुडाले की एक घटिका झाली. पुन्हा ते घटिकापात्र रिकामे करून पाण्यात तरंगत सोडायचे. लग्नाचा वेळी 'लग्नघटिका जवळ आली' असा शब्दप्रयोग वापरत किंवा अगदी अलीकडेपर्यंत घरातील वृद्ध माणसे 'जरा घटकाभर विश्रांती घेतो' म्हणत हे शब्दप्रयोग यातूनच आले. नंतर डमरूच्या आकाराचे दोन भागात विभागलेले काचेचे वालुकापात्र असे. वरच्या भागात बारीक चाळलेली वाळू भरत. मधल्या अरुंद पोकळ भागातून ती हळूहळू खालच्या भागात पडत असे. वरच्या भाग पूर्ण रिकामा होण्यास ठराविक वेळ लागे त्यावरून कालगणना केली जाई.

माझ्या लहानपणी दूरदर्शन नव्हते पण मध्यमवर्गीय घरात मर्फी किंवा फिलिप्स कंपनीचा रेडीओ मात्र हमखास असे आणि तो नियमितपणे ऐकला जाई. भक्तीसंगीत ऐकू आले की सकाळचे साडेसहा वाजले. कामगारसभा कार्यक्रम सुरू झाला म्हणजे सकाळचे अकरा वाजले, आपली आवड गाण्यांचा कार्यक्रम सुरु झाला म्हणजे रात्रीचे दहा वाजले हे बरोबर समजत असे. रेडिओवरची वेळ अचूक व ग्राह्य मानली जाई. म्हणूनच एखाद्याला तुमचे घड्याळ बरोबर आहे का ? असे विचारले की घड्याळ रेडिओ टायम आहे असे तो जरा टेचातच उत्तर देई.

कोल्हापूरला बिन्दुचौक जेलजवळ घड्याळ दुरुस्तीचे एक छोटेसे दुकान होते. त्यावर घड्याळांचे डॉक्टर अशी पाटी होती. त्याची मला खूप गंमत वाटे. नंतर कधी त्या दुकानात गेलो तर त्या दुकानदारासमोरील फळीवर तऱ्हेतऱ्हेची अनेक घड्याळे उघडून ठेवलेली दिसत असत. मला खरोखरच ते विविध आजाराने त्रस्त पेशंट वाटत. ती व्यक्तीही डॉक्टरने गंभीर रुग्णाची शत्रक्रिया करावी तशी हातातील आयुधांनी एखाद्या घड्याळाची अगदी एकाग्रतेने दुरुस्ती करत असे. उघड्या घडयाळाच्या आतील ती दातेरी चक्रे व इतर पार्टस पाहून मलाही शालेय पुस्तकातील, पोटाच्या आंतररचनेची आकृती पहिल्याचा भास होई.

पूर्वीची मनगटी घड्याळे सेलवर चालणारी नसत. साधारण दर २४ तासांनी बाजूची कळ फिरवून किल्ली द्यावी लागे. मला आठवते माझ्या बाबांचे असे काळ्या पट्ट्याचे मनगटी घड्याळ होते. त्याच्या डायलवर मराठी अंक होते. त्यांचे खूप आवडते होते ते. एकदा बाबा रात्री चित्रपट पाहायला पद्मा थिएटरला गेले. घरी परतल्यावर त्यांच्या एकदम लक्षात आले हातात घड्याळ नाही. बहुधा चित्रपट सुटल्यावर गर्दीत कुणी मारले असावे या विचाराने ते खूप हळहळले. लगेच नवीन घड्याळ घ्यावे अशी परिस्थिती नव्हती. दोन दिवसांनी दैनिक पुढारी वाचत असताना अचानक त्यांच्या नजरेला छोट्या जाहिरातीमधील एक जाहिरात पडली. गोखले कॉलेजच्या प्राचार्यांनी दिली होती ती. 'दोन दिवसांपूर्वी त्यांच्या कॉलेजमधील एक विद्यार्थी सिनेमा पाहून बाहेर पडत असता त्याला एक मनगटी घड्याळ मिळाले असून त्याने ते कॉलेजमध्ये जमा केले आहे, ज्याचे असेल त्याने कॉलेजमध्ये येऊन घड्याळाची ओळख पटवून घेऊन जावे.' अशा आशयाची जाहिरात होती.

बाबा तत्काळ कॉलेजात गेले. मला वाटते बहुधा त्यावेळी एम. आर. देसाई प्राचार्य होते. बाबा त्यांना भेटले. घडयाळाच्या खाणाखुणा सांगितल्यावर त्यांची खात्री पटली आणि त्यांनी लगेच ते घड्याळ बाबांना परत केले. 'पण ज्याने हे सापडलेलेले घड्याळ परत केले तो विद्यार्थी भेटू शकेल का?' बाबांनी विचारले. प्राचार्यांना जरा आश्चर्य वाटले. कारण घड्याळ तर परत दिले होते. पण बाबांना तो प्रामाणिक विद्यार्थी पाहण्याची उत्सुकता होती. त्याच्या प्रामाणिकपणाची कदर करायची होती. सुदैवाने कांबळे नावाचा तो विद्यार्थी वर्गातच होता. तो आल्यावर प्रचार्यांसमोर बाबांनी

त्याचे तोंड भरून कौतुक केले. एवढेच नव्हे तर मी हे घड्याळ मिळण्याची आशाच सोडली होती. काही दिवसांनी नवीन घेणारच होतो. तुला मात्र कॉलेजला ह्याचा चांगला उपयोग होईल. तुझ्या प्रामाणिक पणाचे बक्षीस म्हणून हे तूच ठेऊन घे. असे सांगून त्याला ते घड्याळ देऊ केले. पण हातात घड्याळ नसलेल्या त्या गरीब, प्रामाणिक विद्यार्थ्याने ते बक्षीस नम्रपणे नाकारले. शेवटी बळेबळे त्याला काही बक्षीस देऊन आणि महाविद्यालयाला जाहिरातीचा खर्च देऊन बाबा त्यांचे आवडते घड्याळ घेऊन आनंदाने घरी परतले. घरी आल्यावर सुद्धा ते त्या विद्यार्थ्याच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करत होते.

घड्याळाची आणखी एक आठवण म्हणजे आमच्या घरी 'अमृत' व 'संजय' मासिकाचे खूप जुने अंक होते. संजय मासिक साधारण इंग्रजीतील 'रीडर्स डायजेस्ट' या मासिकाच्या धर्तीवर होते. त्यातील एका अंकात 'हणमंतराव हेन्द्रेचा खून कोणी केला?' या मथळ्याखाली एक पानभर चित्र होते. आरामखुर्चीवर अस्ताव्यस्त पडलेले ते टक्कल असलेल्या हणमंतरावांचे शव, भिंतीवरील मोठे घड्याळ, अर्धवट लोटलेले दार, दोन तीन ठिकाणी असलेल्या बंदुकीच्या गोळ्या लागल्याच्या खुणा. आज सुमारे पन्नास पंचावन वर्षांनीही ते चित्र जसेच्या तसे डोळ्यासमोर येते. खाली त्यांच्या घरी कोणकोण आहे. कोण कोणत्या वेळी घरात आले किंवा बाहेर गेले याचा तपशील. त्यावरून खुनी ओळखायचा. मला नाही ओळखता आला. मग अंकात इतरत्र दिलेले उत्तर पाहिले. तेव्हा कळाले की भिंतीवरील घड्याळावर मध्यभागी बंदुकीची एक गोळी लागल्याची खूण होती व तेथे भोक पडले होते. त्यामुळे घड्याळ बंद पडले होते ही निरीक्षण आणि तर्काधारित अनुमान केले की बंद पडतेवेळी घड्याळात जी वेळ होती. त्यावेळी घरात उपस्थित असलेली व्यक्ति म्हणजे खुनी इसम, असा काहीसा तो क्लू होता आणि मला तो खूपच आवडला होता. नंतर आणखी काही कथा आणि सिनेमात मला खुनाच्या शोधात बंद पडलेल्या घड्याळाचा उपयोग झाल्याचे दिसून आले. पुढे मी स्वतःच पोलीस खात्यात आलो. अनेक खुनाच्या गुन्हयांचा तपास केला पण मला मात्र हे बंद पडलेले घड्याळ कधी उपयोगी नाही पडले, याचे उगीचच वाईट वाटे. अशोककुमारच्या जुन्या कानून सिनेमतील कोर्ट सीन देखील त्याकाळी बराच गाजला होता तो. त्यातील काही मिनिटांचा तो पिन ड्रॉप साइलेन्स, आणि त्या वेळचा फक्त तो भिंतीवरील घड्याळाचा टिक ऽऽ टिक ऽऽ आवाज यामुळे.

एखाद्या वक्त्याचे भाषण रटाळ आणि लंबेचौंडे असेल तर श्रोते हातातल्या घड्याळाकडे वारंवार नजर टाकू लागतात. वक्त्याने ही सूचक खूण समजून आवरते घेतले पाहिजे. पण काहीजण या मवाळ इशाऱ्याला अजिबात दाद देत नाहीत. मग श्रोते जोरात टाळ्या वाजवू लागतात. काही कोडगे वक्ते या टाळ्या आपल्या वक्तृत्वालाच आहेत, असे गृहीत धरून आणखी लांबड लावतात. तेव्हा हसावे का रडावे कळत नाही.

एक जमाना होता ज्यावेळी मुंबईत सोने, अमली पदार्थ आणि विदेशी मद्य याचबरोबर विदेशी घड्याळांचीही मोठ्या प्रमाणात तस्करी चाले. एच.एम.टी. ही घड्याळे बनवणारी भारतीय कंपनी होती. तिचे एक छोटे युनिट आपल्या गावात कोल्हापुरात आहे याचाच आनंद त्यावेळी अधिक. (विशेष म्हणजे याच कंपनीने अगदी शेवटच्या टप्प्यात उत्पादित केलेले एक किल्लीवर चालणारे मनगटी घड्याळ मला अलीकडेच माझ्या मुलीने भेट दिले.) नंतर टायटन सारख्या भारतीय कंपनीने विदेशी तोडीची वैविध्यपूर्ण घड्याळे बाजारात आणली आणि परदेशी घड्याळाचा सामान्य माणसाचा सोसही कमी झाला. मी पोलीस खात्यात आलो

त्यावेळी या बदलाचा संधीकाल होता.

पायधुनी पोलीस ठाण्यात असताना फसवणुकीच्या विविध तक्रारी येत त्यातील एक तक्रार घड्याळ खरेदीची असे. गर्दीतील एखादा माणूस बरोबर हेरून एखादा भामटा छान घड्याळ दाखवी 'इम्पोर्टेड माल है साब लेकीन पैसेकी जरुरत है करके सस्तेमें बेच रहा हू' म्हणून सांगे. ते घड्याळ पाहूनच तो मोहात पड़े. मग त्याला बाजूला घेऊन जात. झटपट घासाधीस होऊन किंमत ठरे. त्याच्यासमोर घड्याळ मस्त गुलाबी जाड कागदाच्या पुडीत गुंडाळून त्याला पैसे द्यायला सांगत. पैसे देताच पुडी त्याच्याकडे देत आणि पोलीस आ रहा है. ये लेओ और जल्दी निकलो म्हणत पुडी त्याच्या हाती ठेवत. तो ती पुडी झटपट खिशात ठेवून निघत असे. थोड्या वेळाने त्याला घड्याळ बघण्याचा मोह अनावर होई आणि आडबाजूला जाऊन हळूच तो ती पुडी उघडीत असे तर आत दोन पत्र्याच्या गोल चकत्या आणि मध्ये फरशीचा तुकडा, मग आपला बकरा बनवल्याचे त्याच्या लक्षात येई आणि तो धावतपळत पोलीस ठाणे गाठे. जेव्हा ग्राहक देण्यासाठी खिशातून पैसे काढीत असे तेव्हा इतक्या शिताफीने तो भामटा घड्याळ बांधलेली पुडी लपवून आधीच बांधून ठेवलेली अगदी तशीच दुसरी पुडी बाहेर काढत असे की ग्राहकाच्या ही हातचलाखी लक्षातही येत नसे. असे दोनतीन भामटे आम्ही पकडले होते, पण नवल याचे वाटे की हजार रुपयांचे घड्याळ दोनशे रुपयाला म्हंटल्यावर अगदी शिकले सवरलेले लोक सारासार विचार न करता चटकन मोहात पडत. एकदा तर मंत्रालयातल्या अधिकाऱ्याने असे घड्याळ खरेदी केले. घरी जाऊन थेट बायकोसमोर बसला आणि तुला छान भेट आणली आहे. म्हणत पुडी उघडली. घड्याळात नाही पण त्याचे मात्र बारा वाजले. बायको त्याच्याबरोबर पोलीस ठाण्यात आलीच आणि जेवढा वेळ मी तक्रार लिहीत होतो तेवढा वेळ तिने मला, आपला नवरा कसा बावळट आहे आणि नेहमीच कसा व्यवहारशून्य वागतो, हे उदाहरणांसहित ऐकवले. एवढा मोठा अधिकारी पण त्याचा तो केविलवाणा चेहरा खरोखर पाहवत नव्हता.

पोलीस खात्यातील आणखी एक किस्सा. मला निवडणूक केंद्रावर बंदोबस्त होता. शेवटी शेवटी एकजण माझ्याकडे तक्रार घेऊन आला. बंदोबस्तावरील पोलीस मुद्दामहून हातातील घड्याळाकडे बघतात त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रचार होतो. मला हसावे की रडावे कळेना. मतदान संपायला किती वेळ राहिला, ते बघतात अधूनमधून म्हणून सांगितले पण त्याच्या काही डोक्यात शिरेना. मग मी त्याला माझ्या गणवेशाच्या दंडावर असलेलेला इनसिग्निआ दाखवला. विचारले हा बॅज आहे सगळ्या पोलिसांच्या दंडावर? हो तो म्हणाला. मग त्या चिन्हाच्या मध्ये असलेला पंजा दाखवला. विचारले हे कोणाचे चिन्ह आहे? म्हणाला काँग्रेसचे, मग माझ्या शर्टाच्या दुसऱ्या बाहीवर लावलेले धातूचे चक्र दाखवले. (त्या वेळी मी वाहतूक शाखेत असल्याने बाहीवर चक्र असे) विचारले हे कोणाचे चिन्ह रे बाबा? म्हणाला जनता दलाचे, मग आता सांगा, ते जे कोण पोलीस हाताची घडी घालून उभे आहेत, ते नक्कीच पंजा किंवा चक्र मतदारांना दाखवून काँग्रेस आणि जनता दलाचा प्रचार करताहेत. बरोबर ना? तो अतीशाहणा कार्यकर्ता खजील होऊन निघून गेला.

मला मात्र बऱ्याचवेळा घड्याळ बघितले की गीतेतील श्रीकृष्णाच्या 'कर्मण्ये वाधिकारस्ये, मा फलेषु कदाचन' (अर्थात कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता कर्म करत रहा.) या श्लोकाची आठवण येते. १५ ऑगस्टच्या रात्री लाल किल्ल्यावर, कधी रात्रीचे बारा वाजतात आणि देशाचे स्वातंत्र्य घोषित होते, यासाठी आतुरतेने घड्याळाकडे पाहणारे लाखो

आनंदी डोळे आणि भगतसिंग, राजगुरू, सुखदेव या महान क्रांतीकारकांना फासावर चढवण्याची वेळ झाली का हे घड्याळात पाहणारे जाल्लादाचे थंड डोळे, वेळ संपत आली पण खूप लिहायचे राहून गेले, असे म्हणत घड्याळाकडे नजर टाकणारे हजारो विद्यार्थ्यांचे ते हताश डोळे आणि मुहूर्ताची वेळ होत आली, अजुनी वराची वरात कशी नाही आली? असे पुटपुटत वारंवार घड्याळाकडे नजर टाकणारे भटजीचे नाराज डोळे, घडयाळाच्या दृष्टीने सर्व सारखेच. खरोखर किती स्थितप्रज्ञ असते ना घड्याळ? त्याला फक्त आपले कर्तव्य माहीत.

अरे काय झालं? उचला उचला ! कोणीतरी मोठ्याने ओरडले आणि एकच गलका झाला. माझी तंद्री भंग पावली. मी डोळे उघडतो तो विश्वासच बसेना. देशमुख अचानक खाली कोसळले होते. कोण त्यांना वारा घालू लागले. कोण पाणी आणायला पळाले. सुदैवाने त्या जेष्ठ नागरिकात एक डॉक्टरही होते. त्यांनी कोणाला तरी त्यांची बॅग आणायला पिटाळले. ते स्वतः देशमुखांजवळ येऊन तपासू लागले आणि त्यांच्या डोळ्यात टचकन पाणी आले. आपले आनंदराव गेले. गदगदत्या स्वरात ते म्हणाले आणि सारे सुन्न झाले. काही क्षणांपूर्वी आनंदाने आज्जीचे घड्याळ म्हणणारे आनंदराव आपल्याला कायमचे सोडून गेले यावर कोणाचा विश्वासच बसत नव्हता. मीही निशब्द झालो होतो. त्यांच्याकडे पाहता पाहता 'आनंद' सिनेमातील तो राजेश खन्ना डोळ्यासमोर आला 'बाबूमोशाय, हम सब तो इस रंगमंचकी कठपुतलीया है जिनकी डोर उपरवालेकी उंगलीमे बंधी है. कब, कौन, कैसे उठेगा, ये कोई नही बता सकता है.' हे त्रिकालाबाधीत सत्य हसत हसत सांगणारा !

मी आनंदरावांच्या चेहऱ्याकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर वेदनेचा लवलेशही नव्हता, उलट मंद निरागस हास्य विलसत होते. क्षणात माझ्या मनात विचार चमकून गेला, मानवी जीवन हे एकच असे घड्याळ आहे की ज्याची किल्ली एकदाच दिली जाते आणि ती केव्हा संपणार हे नियतीलाच माहित असते. मात्र आयुष्याच्या या घड्याळातील क्षण अन क्षण आनंदराव समरसून जगले होते. केवळ स्वतःसाठी नव्हे तर इतरांसाठीही जगले होते. हे घड्याळ केव्हा ना केव्हा बंद पडणारच आहे याची त्यांना पूर्ण जाणीव होती. जणू त्यामुळेच त्यांनी जीवनाचा रसिकतेने पुरेपूर आस्वाद घेतला होता. स्वतः आनंदी राहून त्यांनी इतरांच्या आयुष्यातही आनंद फुलवला होता. म्हणूनच मृत्यूही त्यांच्या चेहऱ्यावरचे ते निर्मल, आनंदी, कृतार्थ भाव हिरावून घेवू शकला नसावा. आपण अमरत्वाचा पट्टा घेऊन आलेलो नाही. हे घड्याळही कधी ना कधी बंद पडणार आहे, याची जाणीव अशीच प्रत्येकास असती तर...



# काश्मिरच्या अनंत जुन्या कथा

**हेमंत केळकर**

काश्मीरच्या अनंत जुन्या कथा (मायथोलॉजी नाही, मिथ्या नाही हे ठासून सांगा.)



काश्मीर हे ज्ञानसाधनेचे केंद्र म्हणून कश्यप ऋषींनी वसवले. काश्मीर हे नाव आलेच मुळी काश्यपांपासून. 'काश्यपस्य मीर' ! संस्कृत भाषेत मीर म्हणजे मोठे सरोवर.

काश्यप हे सध्या सुरू असलेल्या वैवस्वत मन्वंतरातील मरीची या सप्तऋषींपैकी एक असलेल्या ऋषींचे पुत्र. त्यांच्या वंशजांचे काश्यप गोत्री हे गोत्र ठरले.


प्रजापती दक्षांच्या तेरा कन्यांचा विवाह काश्यपांसोबत झाला होता. देवता, दानव, यक्ष, गरुड व नाग हे सर्व काश्यपाचीच संतती आहेत.

मेरू पर्वत रांगांमध्ये एक अतिशय विस्तृत व रमणीय सरोवर होते. भगवान शंकर व त्यांच्या अर्धांगिनी सती या दोघांनाही हे सरोवर अतिशय प्रिय असल्यामुळे, हे दोघेही या सरोवरावर नियमित येत असत. काश्यपांनी आपली मेहुणी सतीला हे सरोवर आंदण दिले तेव्हापासून या सरोवराला 'सतीसार' हे नाव पडले.

जलोद्भव नावाच्या दुष्ट दैत्याने या सरोवराचा आश्रय घेऊन परिसरातील लोकांना त्रस्त करून टाकले होते. परिसरातील लोकांनी काश्यप ऋषींना जलोद्भवाच्या क्रौर्याची व आतंकाची माहिती देऊन त्यांना यातुन वाचवण्याची प्रार्थना केली. काश्यपांनी त्यांच्या नाग वंशीय ज्येष्ठ पुत्र अनंत (शेष) नाग नावाच्या मुलाला बोलावून जलोद्भवाचा आतंक संपवण्याची आज्ञा केली. शेषाने सरोवरातील पाणी सोडुन देऊन सरोवर कोरडे करायचे व त्यामुळे उघड्यावर पडलेल्या जलोद्भव दैत्यास भगवान श्री विष्णूंच्या हातून मारावयाची नीती आखली.

याच नीतीनुसार सरोवराच्या पश्चिमेला 'वराहमुख' (सध्याचे बारामुल्ला) नावाची दरी (घाटी) खोदून त्याद्वारे सरोवरातील सर्व पाणी सर्व बाजूंना जमिनीने वेढलेल्या 'काश्यप' सागरात वहावुन देण्यात आले. स्वतःचे जल संरक्षण नाहीसे झाल्याचे बघुन जलोद्भव दैत्य सरोवराबाहेर उघड्या मैदानात आला तेव्हा श्री विष्णूंनी त्याचा वध केला.

कोरड्या पडलेल्या या सरोवराच्या ठिकाणी मग वेद उपनिषद आदी शास्त्रांचे अध्ययन केंद्र विकसीत झाले. ज्या जागेत अशा अतिशय समृद्ध संस्कृतीचा उगम व विकास झाला त्या जागेवर



वसलेल्या नगराचे नाव आहे 'श्रीनगर'. अनंताने श्रीनगरच्या बाजूलाच अजून एक शहर वसवले होते व त्या नगराचे नाव आजदेखील 'अनंतनाग' आहे. तिथे आज 'अनंतनाग' जिल्ह्याचे मुख्यालय आहे

श्रीनगर हे लवकरच भरभराटीस व प्रसिद्धीस आले. देवी गौरी व गणेश हे नियमितपणे इथे येत असत. गौरींच्या येण्याचा मार्ग 'गौरी मार्ग' म्हणजेच आजचे 'गुलमर्ग' म्हणुन ओळखला जातो. कल्हणाने 'नीलमत पुराणाच्या' संदर्भाने लिहीलेला 'राजतरंगिणी' हा ग्रंथ काश्मीरच्या इतिहासाचा प्रमाणग्रंथ मानल्या जातो. जगभरातील विद्वान काश्मीरच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी याच ग्रंथाचा संदर्भासाठी वापर करतात.

काश्मीरची अधिष्ठात्री देवी शारदा आहे.

**नमस्ते शारदे देवी, काश्मीरपूरवासिनी,**
**त्वमहं प्रार्थये नित्यम् विद्यादानंच देहि मे ।**

शारदादेवीला काश्मीरपुरवासिनी म्हटले आहे. काश्मीरी भाषेच्या लिपीला 'शारदा' म्हटले जात असे व काश्मीरातील अध्ययनाच्या अनेक केंद्राना 'शारदा पीठ' म्हणत असत. संपूर्ण काश्मीरच कधी काळी 'शारद देश' म्हणून ओळखला जायचा.

आठव्या शतकात आद्य शंकराचार्य काश्मीरला आले तेव्हा काश्मीर हे शैव संप्रदायाचे प्रमुख केंद्र होते. गोपालाद्री पर्वत शिखरावरच आद्य शंकराचार्यांनी शिव व शक्तीच्या एकरूपतेचे वर्णन करणाऱ्या 'सौंदर्य लहरी' ची रचना केली. त्या टेकडीलाच आज 'शंकराचार्य टेकडी' म्हणून ओळखले जाते.

सध्या पाकव्याप्त काश्मीरमध्ये असलेल्या कृष्णगंगा नदी काठी असलेल्या शारदा मंदिराचे सौंदर्य बघून शंकराचार्यांना तुंगा नदीच्या तीरावर वसलेल्या शृंगेरी येथे तसेच मंदिर बांधण्याची प्रेरणा मिळाली.

शृंगेरीच्या मंदिरातील शारदेची चंदनाची मुळ काष्ठमूर्ती (विग्रह) काश्मीरमधुनच आणण्यात आली आहे.

आद्य शंकराचार्य आपल्या शिष्यांसहित काश्मीरात फिरत असताना एक प्रसंग घडला. एका काश्मीरी पंडित जोडप्यानी शंकराचार्यांना काही दिवसांसाठी त्यांचे आतिथ्य स्वीकारण्याची प्रार्थना केली.

शंकराचार्यांनी त्यांची प्रार्थना मान्य करण्यापूर्वी ते व त्यांचा शिष्य परिवार स्वतःचे अन्न स्वतः शिजवून खातील ही अट घातली. ही अट ऐकून त्या जोडप्याला त्यांच्या आदरातिथ्याबद्दल शंका घेतल्यासारखे वाटले परंतू त्यांनी ही अट मान्य केली. सायंकाळी पाकसिद्धीसाठी आवश्यक तो




PNG®
Since 1832
वैभवशाली परंपरा
सुवर्णमयी शुद्धतेची

- पूर्ण पारदर्शकता
- 0% विनाघट सोने दागिने एक्सचेंज*
- १००% बीआयएस हॉलमार्क दागिने
- प्रमाणित हिरे खात्रीशीर परताव्यासह*
- कॅरेटो मीटर तपासणी सुविधा
- दागिने बायबॅकवर त्वरित पेमेंट
- शुद्धतेची हमी
- डिजिटल पेमेंट सुविधा

*अटी लागू

मे.पुरुषोत्तम नारायण गाडगीळ सराफ आणि जव्हेरी

महाराष्ट्र :-सांगली (मुख्य शाखा): ०२३३ २३२८२२८/२९ | सांगली - विश्रामबाग: ०२३३ २६७३२०३/०४ | मिरज: ०२३३ २९९१८३२
कोल्हापूर: ०२३१ २६६८२०६/०७ | इचलकरंजी: ०२३० २४३१८३१/३२ | कराड: ०२१६४ २२०२०७/०८
रत्नागिरी: ०२३५२ २२७२०२/०३ | चिपळूण: ०२३५५ २५२२०५/०६
कर्नाटक :- बेळगावी: ०८३१ २४०१८३२/२४७१८३२ | विजयपूर: ०८३५२ २४१८३२/२५१८३२ | जमखंडी: ०८३५३ २२१८३२/२२३८३२

टोल फ्री नं. : १८००-२३३-१८३२ (टोल फ्री नंबरची वेळ सकाळी ११:०० ते सायं. ७:०० वा) | www.pngadgil1832.com | Visit us at | WhatsApp 99220 01832


GREEN
HARVEST
SPECIAL
(FOR GREEN HOUSE, FRUITS,VEGETABLES & FLOWERS)
ORGANIC MANURE
AN ISO CERTIFIED 9001-2008 COMPANY
A Product From:
NATURE CARE FERTILIZERS
PVT. LTD.
ग्रीन हार्वेस्ट स्पेशल
शेणखत गावखत व रासायनिक खतास सक्षम पर्याय
SAVE SOIL SAVE INDIA
ग्रीन हार्वेस्ट
- नेचर केअर फर्टिलायझर्स -
विविध जीवजिवाणूंनी समृद्ध
नैसर्गिक पेंडीयुक्त सेंद्रिय खत
नेचर केअरची पॉलीफॉस्फेट गटातील उत्पादने
SUPER ORA
सुपर ओरा
PRUTHVI RICH
K-50
LIQUID POTASSIUM FERTILIZER
(0-2-50)
PRUTHVI RICH
NPK (20:50:00)
WS
MIXTURE
FERTILIZER
PRUTHVI RICH
UAN (32% N)(LIQUID)
• सुपर ओरा •
अति शुद्ध स्वरूपातील फॉस्फोरस चा स्रोत
• पृथ्वीरिच 00:02:50 •
विद्राव्य स्वरूपातील पोटॅशियम चा स्रोत
• पृथ्वीरिच 20:50:00 •
विद्राव्य स्वरूपातील मिश्र खत
• पृथ्वीरिच UAN •
लिक्विड स्वरूपातील नायट्रोजन चा स्रोत
Pruthvi Rich
(10:34:00)
Ammonium Poly Phosphate
100% Water Soluble
• पृथ्वीरिच 10:34:00 •
अमोनियम पॉलीफॉस्फेट
पिकांची शाखीय वाढ तसेच फुटवा
वाढवण्यास मदत करते.
Pruthvi Rich
(00:24:24)
Potassium Poly Phosphate
100% Water Soluble
• पृथ्वीरिच 00:24:24 •
पोटॅशियम पॉलीफॉस्फेट
फुला-फळांची गळ कमी करते
व आकार वाढवते.
NCF
नेचर केअर फर्टिलायझर्स प्रा.लि.(विटा)
२२४, हराळे मळा, रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ
कराड रोड विटा.
9881584160
Email : info@naturecarefertilizers.com

शिधा व इंधनादी देऊन यजमान दाम्पत्य निद्रीस्त झालं. परंतू या सर्वांसोबत ते अग्नी प्रज्वलित करण्यासाठी काही सामान द्यायचे विसरले होते. शंकराचार्यांनी त्यांच्या शिष्यांना यजमानांना त्रास देण्याची मनाई केली व त्या रात्री ते काहीही न खाताच झोपले.

दुसऱ्या दिवशी शंकराचार्यांना उपवास घडला हे ऐकल्यावर त्या दाम्पत्यास अतिशय वाइट वाटले.

शिष्यांनी रात्री पाकसिद्धीसाठी वन्हीच उपलब्ध नसल्याचे सांगितले. तेव्हा त्या गृहिणीने थोडे पाणी हातात घेऊन लाकडांवर शिंपडून अग्नी प्रज्वलित केला. हे बघून शंकराचार्यांना मोठेच आश्चर्य वाटले. काश्मीरच्या सामान्य जनांकडूनही खूप काही शिकण्यासारखे आहे हे शंकराचार्यांना कळून आले.

रामानुजाचार्यांनी अकराव्या शतकात काश्मीरला भेट दिली. केवळ काश्मीरातच उपलब्ध असलेल्या 'ब्रह्मसुत्रां'चा अभ्यास करून 'श्रीभाष्य' लिहिले. रामानुजांना तो ग्रंथ ग्रंथालयात केवळ वाचण्यासाठी बघण्याची अनुमती मिळाली होती. तिथे कोणतेही टिपण काढण्याची त्यांना अनुमती नव्हती.

रामानुजार्य व त्यांचे शिष्य कुरूत्थलवर प्रतिदिनी ग्रंथालयात जाऊन अक्षर अन् अक्षर पाठ करून घेत. शारदापीठात परतल्यावर सगळे पाठांतर आठवून त्यांनी ग्रंथरचना केली. असे तीन महिने त्यांनी पाठांतर करून व आठवुन 'श्रीभाष्य' ग्रंथ पूर्ण केला. हाच 'श्रीवैष्णवां'चा आद्यग्रंथ आहे.

काश्मीरची अधिष्ठात्री विद्येची देवी श्री शारदा प्रसन्न होवून रामानुजांसमोर प्रकटली व तिने त्यांना हयग्रीवाचे शिल्प आशीर्वाद म्हणून दिले. नीलमत पुराणानुसार काश्मीरला ५१०० वर्षांचा ज्ञात इतिहास आहे. काश्मीरची सगळी लोकसंख्या हिंदू व बौद्ध होती.

जगभर इस्लामी आक्रमक एक एक प्रदेश पादाक्रांत करत असताना लोहाणा वंशाच्या शूर राजांनी भारताच्या पश्चिमी सीमांचे इस्लामी आक्रमणापासुन यशस्वी संरक्षण केले होते. हे लोहाणा प्रभू रामांचे पुत्र राजा लव यांच्या सैन्यातील खड्गवीर होते. आजचे लाहोर हे रामायण काळातील 'लवपुरी' होते.

जे इतिहास विसरतात त्यांच्यावर इतिहासातील दुःखद गोष्टींच्या पुनरावृत्तीचे दुर्भाग्य ओढवते.

(विंग कमांडर सुदर्शन यांच्या मूळ इंग्लीश लेखाचा मराठी अनुवाद)

Wish You
Happy Diwali !
Uday Marathe
P
Vikas Marathe
PRASAD PROCESS
Flexo Plate Makers
Nylon Stamp & Block Makers
232, B Ward, Khardekar Lane,
Kolhapur 416 012. Phone 2541588

आमच्या असंख्य ग्राहकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

**महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, गोवा, मध्यप्रदेश येथील अनेक शाखांद्वारे सुप्रसिद्ध...**

सूर जुळवणारी माणसं...





# पंचरत्न

## वधू-वर सूचक केंद्र

## एकदा या, विवाह ठरवूनच जावा...

- **सभासद प्रकार :**
  वार्षिक सभासद, इंटरनेट सभासद व व्हॉटस् ॲप वधुवर विशेषांक
- **भरपूर स्थळे, सवलती, सोयी देणारी लोकप्रिय संस्था**

### अधिक माहितीसाठी भेटा :-

2997 ब, ए वॉर्ड, कपिलतीर्थ मार्केट, श्री कपिलेश्वर मंदिरामागे,
वांगी बोळाजवळ, कोल्हापूर 416 012
फोन व फॅक्स : 0231-2621001,
संपर्क : योगिता इनामदार - मोबा. 9881291863,
सौ. सोनिया सोनटक्के - मोबा. 9403131150

वेळ : सकाळी ११ ते सायंकाळी ६. साप्ताहिक सुट्टी नाही.

- वेबसाईट ब्राह्मण समाजासाठी : www.panchratnavivah.co.in
- इतर समाजासाठी : www.panchratnavivah.in, E-mail : panchvivahkop@gmail.com

**'पंचरत्न वधुवर' ची शाखा आपणही सुरु करू शकता.**

# 'तर्पण' चित्रपटाच्या निमित्ताने

बोधकथा

•

**शेफाली वैद्य**

काल Devdas Nayak ह्या तरुण दिग्दर्शकाने बनवलेला कोकणी सिनेमा, तर्पण, पुण्यात NFI मध्ये बघण्याचा योग आला. कोकणी भाषेत चित्रपट आधीच कमी बनतात, चांगले, लक्षवेधी चित्रपट तर त्याहून कमी. तर्पण हा अतिशय सुंदर चित्रपट. गोष्ट म्हटली तर अगदीच साधी, एका मध्यमवर्गीय कुटुंबातल्या ताण-तणावांची गोष्ट. सिनेमात कोणी हिरो नाही अन कोणी व्हिलन नाही. असलाच कोणी खलनायक तर तो आहे अहंकार !

कर्नाटकातल्या निसर्गसंपन्न अश्या दक्षिण कन्नड तालुक्यातील मुलकी ह्या छोट्या, सुंदर गावात घडणारी ही कथा. एका गौड सारस्वत कुटुंबातले गावी राहणारे आई-वडील आणि बंगळूर मध्ये राहणारा त्यांचा उच्चशिक्षित मुलगा रघू आणि त्याचे त्रिकोणी कुटुंब. चित्रपटाच्या सुरवातीलाच कळते की बाप-लेकामध्ये काही कारणामुळे बेबनाव झालाय आणि दोघेही एकमेकांशी बोलत नाहीत. सासू-सुनेची त्यामुळे मधल्या मध्ये होणारी घालमेल. प्रेम दोघांनाही आहे एकमेकाबद्दल, आपलं चुकलंय याची जाणीवही दोघानांही आहे. पण अहंकार आड येतोय.

आई काकुळतीला येऊन मुलाला फोनवर सांगतेय, 'एकदा तरी बोल रे त्यांच्याशी, वडील आहेत ते तुझे'. मुलगा चूक मान्यही करतोय आणि आईला वचन देतोय की 'पुढच्या महिन्यात गावाला येईन तेव्हा बोलेन त्यांच्याशी, मी चुकलोय हे मला कळतंय'. पण तो पुढचा महिना कधी येतच नाही, त्याआधीच हृदयविकाराच्या धक्क्याने वडील मरण पावतात आणि मुलगा येतो तो हातात अग्नी घेऊन स्मशानाची वाट चालायला. अपराध भावना आणि दुःख यांनी ग्रासलेला मुलगा जेव्हा वडिलांचा फोन बघतो, तेव्हा त्याला त्यात वडिलांनी गेल्या चार वर्षांमध्ये पाठवलेल्या असंख्य व्हॉइस नोट्स दिसतात. त्याने वडिलांना रागाच्या भरात व्हाट्सऍपवर ब्लॉक केलेले असते त्यामुळे त्याच्यापर्यंत त्या व्हॉइस नोट्स पोचलेल्याच नसतात. तो एकेक व्हॉईस नोट ऐकत जातो आणि त्यातून त्याला त्याचे वडील उलगडत जातात. पुढे रघू काय करतो, पिता-पुत्रातले भांडण कशामुळे झालेले असते हे पाहण्यासाठी चित्रपटच पहावा. वडील रामनाथ नायक यांची भूमिका केलेले Sanjay Savkur आणि मुलगा रघू याची भूमिका केलेले Anuj Nayak यांनी दोघांनीही ह्या साध्या सरळ कथेत आपल्या उत्कट अभिनयाने जान आणली आहे. मीरा नायमपल्ली ह्यांची आई आणि मधुरा शेणॉय ह्यांची सूनही उत्तम!

मला हा चित्रपट बघत असताना सतत माझे वडील आठवत होते. मी अमेरिकेत असताना ते गेले, असेच, रात्रीत हृदयविकाराचा धक्का येऊन. तेव्हा माझा एक भाऊ अमेरिकेत होता आणि दुसरा पुण्यात. मोठा भाऊ कुंकळ्ळीला पोचला तो असाच, चित्रपटातल्या रघूसारखा. आमचं तिघांचंही नातं आई-पापांशी उत्तम होतं, बोलकं होतं, वाहतं होतं , कुठलाही विषय आम्हाला वर्ज्य नव्हता. पण पापा इतके अचानक गेले तेव्हा आम्ही तिघंही भावंडं पार उन्मळून पडलो. त्या दिवसात माझा भाऊ मला

एकदा म्हणाला होता, ‘किती गप्पा, किती मेहफिली, किती राजकारणावरचे आर्ग्युमेंट्स, किती आठवणी, किती हसणे, फुरंगटणे, छोट्या गोष्टींवरून रागावणे आणि शेवटी परत एक होणे, सगळ्याच शक्यता आता काळाच्या पडद्याआड गेल्या बघ’.

कुठल्याही नात्यात महत्वाच्या असतात त्या ह्या शक्यता, तुम्ही घडवता त्या आठवणी. ‘तर्पण’ मध्ये एका व्हॉइस नोट मध्ये वडील मुलाला सांगतात, ‘चार वर्षे आपण बोललो नाही, किती गोष्टी गमावल्या आपण ह्या चार वर्षात, किती आठवणी तयार करायच्या संधी, किती हास्यविनोद, किती हृद्य, कोवळे क्षण, किती सामान्य रुसवे फुगवे, आणि तेही कशासाठी तर आपापला अहंकार आपण कवटाळून बसलो म्हणून’. किती खरे आहे हे ! आपल्या आयुष्यातली किती सुंदर नाती ह्या खोट्या अहंकारापायी नासवतो आपण! क्षुल्लक गैरसमजापायी दुरावलेला एकेकाळचा जिवलग मित्र, कुणीतरी कधीतरी काही म्हटल्याच्या जुन्या जखमेचे व्रण वर्षानुवर्षे एखाद्या पदकासारखे मिरवतो. चूक कळली तरी त्या चुकीचे परिमार्जन पटकन करत नाही आपण, कारण आपल्याला वाटत असतं की आपल्या हातात वेळ आहे, खूप वेळ आहे.

कधी कधी तर असा गैरसमजही झालेला नसतो, पण आपण आपल्या भावना बोलून दाखवत नाही, प्रेमाच्या, आपुलकीच्या, कृतज्ञतेच्या. राग पटकन व्यक्त करतो, पण प्रेम मात्र आपल्याच मनाच्या कुपीत दडवून ठेवतो, कधी भिडेपोटी, तर कधी लोक काय म्हणतील ह्या व्यर्थ भीतीपोटी तर कधी ‘घाई काय आहे, आहे आपल्याकडे पुष्कळ वेळ बोलून दाखवायला सर्व’ ह्या भ्रामक समजुतीपोटी. खरे तर वेळ किती आहे आपल्याकडे हे कुणालाच माहिती नसते. मुठीत धरलेल्या वाळूसारखा असतो वेळ, बोटांच्या फटीतून कधी निसटून जातो कळतच नाही.

मागे एकदा माझ्या चुलत दिराने त्याच्या वडीलांबद्दल एक छोटीशीच पोस्ट लिहिली होती. तो अगदीच सोळा-सतरा वर्षांचा असताना त्याचे वडील गेले. त्याने लिहिलं होतं की ‘वडील असताना आम्ही एकमेकांशी खूप कमी बोललो. प्रेम असूनही. कारण तेही अबोल आणि अंतर्मुख होते आणि मीही, पण आज मला वाटतंय आम्ही बोलायला पाहिजे होतं, खूप बोलायला पाहिजे होतं.’


त्याच्या ह्या पोस्ट मधलं हे वाक्य माझ्या मनात कायम घर करून राहिलंय. कोरोनाने खूप बळी घेतले. प्रत्येक वेळेला माणूस गेल्यानंतर त्याच्याबद्दल हळहळ व्यक्त करणारे, ती व्यक्ती किती चांगली होती, किती मोठी होती, त्या व्यक्तीच्या जाण्याने किती मोठं नुकसान झालंय असे खूप पोस्ट वाचले. प्रत्येक वेळेला अश्या पोस्ट्स वाचताना वाटायचं की त्या व्यक्तीच्या पश्चात जे इतकं चांगलं लिहिलं गेलंय, इतकी हळहळ व्यक्त होतेय त्यातलं एक शतांश तरी ते हयात असताना त्यांना कुणी तोंडावर सांगितलं होतं का ?

आपल्या संस्कृतीत आपण प्रेम बोलून दाखवत नाही, कृतीतून दाखवतो. कृती विचारांपेक्षा कधीही श्रेष्ठ आहेच पण दोन माणसांच्या नात्यांमध्ये खूप गोष्टी अश्या असतात ज्या बोलून दाखवल्या तर बोलणाऱ्यालाही आनंद होतो आणि ऐकणाऱ्यालाही, पण कधी भलत्या भीडेपोटी तर कधी आपल्याजवळ भरपूर वेळ आहे ह्या भ्रमापोटी, तर कधी जुन्या गैरसमजांपोटी बरेचदा आपण ओठात आलेले शब्द गिळून टाकतो आणि हवं तसं व्यक्त होत नाही, आणि मग अचानक मृत्यू कधी अपघात बनून येतो, तर कधी कॅन्सर बनून, कधी कोरोना बनून तर कधी हृदयविकार बनून, आपलं माणूस दूर निघून जातं

आणि आपल्या मनात अडकून राहतो एक आवंढा, कायमचा, 'आपण बोलायला पाहिजे होतं, सांगायला पाहिजे होतं त्या व्यक्तीला, आपलं किती प्रेम होतं ते त्याच्यावर/तिच्यावर'.

नका गप्प राहू ! व्यक्त व्हा ! लोक हसले तर हसू देत ! पण सांगा तुमच्या भावना त्यांना. आयुष्य तसंही साबणाच्या बुडबुड्यासारखंच असतं, सुंदर पण कधीही विरून जाऊ शकेल असं, क्षणभंगूर, अल्पजीवी ! तर्पण चित्रपटाचा तोच संदेश आहे. आई-वडिलांप्रती किती प्रेम आहे, किती श्रद्धा आहे हे व्यक्त करायला तर्पणाची पाळी येऊ नये!

म्हणून सांगावंसं वाटतं की बोलते व्हा !




# ज्ञानेश्वरांचा शोध

संत ज्ञानेश्वरांचे विचार आणि तत्त्वज्ञान जसे कालातीत आहेत, तसे त्यांनी लावलेला एक शोधही अजरामर आहे, तो म्हणजे सापशिडीचा खेळ! या खेळाची निर्मिती संत ज्ञानेश्वरमाऊली यांनी केली आहे, असे सांगितल्यास विश्वास बसणार नाही; पण हे सत्य आहे. त्यामुळे त्यांनी निर्माण केलेल्या या खेळाविषयी जाणून घेऊया. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या सापशिडीचे गुपित 'डेन्मार्क'चे जेकॉब आणि पुणे येथील ज्येष्ठ संशोधक वा.ल. मंजुळ यांनी उलगडले.

संत ज्ञानेश्वर महाराजांनीच सापशिडीचा शोध लावला, याचे स्पष्ट पुरावे मिळत नव्हते; पण 'डेन्मार्क' देशातील जेकॉब यांच्या साहाय्याने काही वर्षांपूर्वी हे गुपित उलगडले गेले. 'इंडियन कल्चरल ट्रॅडिशन' या संकल्पनेच्या अंतर्गत डेन्मार्क येथील 'डॅनिश रॉयल सेंटर'चे संचालक डॉ. एरिक सँड यांचे विद्यार्थी असलेल्या जेकॉब यांनी 'मध्ययुगीन काळात भारतात खेळले जाणारे खेळ', हा विषय संशोधनासाठी निवडला. या संशोधनाच्या वेळी त्यांच्या असे लक्षात आले की, १३ व्या शतकातील संत ज्ञानेश्वर महाराज यांनी सापशिडीचा शोध लावलेला असू शकतो.

जेकॉब यांनी अनेक जुने सापशिडीचे पट त्यांनी मिळवले; परंतु योग्य संदर्भ मिळत नव्हते. संत ज्ञानेश्वरांच्या चरित्रातही याविषयी कुठे उल्लेख नव्हता. अखेर संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक आणि संशोधक वा.ल. मंजुळ यांच्याकडे त्यांनी विचारणा केली. मंजुळ यांनी पुणे येथील डेक्कन महाविद्यालयामध्ये तशा प्रकारचा संदर्भ असल्याचे सांगितले आणि 'मोक्षपट' उलगडा गेला. मनुष्याने आयुष्य कसे जगावे, याचे तत्त्वज्ञान सांगणारा सापशिडी खेळ!

'मोक्षपट' हा पहिला सापशिडीपट होता, असे सांगितले जाते. संत ज्ञानेश्वर आणि संत निवृत्तीनाथ भिक्षा मागण्यासाठी गावात जात असत. घरात एकट्या असलेल्या संत सोपानदेव आणि संत मुक्ताई यांचे मन रमावे; म्हणून संत ज्ञानेश्वर आणि संत निवृत्तीनाथ यांनी या खेळाचा शोध लावला, असे सांगितले जाते. लहान मुलांना खेळाच्या माध्यमातून चांगले संस्कार मिळावेत असा यामागील उद्देश होता.



मोक्षपटाचे दोन्ही पट २० X २० इंच आकाराचे असून त्यात ५० चौकोनी घरे आहेत. पहिले घर जन्माचे, तर शेवटचे घर मोक्षाचे आहे. माणसाच्या जन्मापासून त्याला मोक्ष मिळेपर्यंतचा प्रवास या पटामधून मांडण्यात आला आहे. 'मोक्षपट' खेळण्यासाठी सापशिडीप्रमाणेच ६ कवड्यांचा वापर करावा लागतो. ६ कवड्या पूर्ण पालथ्या पडल्या, तर दान मिळते. सापशिडीच्या खेळाप्रमाणेच यातही साप आहेत. त्यांना काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या षडरिपूंची नावे देण्यात आली आहेत. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर प्रगती करण्यासाठी शिडी आहे. तिला सत्संग, दया, सद्बुद्धी अशी नावे देण्यात आली आहेत. माणसाने आयुष्य कशा प्रकारे जगावे, याचे तत्त्वज्ञान या खेळातून सांगण्यात आले आहे. जेकॉब यांना डेक्कन महाविद्यालयामध्ये रा.चिं. ढेरे यांच्या हस्तलिखित संग्रहातून दोन 'मोक्षपट' मिळाले.

मोक्षपटाच्या हस्तलिखितावर लिहिलेल्या ओव्यांमध्ये आयुष्य कसे जगावे ? कोणती कवडी पडली की, काय करावे ? याचे मार्गदर्शन अगदी सहजपणे सांगण्यात आले आहे. सापशिडी जरी आधुनिक असली, तरी गर्भितार्थ तोच राहील, यात काही शंका नाही. इंग्रजांनी सापशिडी हा खेळ नेऊन त्याचे 'स्नेक अँड लॅडर' असे नामकरण केले.

'व्हिज्युअल फॅक्टफाईंडर-हिस्ट्री टाइमलाईन' या पुस्तकात वर्ष ११९९ ते १२०९ या कालखंडातील जगातील महत्त्वाच्या घडामोडींविषयी माहिती दिली आहे. 'उल्लेखनीय गोष्ट' या शीर्षकाखाली '१३ व्या शतकातील भारतीय कवी संत ज्ञानदेव यांनी कवड्या आणि फासे यांचा उपयोग करून एक खेळ सिद्ध केला. यात खेळाडू शिडीचा उपयोग करून वर चढणार आणि सापाच्या तोंडी आल्यावर खाली उतरणार. शिडीच्या साहाय्याने वर चढणे हे चांगले समजले जाई, तर सर्पदंश ही अनिष्ट गोष्ट समजली जात असे. हा खेळ 'सापशिडी' या नावाने अद्यापही लोकप्रिय आहे', असा उल्लेख सापडतो.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरमाऊली, संत निवृत्तीनाथ, संत सोपानदेव आणि संत मुक्ताई ही सर्व भावंडे हा खेळ खेळत असत. पुढे भारतभर या खेळाचा प्रसार झाला. इंग्रज भारतात आल्यावर त्यांना हा खेळ प्रचंड आवडला. बुद्धीबळ, ल्युडोप्रमाणे ते हा खेळही इंग्लंडमध्ये घेऊन गेले, असे म्हटले जाते. व्हिक्टोरिया राणीच्या म्हणण्याप्रमाणे त्यात काही पालट करण्यात आले आणि त्याचे 'स्नेक अँड लॅडर' असे नव्याने नामकरण करण्यात आले. सध्या आपण त्यांच्या पद्धतीने सापशिडी खेळत असलो, तरी त्याची मूळ संकल्पना भारतीय आहे आणि संत ज्ञानेश्वरमाऊली हेच या खेळाचे जनक आहेत.'

(साभार : दैनिक 'लोकमत', १८ जुलै २०२१)

# भोपळे

•

**वैदेही जोशी**
मोबा. ९५४५६३५४६५

कामावरून येताना बाजाराचा फेर फटका मारायचा... एक दोन दुकानात थोडावेळ दिवसभराच्या काय काय घटना हे जाणून घ्यायचं... आणि घरी यायचं हा महेशचा नित्यक्रम... त्यामुळे दिवसभराचा कामाचा शीण निघून जायचा... अन् बाजारातील वेगळ्या वातावरणामुळे मन फ्रेश व्हायचं. रुटिनमुळे सुट्टीच्या दिवशी तेवढच मित्रपरिवार भेटायचा, एरवी पूर्ण दिवस कामाच्या ओझ्याखाली...

''मंदा, चहा टाक गं. मी आलोच फ्रेश होऊन.'' दारातूनच चप्पल काढत महेशने आवाज दिला.

''हो...'' म्हणत मंदाने चहाचे आधण गॅसवर ठेवले. दोन कप चहा व्हायला असा कितीसा वेळ लागतो? महेश फ्रेश होऊन कपडे बदलून डायनिंग टेबल पाशी आला. दोघांनी एकत्र चहा घ्यायचा हा दंडक. त्यामुळे चहा बिस्कीटांचा आस्वाद घेत, दिवसभराच्या गप्पा सुरू. मंदा घरी काय काय केलं, कोण आलं-गेलं हे सांगायची आणि महेश कामावरचे, बाजारातले सगळे किस्से सांगायचा. शांतपणे सगळं बोलून झालं की, पुन्हा दोघं आपापल्या कामाला लागायची.

''मंदा, ऐक ना...''

''हं... ऐकतेय.''

''असं नाही, नीट लक्ष देऊन ऐक.''

''आज आठवडा बाजारात ना, भोपळे विकायला एक म्हातारी आली होती...''

''बरं... मग...''

''काही नाही. तुझं लक्ष नाहीय्ये.'' महेश म्हणाला.

''बरं... बोला, ऐकतेय मी.'' हातातले काम बाजूला ठेवत मंदा म्हणाली.

''तिच्या एका वाक्यानं मनात घर केलंय गं... किती सहजपणे बोलून गेली ती, पण माझ्या मात्र ते डोक्यातून काही केल्या जात नाहीय्ये.''

''काय म्हणाली?''

''हातावर देऊन कोपऱावर मारू नये माणसानं... नशिबी तेच हाय...ते भोगावं.''

''म्हणजे? मला नाही समजलं.'' मंदा म्हणाली.

''अगदी माझं हेच झालं. मी विचार करून करून शेवटी त्या म्हातारीलाच विचारलं, तेव्हा तिने कृती करून दाखवली... थांब तुला तसंच दाखवतो. समोर उभी रहा, हात पुढे कर. आता हातावर मी ही साखर ठेवतो, ती खाण्यासाठी तोंडाकडे ने...''

मंदाने तसं करताच महेशने पटकन तिच्या कोपरावर हात मारला. साखर तोंडात न जाता खांद्यावरून मागे सांडली.

''हे अस्सं नशीब करतं असं म्हणाली ती.''

''काय झालं असेल गं?''

''मला राहून राहून तिला विचारावं वाटत होतं पण तिच्या पुढ्यात चार भोपळे होते. ते ती आलेल्या गिऱ्हाईकांना दाखवत होती. मग मी कसा वेळ घेणार तिचा?''

आता मात्र मंदापण विचारात पडली. हाताने दुसरं काम करायला घेतलं खरं, पण डोक्यात मात्र तोच विषय फिरून फिरून येत होता...

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी महेश पुन्हा बाजारात त्याच जागेवर ती म्हातारी आजी आहे का बघायला गेला. ती आजी आज आलीच नव्हती. ज्या दुकानाच्या समोर ती बसायची, त्या दुकानदाराजवळ विचारपूस केल्यावर समजलं की शेजारच्या खेडेगावातून ती येत होती. दरवेळी काही तरी वेगवेगळ्या भाज्या तिच्याकडे असायच्या. नेहमीच एकाच ठिकाणी बसून भाजी विकत असल्यामुळे ज्याला त्याला चेहऱ्याने ती ओळखीची झाली होती.

सलग तिसऱ्या-चौथ्या दिवशी ही आजी आली नव्हती म्हणून महेशला उगीच काळजी वाटायला लागली. काय झालं असेल? हा एकच प्रश्न सारखा मनात येत होता. खरतरं भाजी विकायला खूप जणं येऊन बसतात. प्रत्येकाशी थोडंच आपण असं बोलतो? किंवा अशी काळजी देखील कुणाची करत नाही. पण मग या आजीबद्दल कशाला उगीच? पण त्या प्रश्नाला उत्तर नसतानाही तो शेवटाकडे आला होता. ते काही नाही, आपण आजीची चौकशी करायला हवी, असं मनात ठरवलं.

त्या दुकानदाराकडून त्या आजीची आणखी माहिती मिळवून महेश घरी आला, पण त्याचं लक्ष लागत नव्हतं. मनातले सगळे विचार मंदाशी बोलून तो म्हणाला, ''मी उद्या तिच्या घरी जाऊन येतोच. त्याशिवाय मला चैन पडणार नाही.''

मंदाला ठाऊक होते... आता हा तिची भेट घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. त्यामुळे तिने त्याला अडवलच नाही. कारण कुठलीही गोष्ट घटना आयुष्यात विनाकारण होत नाही हे तिला पक्कं ठाऊक होतं. त्याचे परिणाम.. पडसाद हेही ठरलेले विधिलिखित असते... मग उगीच प्रश्न उपस्थित करून किंवा मोडता घालून किंवा नकार देऊनही काही फायदा नाही. हे तिच्या वागण्यातून तिने अंगिकारले होते. त्यामुळेच असेल सहजीवनाची पंधरा-सोळा वर्ष अगदी समाधानाची होती.

ठरल्याप्रमाणे महेश दुसऱ्या दिवशी त्या आजीच्या गावाला गेला. खरंतर टू व्हिलरने जेमतेम पंधरा-सोळा किलोमीटरवरचं अंतर पार करायला कितीसा वेळ लागणार? पण आज उगीच ते अंतर खूप वाटत होतं. आजी घरी असेल का? घरी कोण कोण असेल? त्यांना माझं असं येणं... पण पुढचे प्रश्न मनातच ठेवत त्याने गाडीच्या वेगात मनाला देखील सामील केले...

पत्ता विचारत विचारत तो अखेर आजीच्या घरी पोचला. खरंतर खेडेगाव म्हणावं असंच गाव होतं ते... सोयीसुविधा होत्या, पण शेतकरी कुटुंब जास्त हे रहाणीमानावरून समजत होतच. आजूबाजूचा परिसर, शेती, लोकांच्या घरांवरून त्यांच्या जगण्याच्या स्वरूपाचा अंदाज येत होता. 'भाजीवाली आजीचं घर कुठाय?' असं फक्त एकदाच विचारावं लागलं. मेन रस्ता सोडून दोन गल्लीबोळ पार करून एका शेताकडच्या घराजवळ त्याने गाडी थांबवली.

दारापाशी गाडी कुणाची आली म्हणून आजी बाहेर येऊन बघू लागली. महेशने आजीला ओळखलं अन् हाक मारली. ''आजी, तुम्हालाच भेटायला आलोय.'' असं म्हणत गाडी उभी केली अन् आजीच्या घरात गेला.

घर म्हणावं का? कष्टकरी माणसाच्या बाबतीत देव इतका निष्ठूर कसा असू शकतो? गरीबीची सगळ्या खाणाखुणा ठळकपणे जाणवतील असच घर होतं. उंबरठ्याच्या आत येता-येता मनात अनेक प्रश्नांनी फेर धरला.

आजीने चेहऱ्यावरून महेशला ओळखले. बसा म्हणाली आणि पाणी आणायला म्हणून आत गेली. तेवढ्यात एक काळासावळा मुलगा बाहेरून खेळ खेळून धावत घरात आला. त्याच्या एकूणच रूपावरून घरच्या परिस्थितीची जाणीव होत होती.


स्थापना १९४७
GB
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
गोखले ब्रदर्स भांड्यांचे व्यापारी
स्टेनलेस स्टिल, तांबा, पितळ,
ॲल्युमिनिअम मालाची भव्य शोरूम.
तसेच नामवंत कंपन्यांचे कुकर्स, इले. अप्लायन्सेस,
वॉटर फिल्टर्स मिळण्याचे खात्रीशीर ठिकाण.
रास्त भाव, विनम्र व तत्पर सेवा.
महाद्वार रोड, कोल्हापूर. फोन नं. ०२३१-२५४६९४१, ७५८८११३२६०
Email : gokhalebrothers@yahoo.in


स्थापना १९७९
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
GB
गोखले ब्रदर्स सराफ
ॲन्ड ज्वेलर्स
महाद्वार रोड, कोल्हापूर.
फोन नं. ०२३१-२५४६९४१, ७८७५५४६५८५
Email : gokhalebrothers@yahoo.in
चांदीच्या तयार वस्तू, सोन्याचे तयार दागिने व
ऑर्डरप्रमाणे दागिने तयार करून मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण.